
महाराष्ट्राचे

# शिल्पकार तंट्या भिल्ल



SIGN: RAJA BADSAL

बाबा भांड

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# जननायक तंट्या भिल्ल

बाबा भांड

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : नोव्हेंबर २००२
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ८

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : ४९४५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ४५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

एकशे पंचवीस वर्षापूर्वी आपल्याकडे इंग्रजांचा अंमल होता. आजच्या जळगाव-धुळे जिल्ह्यांस त्या काळात खानदेश म्हणत. खानदेशाला लागून वरच्या बाजूने सातपुडा डोंगराची रांग आहे. याला लागून होळकरांचा पश्चिम निमाड आणि शिंद्यांचा पूर्व निमाड हे भाग होते. खानदेश, होळकरांचा पश्चिम निमाड आणि शिंद्यांची पूर्व निमाडची हद्द जळगाव जिल्ह्यातील पालजवळ मिळत होती. त्या भागात तंट्या भिल्लाचे गाव होते. माउंटअबूपासून सुरू होणारा विंध्य, सातपुडा आणि बस्तरपर्यंतच्या डोंगराळ भागात आदिवासींची मोठी वस्ती आहे. यातच भिल्लांची मोठी संख्या आहे.

मराठेशाहीचा १८१८ साली अस्त झाला. परंतु त्या काळात सातपुडातील बहादुर भिल्लांनी अनेक वर्षे गनिमी काव्यानं इंग्रजांशी झुंज दिली. सातपुडा, सातमाळा, अजिंठ्याच्या डोंगरांतील अनेक भिल्ल नायकांनी इंग्रजांशी प्रखर लढा दिला. ह्यात सातमाळातील भागोजी नाईक, सातपुडातील कजरसिंग नाईक, भिमा नाईक आणि तंट्या भिल्लाचा संघर्ष भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील काही सोनेरी पाने आहेत.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाप्रमाणेच या आदिवासी क्रांतिकारकांचा इतिहासही महत्त्वाचा आहे. बलाढ्य ब्रिटिश सत्तेला अकरा वर्ष सळो की पळो करणारा तंट्या भिल्ल हा ब्रिटिशांच्या दृष्टिकोनातून एक दरोडेखोर होता. परंतु शंभर वर्षापूर्वी आदिवासी, शेतकऱ्यांना सावकार, मालगुजार आणि जुलमी सरकारविरुद्ध पेटून उठण्याची प्रेरणा देणारा तंट्या विलक्षण असला पाहिजे. आदिवासी-शेतकऱ्यांच्या क्रांतीचा पहिला नायक तंट्या होता. त्याने सातपुडाच्या दोन्ही भागात- खानदेश व नर्मदा खोऱ्यातील आदिवासी शेतकऱ्यांत राष्ट्रीयत्वाची भावना जागवली. 'ज्या काळात पुण्यात महात्मा जोतीराव फुले समाज सुधारणेसाठी कार्यरत होते, त्याच काळात हा भिल्ल नायक आदिवासी, किसान ह्यांच्या पारतंत्र्याच्या बेड्या झुगारून देण्यासाठी एकाकी लढा देत होता,' असे तंट्याविषयी श्री. बाबा भांड यांनी याच पुस्तकाच्या प्रास्तविकात म्हटले आहे.

तंट्याच्या शोधाच्या निमित्ताने बाबा भांड यांनी घेतलेले परिश्रम महत्त्वाचे आहेत. ब्रिटिशकालीन पोलीस दस्तावेज, न्यायालयाची कागदपत्रे, होळकर दरबारातील कागदपत्रे आणि पत्रव्यवहार त्यांनी शोधला. आतापर्यंत तंट्या हा आदिवासी नायक आख्यायिका, दंतकथांतून लोकमानसात शंभर वर्षे महाराष्ट्रात नाटक - गीतांतून माहीत होता. त्या लोकविलक्षण नायकाच्या चरित्राचे हे लेखन म्हणजे इतिहासाचे पुनर्लेखनच म्हणता येईल.

'जननायक तंट्या भिल्ल' पुस्तकामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एका महत्त्वाच्या आदिवासी नायकाचे साधार चरित्र प्रकाशित होत आहे.

रा. रं. बोराडे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई
दिनांक: २५ सप्टेंबर, २००२

# तंट्याच्या ऋणातून मुक्त

तंट्या भिल्ल हा गेल्या शतकातील एक आदिवासी नायक. तो साधा-भोळा होता. त्याची वडिलोपार्जित जमीन कर्जापोटी पाटलाने बळकावली. कर्ज फेडू इच्छिणाऱ्या तंट्याला खोट्या गुन्ह्यात अडकवले. जेलमध्ये पाठविले. शिक्षा भोगून आलेला तंट्या मोलमजुरी करू लागला. पुन्हा गावकऱ्यांनी पाटलाच्या मुलीच्या प्रेमसंबंधाचा आरोप ठेवून हुसकावून लावलं. दुसऱ्या वेळी पुन्हा खोटा आरोप ठेवून जेलमध्ये डांबले.

माणूस म्हणून शांत जीवन जगण्याची धडपड करणाऱ्या तंट्याला जमीन हडप करणारे पाटील-मालगुजार, त्यांना साथ देणारे सावकार, पोलिस अन् सर्वच शासन यंत्रणेने जगणे असह्य केले. अन्यायाने पिचून गेलेला तंट्या बदलत गेला. आपल्या व्यवस्थेशी आणि बलाढ्य ब्रिटिश राजसत्तेशी लढा सुरू केला.

तंट्या मालगुजार-सावकारांना लुटू लागला. पोलिस चौक्यांवर हल्ला करू लागला. सत्ताधाऱ्यांना डाकू वाटणारा तंट्या डाकू नव्हताच. सावकार-मालगुजारांना लुटून तो गरिबांना वाटून टाकी. दुष्काळात सावकारांची आणि सरकारी धान्याची गोदामं फोडून गरिबांना मोफत धान्य वाटू लागला. गरजूंना बिनव्याजी कर्ज देऊ लागला. स्त्रियांना तो पाठीराखा वाटत होता.

गरिबांचा वाली, त्यांचा रक्षणकर्ता, जंगलचा सार्वभौम राजा अशी त्याची प्रतिमा जनमाणसांत बनली होती. त्याच्या जिवंतपणीच खानदेश-नर्मदा खोऱ्यात दंतकथा बनला होता. त्याच्या कथा आणि गीतं घराघरात पोहोचली होती.

ज्या काळात पुण्यात महात्मा जोतीराव फुले समाज सुधारणेसाठी कार्यरत होते, त्याच काळात हा भिल्ल नायक आदिवासी-किसान ह्यांच्या पारतंत्र्याच्या बेड्या झुगारून देण्याचा एकाकी लढा देत होता.

ज्या काळात होळकर, निजाम, शिंदे अन् इतर संस्थानिक ब्रिटिश सत्तेशी हुजरेगिरी करण्यात मशगुल होते, त्या काळात हा लोकविलक्षण नायक जनाधारावर झुंजत होता. अकरा वर्ष ब्रिटिश सत्तेच्या तोंडचे पाणी तंट्याने पळविले. त्याची एकाकी झुंज आदिवासी स्वातंत्र्यलढ्यातील एक सोनेरी पान आहे.

तंट्याला पकडण्यासाठी १०,५०० रुपये आणि पंचवीसशे एकर जमिनीचे बक्षीस ब्रिटिशांनी देऊ केले. होळकरांनी वेगळे बक्षीस ठेवले. 'तंट्या पोलिस' नावाची स्वतंत्र फौज स्थापन केली. गावागावांत तंबू उभे करून पोलिस चौक्या उभ्या केल्या. मालगुजारांना मोफत शस्त्रे वाटली; तरीही हा वीर अकरा वर्ष पोलिसांच्या हातांवर तुरी देऊन डोंगरदऱ्यांत तळपत होता.

तंट्याचे जीवन मानवतेचा संदेश देणारे होते. त्याच्यात नेतृत्वाचे सगळे गुण होते. तो नि:स्वार्थी होता. स्वत:साठी त्याने काही ठेवले नाही. त्याची प्रचंड बुद्धिमत्ता, चपळाई, प्रसंगावधान, दयाळूपणा, सभ्यपणा, न्यायीदृष्टी, उदार दृष्टिकोन - या गुणांबद्दलच्या लोककथा - लोकगीते गावोगाव पसरली होती. हे सारे तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांच्या पत्रव्यवहारात अहवालात नमूद करून ठेवले आहे.

आदिवासी - शेतकऱ्यांच्या क्रांतीचा पहिला नायक होता तंट्या. त्याने सातपुडाच्या दोन्ही भागांतील - खानदेश व नर्मदा खोऱ्यातील आदिवासी शेतकऱ्यांत राष्ट्रीयत्वाची भावना जागवली.

दुर्दैवाने इतिहासात तंट्याची नोंद एक डाकू व दरोडेखोर अशीच झाली आहे. इतिहास लिहिणाऱ्यांनी गुन्हेगार जातीत जन्मलेल्या तंट्या भिल्लावर हा अन्याय केला होता. महाराष्ट्रातील लोककथा, लोकनाट्य, पोवाडे आणि लोकगीतांतही तंट्या लोकांसमोर येत होता; परंतु एक डाकू आणि दरोडेखोर हा कपाळावर डाग घेऊनच.

एक दशक हा क्रांतिवीर बेदखल राहिला. तंट्याचा शोध घेत असताना सेंट्रल प्रॉव्हिन्स ॲण्ड बेरार, बॉम्बे प्रॉव्हिन्सेस, इंदोर दरबारच्या पुरातत्व खात्यात धुंडाळा घेतला. तंट्याबद्दलची मूळ पोलिस कागदपत्रे, न्यायालयीन दस्तऐवज, उपलब्ध लोकगीतं ह्यातून तंट्याचं हे चरित्र समोर आलं. या आदिवासी क्रांतिवीराची ओळख करून देताना तंट्याच्या ऋणातून मुक्त झाल्याचं वेगळं समाधान मिळालं आहे. नव्या पिढीला तंट्याचं जीवन या पुस्तकाच्या निमित्ताने देता आलं याचा आनंद आहे.

**-बाबा भांड**

# अनुक्रमणिका


जंगलात राहणारे उघड्यावर आले ........ १
बापाची जमीन कर्जापोटी गेली ........ ५
पाटलाची यशोदा आणि तात्यावर आळ ........ १०
तंट्याचे जेलमधून पलायन ........ १६
तंट्यानं सावकार-माल गुजारांना हिसका दाखवला ........ २४
बिजनियाला फाशी ........ ३२
तंट्या, जनतेचा वाली आणि सरकारची डोकेदुखी ........ ४०
जंगलचा राजा तंट्या ........ ४७
कालीभीत जंगलात तंट्या ........ ५४
भारतीय राजे-संस्थानिक तंट्याला मदत करतात, ब्रिटिशांचा आरोप ........ ६३
तंट्याला पकडण्यासाठी मोठं बक्षीस ........ ७०
तंट्या झाला जननायक ........ ७८
मेजर ईश्वरी प्रसादने विडा उचलला ........ ८५
मेहुण्याने घात केला ........ ९३
तंट्याला इंदूरला आणलं ........ १०१
जबलपूर जेलमध्ये तंट्या ........ १०८
तंट्यावर अन्याय, वकिलांचा सरकारकडे अर्ज ........ ११६

# जंगलात राहणारे उघड्यावर आले

महाराष्ट्राच्या उत्तरेला पूर्व-पश्चिम सातपुडा डोंगराची आडवी रांग पसरली आहे. रांगेच्या पायथ्याशी अलीकडं खानदेश आहे. पलीकडं निमाड प्रांत आहे. आज हा खांडवा-खरगोन जिल्हा आहे. याच्या वरच्या बाजूला विंध्य पर्वत आहे आणि याच्याकडेनं नर्मदा नदी वाहते आहे. बुऱ्हाणपूर खानदेशातून तापी नदी वाहते. तापी-नर्मदाच्या खोऱ्यात सातपुडा-विंध्याच्या बेचक्यात पूर्वी घनदाट जंगल पसरलं होतं.

दोनशे वर्षांपूर्वी ह्या निमाडात मराठेशाहीचा अंमल होता. निमाडच्या उत्तरेला होळकरांचा मुलूख होता.

पूर्वेला भोसल्यांचं राज्य होतं.

डोंगर आणि जंगलात आदिवासींची वसती होती. ह्यात भिल्लं राहत होते. गोंड होते. पावरा, दुबळा, भिलोला धानका, कोकणी, वारली, डांगी, डुंगरी, मवाली, रावळ, वसावा, गारसिया या जमाती होत्या. भिल्ल जमातीच्या ह्या पोटजाती होत्या. हे भिल्ल डोंगराळ भागात राहत. जंगलातील उपलब्ध कंद-फळांवर आणि प्राण्यांच्या शिकारीवर त्यांची उपजीविका चाले. जंगलातील विपुल वनसंपत्ती आणि झोपडीवजा निवारा एवढीच त्यांची गरज होती. अनेक वर्षे जंगलातले हे आदिवासी सातपुडा विंध्याच्या परिसरात आनंदाने राहत होते.

मराठेशाहीचा अस्त झाला. बुऱ्हाणपूरची मुसलमान राजवट संपली, छोट्या-मोठ्या राजपूत सरदारांच्या जहागिऱ्या संपल्या आणि ब्रिटिश राजवट सुरू झाली. ह्या सुमारास येथील बेकार सैनिकांनी निमाड प्रांतात लूटमार सुरू केली. ह्या सैनिकांच्या टोळ्यांना पेंढारी म्हणत. ब्रिटिशांनी ह्या पेंढाऱ्याच्या विरुद्ध मोहीम उघडली. हळूहळू त्यांचा उपद्रव कमी झाला.

सातपुडा-विंध्यातील भिल्ल उदरनिर्वाहासाठी आजूबाजूच्या गावात चोऱ्या करीत. लूटमार करीत. अशा अनेक टोळ्यांना काबूत आणण्यासाठी कॅप्टन औट्रम नावाच्या अधिकाऱ्यानं एक योजना आखली. ह्या भिल्लांना त्याने नोकरी देऊ केली. भिल्ल पलटण स्थापन केली. तनखा आणि नोकरीच्या आमिषानं काही भिल्ल यात

सामील झाले. ह्या पलटणीचा उपयोग उपद्रवी भिल्लांच्या टोळ्यांचा बीमोड करण्यासाठी उपयोग करावा, अशी कॅप्टन औट्रमची योजना होती; परंतु काही भिल्ल स्वाभिमानी होते. करारी होते. या शूर लढवय्या आणि जंगलात मुक्तपणे जगणाऱ्या भिल्ल नायकांनी नोकरीच्या निमित्ताने इंग्रजांना शरण जाण्यास नाकारलं. जे नोकरीवर लागले, त्यांनी पुढे शरणागती झिडकारली. पुन्हा मुक्तपणे डोंगरदऱ्यात फिरू लागले. इंग्रज आणि भिल्ल टोळी नायकांचा हा लपंडाव अनेक वर्षं सातपुड्याच्या दक्षिणेकडील खानदेशात आणि उत्तरेकडील निमाडमध्ये सुरू होता.

काही काळ एखाद्या भागात शांतता निर्माण झाली असे भासे, अधिकारी गाफील होत, याच वेळी एखादा भिल्ल नायक जंगलातून डोकं वर काढी, जवळच्या पोलीस चौकीवर हल्ला करून पसार होई. हा पाठशिवणीचा खेळ अनेक वर्षं सुरू होता.

जंगलाच्या आजूबाजूला गावं होती. गावातली माणसं शेती करत होती. शेकडो वर्षे गावरहाटीचं जीवन सुरळीत चालू होतं. तापीच्या काठी त्या काळात घनदाट जंगल होतं. या काळात ब्रिटिशांनी जंगलतोड करून पडीक जमीन शेतकऱ्यांना कसायला लावली. शेतीचा कर पैशाच्या रूपानं सरकारकडे भरला पाहिजे, असा जाचक कायदा सुरू केला. पडीक जमिनीचा सारा सरकार दरबारी भरण्याची सक्ती केली. ह्यातून गावगाड्याचे संबंध हळूहळू बदलू लागले.

आजूबाजूचं जंगल तोडण्यासाठी मजुरांची आवश्यकता होती. यासाठी आदिवासी शेतमजुरांना कामाला लावलं. याचा परिणाम गावाभोवतालची जंगलतोड मोठ्या प्रमाणात झाली. जंगलातले आदिवासी भिल्ल यांच्या नैसर्गिक जगण्याचा प्रश्न निर्माण झाला. ते शेतकऱ्यांकडं गडी-मजूर म्हणून काम करू लागले आणि काही बाजूच्या डोंगरदऱ्यात निवाऱ्यासाठी सरकले.

जंगल आणि डोंगर हे आदिवासी-भिल्लांचं वर्षानुवर्षे राहण्याचं क्षेत्र होतं. जंगलावर त्यांचीच मालकी होती. इंग्रज सरकारनं जंगलचा कायदा केला. जंगल आणि डोंगरावर सरकारची मालकी झाली. जंगलातलं लाकूड तोडणं गुन्हा झाला. फळं-पानं तोडण्यास मनाई झाली. जंगलात राहणारे आदिवासी-भिल्ल बेघर झाले. निराधार आदिवासींच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला. पूर्वी आदिवासी लाकूडफाटा शेजारच्या गावी विकीत. कंद-मुळं, डिंक गोळा करीत, ह्यातून थोडीफार गरज भागे. ह्या गोष्टींवर सरकारनं बंदी घातली. लाकूड तोडणं चोरी झाली. त्यासाठी कडक शिक्षा केली जाऊ लागली.

येथील चांगल्या जमिनी गावातल्या श्रीमंत लोकांनी बळकावल्या होत्या. ही मंडळी सावकारी करीत. ह्यांच्या शेतावर गरीब मजूर सालदार म्हणून राबत. ह्यात आदिवासी-भिल्लंही असत. ह्या मजुरांची स्थिती हलाखीची होती. मजुरीची रक्कम कमी असे; सणासुदीला आणि लग्नकार्याला पैसा अडका लागे. मालकाकडं कर्ज मागण्याशिवाय दुसरा मार्ग नसे. ही कर्जाची रक्कम तो आयुष्यभर फेडू शकत नसे. बरेचदा आजोबाचं कर्ज फेडण्यासाठी नातवालाही मालकाकडं राबावं लागत असे.

मोठे शेतकरी स्वत: जमीन कसत नसत. जमिनीचा तुकडा गरजू माणसाला कसायला देत. याच्या मोबदल्यात ठराविक रक्कम आकारली जाई. ह्याला खंड म्हणत. खंडाची वसुली धान्याच्या रूपात खळ्यात जमा केली जाई. जमीन कसणाऱ्याला कुळ म्हणत. शेत पिकलं नाही तरी कुळाची रक्कम चुकायची नाही. ह्यामुळं कुळ म्हणून राबणारे गरीब हलाखीचे दिवस जगत होते आणि हे श्रीमंत शेतकरी ह्या कसणाऱ्याचं शोषण करत होते. मालक आणि सावकाराच्या दावणीला बांधलेल्या भोळ्या अडाणी आदिवासी भिल्लांचं जीवन होतं.

खानदेशात बुऱ्हाणपूरच्या पश्चिमेला सातपुड्याच्या रांगेत पाल हे गाव आहे. पालचं जंगल घनदाट होतं.

पालवरून उत्तरेकडं एक रस्ता गेला होता. हा रस्ता फार जुना होता. पाच-सहाशे वर्षांपासून वापरात होता. या काळात वाहतूक घोड्यावर चालायची. गाढवाच्या पाठीवर माल लादला जायचा. खानदेशातून उत्तरेकडं जायला हाच रस्ता होता. रस्त्याच्या कडेनं घनदाट जंगल होतं. माणसं टोळीटोळीनं प्रवास करायचे. प्रवासाची फारशी साधनं नव्हती. रस्ते पक्के नव्हते. कच्चे रस्ते म्हणजे पाऊलवाटच. सपाट रस्त्यावरून बैलगाड्या चालत.

इंग्रजाचं राज्य देशभर पसरलं होतं. काही प्रांतांत भारतीय राजांची आणि सरदारांची हुकूमत होती. ते राजे संस्थानिक इंग्रजांचे मांडलीक होते. सातपुडा खालच्या खानदेशावर इंग्रजी अंमल होता. पलीकडं होळकर महाराजांचं संस्थान होतं. पूर्वेकडं अचलपूरच्या नबाबाची जहागीर होती. निमाड भागही इंग्रजांच्या ताब्यात होता. खांडवा हे जिल्ह्याचं मुख्य ठिकाण होतं. खांडवापासून पस्तीस किलोमीटर अंतरावर घाटाखेडी नावाचं छोटं संस्थान होतं. ठाकूर घराण्याच्या राजपूत राजाची इथं सत्ता होती.

पालच्या उत्तरेला डोंगराची एक रांग गेली आहे. या डोंगरात सुक्ता नदीचं खोरं आहे. ही नदी घाटाखेडी संस्थानातून वाहत होती आणि जवळच बिरडा नावाचं गाव होतं.

बिरडा गावात भाऊसिंग राहत होता. तो भिल्ल होता. तो मूळचा पोखर गावचा राहणारा होता. पोखरगाव बिरडाच्या उत्तरेला आठ-दहा कि. मी. वर होतं. गावी भाऊसिंगच्या वडिलांची थोडी जमीन होती.

भाऊसिंगचे वडील गरीब होते. एके वर्षी त्यांना अडचण पडली. पोखरच्या पाटलांकडून कर्ज उचलले. कर्जापोटी जमीन गहाण ठेवावी लागली. कर्जाच्या व्याजात बाप पाटलांकडं राबत होता. मूळ कर्ज मात्र तसंच होतं. बाप मरून गेला. कर्ज आणि व्याजात पाटलांनी जमीन हडप केली.

जमीन गेली. भाऊसिंगनं पोखर गाव सोडलं. पोट भरण्यासाठी बिरडा गावी आला. मोलमजुरी करू लागला. सोबत त्याची पत्नी होती. जिवणी तिचं नाव होतं.

भाऊसिंग कष्टाळू होता. खूप मेहनत करायचा. तो जनावरांचा पारखी होता. गुरांच्या आजारांचा त्याचा अभ्यास होता. जंगलातल्या जडीबुटीचं औषध द्यायचा. आजारी जनावरांना आराम पडायचा. लोक म्हणत, त्याच्या हाताला गुण आहे.

भाऊसिंग आणि जिवणी, पाटलाची जमीन खंडानं करू लागले. पाटलाकडं खूप जमीन होती. जमिनीच्या मोबदल्यात ठराविक रक्कम ठरविली होती. ह्या रकमेची वसुली खळ्यावर धान्याच्या स्वरूपात वसूल केली जाई.

भाऊसिंग पाटलाच्या शेतात राबू लागला. घाम गाळू लागला. खंडाच्या रकमेची तोंडमिळवणी करताना ओढाताण होत होती. कधी पाऊस वेळेवर यायचा नाही. रान पिकायचं नाही. धान्य कमी व्हायचं. मालक मात्र खळ्यावर धान्य भरून नेई.

भाऊसिंगची तोंडमिळवणी होत नव्हती.

भाऊसिंग जिवणीला एक मुलगा होता. त्याचं नाव तात्या. तात्या चारचौघांसारखा होता. आई-बापामागं शेतात जाई. जंगलात फिरे. गावातल्या पोरात खेळे.

तात्यानं बांबूचा तिरकमटा केला होता. झुडपांवर बसलेली पाखरं तो बाणानं टिपायचा. झाडावर सरसर चढायचा. फळं तोडायचा. सोबत्याला द्यायचा. जवळच्या नदीत डोह होता, त्यात तो मनसोक्त पोहायचा.

भाऊसिंग काळ्या मातीत राबत होता. पण बरोबरी होत नव्हती. धान्य पिकलं नाही तरी मालक खंडात सूट देत नव्हता. दोन वेळेच्या खाण्यासाठी मालकाकडं हात पसरावे लागत.

अशा परिस्थितीनं भाऊसिंग जेरीस आला होता.

✪

# बापाची जमीन कर्जापोटी गेली

दोन-तीन वर्षं पाऊस पडत नाही. पडला तरी कमी पडतो. या वेळी शेतात धान्य नीट उगवत नाही. जनावरांना पुरेसं पाणी मिळत नाही. माणसं पाण्यासाठी पायपीट करतात. या स्थितीला आपण दुष्काळ पडला म्हणतो.

भाऊसिंग पाटलाची जमीन खंडानं करीत होता. या काळात वारंवार दुष्काळ पडू लागला. पाऊस नसल्यानं शेत पिकलं नाही, मालकाची खंडाची रक्कम देता आली नाही. मालक तगादा करू लागले. शिव्या देऊ लागले. प्रसंगी मारहाण होऊ लागली.

भाऊसिंग अर्धपोटी राहत होता. जंगलातील कंदमुळं खात होता. त्याची बायको जंगलातून फळं आणायची. नवरा आणि पोराच्या दोन वेळची सोय करीत होती. जंगलातली तिची वणवण वाढली. अर्धपोटी जिवणीची तब्येत बिघडत गेली. तिनं अंथरूण धरलं. भाऊसिंगनं झाडपाल्याचे उपचार केले. भगत-देवलाशाला दाखवले. ती पुन्हा उठलीच नाही.

डोळ्यादेखत बायको गेली. भुकेनं तिचा बळी घेतला. मालकाचा पैशाचा तगादा चालूच होता. धडधाकट भाऊसिंग परिस्थितीनं खचून गेला. काळजीनं खंगू लागला होता. मनात झुरत होता. डोळ्यासमोर कोवळ्या वयाचा तात्या होता. मुलाच्या काळजीनं त्याच्या पोटात तुटू लागलं.

तात्या सगळं बघत होता. बापाची उलघाल बघवत नव्हती. आईचं मरण डोळ्यासमोरून हलत नव्हतं. उपासमारीनं आई गेली. मालकाच्या तगाद्यानं बाप खचला. दु:ख विसरण्यासाठी दिवसभर दारू पीत होता. बायको गेल्याचं दु:ख, मालकाचा धाक व येता दिवस कसा जायचा? पुढचा रस्ता दिसत नव्हता. यातच भाऊसिंगची तब्येत बिघडत गेली. त्यानं अंथरूण धरलं. बापा झुरत गेला.

पोरवयाचा तात्या सावरला. परिस्थितीनं त्याला शहाणं केलं. त्याच्यात जबाबदारीची भावना वाढत गेली. बापाला सांभाळलं पाहिले. बापाचं कर्ज फेडलं पाहिजे, या विचारानं तो मालकाकडं आला.

'बापाचं कर्ज मी फेडतो' म्हणून पाटलाच्या शेतावर राबू लागला.

तात्या भोळा होता. स्वभावानं सरळ होता कोणावरही चटकन विश्वास ठेवायचा. दिसायलाही साधा होता. चारचौघात डोळ्यात भरण्यासारखा तो नव्हता. उंची सर्वसाधारण होती. पाच-सव्वापाच होती. हडकुळी अंगयष्टी होती. चेहरा बारीक आणि उभार होता. कान चेहऱ्याच्या मानानं मोठे वाटत. मान बारीक होती. थोडी उंच होती. गाल उतरलेले होते. हनुवटी दबलेली होती. नाक चपटे होते. भुवयावर थोडेच केस होते. मिशा भुऱ्या होत्या. डोळे बारीक होते. डोळ्यांचा रंग मात्र घारा होता. पाणीदार डोळे उठून दिसत होते. तोंड बारीक असलं तरी ओठ मोठे होते. चेहऱ्यावर मोठाले कान चिकटल्यासारखे दिसत होते.

किशोरवयाच्या तात्यात नायकाचे गुण दिसू लागले. त्याच्या वयाच्या मुलात तो खेळत होता. ह्यात तोच पुढाकार घेई. त्यांचा नायक बने. त्याचे मित्र त्याला मान देत. भिल्ल मुलांबरोबर इतरही मुलांशी त्याची दोस्ती होती. जंगलात मुलांचा खेळ रंगात येई. शक्तीपेक्षा युक्तीत तात्या वरचढ होई. शक्तीपेक्षा युक्तीने तो काम करी.

भिल्ल जंगलाचे रहिवासी. तिरकमठा हे त्यांचं शस्त्र. सोबत छोटी कुऱ्हाडही. त्याला तंग्या म्हणत. ह्या पारंपरिक विद्येत तात्या तरबेज झाला होता. तिरकमठा चालवी. तो उत्तम भालाफेक करायचा. शेताच्या कामात तो पारंगत झाला होता. भिल्लांना नाचगाण्यांचा शौक होता. तात्याला नाचगाणं आवडायचं.

## तात्याची बहादुरी

असाच एक दिवस तात्या मालकाच्या शेतात होता. बैल बांधाला चरत होते. नांगरट सुरू होती. तात्यानं बैल हाकून आणले. नांगराचे शिवलटे बैलांच्या मानेभोवती अडकवले. हाक हाक करून बैलांना हाकारले. बैल नांगर ओढू लागले. फाळाने माती चिरली जाऊ लागली. जमीन गाभुळली होती. बैलांना नेट पडत नव्हता.

न्याहारीची वेळ झाली. तात्यानं झालेलं काम बघितलं. पाटाभर रान नांगरून झालं होतं. नांगर सोडावा, असा त्यानं विचार केला. गावाच्या दिशेनं गलका ऐकू आला. शेत गावापासून जवळ होतं. त्यानं आवाजाच्या दिशेनं पाहिलं. न राहवून तो आवाजाच्या रोखानं पळत गेला.

गावाच्या वेशीजवळ माणसांची गर्दी होती. एक रेडा फुसफुसत उधळत होता. माणसं घाबरून इकडं-तिकडं धावत होती. तात्यानं अंदाज घेतला. तो पुढं आला.

तात्यानं चटकन रेड्याची दोन्ही शिंगं दोन्ही हातांनी पकडली. फुसफुसणारा रेडा सावध झाला. तात्या आणि रेड्याची झुंज सुरू झाली. गर्दीतून भीतींचे आवाज आले.

तात्यानं रेड्याला जखडून टाकलं. रेडा दमला होता. त्यानं शिताफीनं त्याची शिंग पिळली. रेडा पालथा पडला. बाजूची माणसं धावली. रेड्यावर तुटून पडली.

तात्या बाजूला झाला. त्याची बहादुरी बघून सगळे थक्क झाले. तात्याची बहादुरी पाटलांच्या कानावर गेली. गेले दोन वर्षं पुरेसा पाऊस नव्हता. शेतात पीक आले नव्हते. तात्याची खंडाची रक्कम देणं बाकी होती. पाटलांनी तात्याची खबर ऐकली. त्यांना आनंद झाला नाही. मनातून राग उफाळून आला. माणूस पाठवला. पैशाची मागणी केली.

भाऊसिंगची तब्येत आणखी बिघडत गेली. मालकांचा तगादा चालूच होता. शेतात धान्य नव्हतं. अंथरूण धरलेला भाऊसिंग पोराला म्हणाला, 'इथं काई खरं नाय पोरा आपलं. पिराचं पोखर आपलं गाव. जमिनीचा तुकडा हाय. सद्या शिवबा पाटील करतु.'

आजारी भाऊसिंग खंगत गेला. तो पुन्हा उभा राहू शकला नाही.

आई गेली. आई मागून बापही गेला. तात्या पोरका झाला. आई-बापाचं छत्र उडून गेलं. बिरडा गावात मन रमेना. मालकाचा तगादा थांबत नव्हता.

काय करायचं या गावात राहून?

बापानं सांगितलं होतं. पोखरला थोडी जमीन आहे. त्या तुकड्यावर काम करता येईल.

## साधाभोळा तात्या गुन्हेगार ठरविला

तात्या पोखरला आला. पोखर बिरडाच्या उत्तरेकडं होतं. छेगाँव पोलिस स्टेशन जवळ होतं. यात आठ मैल अंतर होतं. तात्या पोखरला आला त्यावेळी तीस वर्षांचा होता. पोखरच्या भिकीशी त्याचं अगोदरच लग्न झालं होतं. भिकीचा बाप पोखरचाच होता.

तात्या शिवबा पाटलांना भेटला. भाऊसिंग गेल्याचं पाटलांना समजलं होतं. भाऊसिंगच्या दु:खाचं पाटलानं नाटक केलं. तात्याबद्दल सहानुभूती दाखवली.

शिवबा पाटील गोड गोड बोलत होते. साध्या-भोळ्या तात्याला त्यांनी कामाला ठेवलं. तो पाटलांच्या शेतावर काम करू लागला. बापाच्या मृत्यूचं दु:ख

ताजं होतं. तात्यानं पाटलाकडं विषय काढला. बापाची जमीन त्याला हवी होती. पाटलांनी उडवा-उडवीची उत्तरं दिली.

शिवबा पाटील म्हणाले, ''तात्या तुझ्या बापाची जमीन आहे; परंतु तुझ्या आजोबांनी कर्ज घेतलं. त्यातली एक दमडी फेडली नाही.''

''मी फेडतो बापाचं रीन.'' तात्या म्हणाला.

''ठीक आहे'' हसून पाटील म्हणाले.

तात्याच्या लवकर लक्षात आलं. पाटलांनी त्याची जमीन बळकावली आहे.

तात्या गोंधळला. त्याच्या मनात वादळ सुरू झालं. मेहनत करावी अशी इच्छा होती. काळ्या आईत राबावं वाटत होतं. बापाचं कर्ज फेडायची त्याची तयारी होती. पाटलांचा इरादा मात्र वेगळाच दिसू लागला.

पोखरला तात्याच्या आणखी ओळखी झाल्या. नवीन मित्र झाले. एकानं तात्यास भरीस घातलं. तुझी जमीन आहे. पाटलांचा बेत चांगला नाही. पाटलाविरुद्ध तालुक्याला अर्ज कर. सरकार तुझ्या अर्जाचा विचार करील.

तात्या भोळा होता. त्यानं मित्राचं ऐकलं. त्याच्या सोबत खांडव्याला गेला. अर्ज केला. पुढं तात्याच्या विरुद्ध निकाल लागला.

गावातले पाटील तात्याच्या विरुद्ध होते. पटवाऱ्यांची पाटलांना साथ होती. खांडव्याचे मायबाप सरकारही पाटलांच्या बाजूला गेले.

साध्या सरळ तात्याच्या मनात गोंधळ उडाला.

काय करावं आता? कोणाकडं मदत मागावी?

प्रामाणिकपणे साधं जीवन जगावं, असं त्याला वाटत होतं.

आपल्या शेतावर मजूर म्हणून राबावं, अशी त्याची इच्छा होती. आजोबाचं कर्ज फेडावं, त्याला वाटतं होतं.

पाटलानं हे रस्ते बंद केले होते. वरच्या सरकारनं पाटलालाच मदत केली होती.

रात्रभर तात्याला झोप आली नाही. आपल्यावर पाटलानं अन्याय केला. सरकारनं पाटलांना मदत केली. गरिबाचा जगण्याचा हक्क नाकारला त्यांनी.

पहाटे तात्या उठला. त्यानं मनाचा निश्चय केला होता. हाती दंडूक घेतलं. शेतात आला. शेतावर पाटलांचा गडी काम करीत होता. तात्यानं त्या माणसाला बदडून काढलं. आपल्या शेतातून पळवून लावलं.

तात्याच्या वागण्यानं पाटील हुशार झाले. तात्याला वेळीच धडा शिकवण्याचं त्यांनी ठरविलं. पोखरजवळ भुईफळ गाव होतं. हिंमत पाटील मालगुजार होते. हिंमत आणि शिवबा पाटलाचं नात होतं. हिंमत पाटलांची पोलिसात ऊठबस होती.

शिवबा पाटलांनी तात्याविरुद्ध तक्रार नोंदवली. पोलीस आले. तात्याला पकडून घेऊन गेले. कोर्टात हिंमत पाटलांनी साक्ष दिली. तक्रार खोटी होती. साक्षही खोटी होती. कोर्टानं निकाल दिला.

तात्याला दोन वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली. तात्याचे मित्र मदतीस आले. वरच्या कोर्टात तात्यासाठी अपील केलं. शिवबा पाटलानं चोरी व उचलेगिरीचे आरोप केले होते. सत्र न्यायाधीशांनी खालच्या कोर्टाची शिक्षा रद्द केली.

निकाल ऐकून पाटलांना समाधान झाले नाही. हिंमत पाटलांनी पुन्हा कुभांड रचले. तात्याविरुद्ध पाटलांनी आणखी तक्रार पोलिसात केली. पोलीस आले. तात्याला अटक केली. साक्षी पुराव्याचे नाटक झाले. या वेळी ही हिंमत पाटील पुढं होते.

वाईट वर्तणूक आणि चोरीचे आरोप ठेवले होते. निरपराध तात्याला गुन्हेगार ठरवलं. साक्षीपुराव्याने आरोप सिद्ध झाले. एक वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. तात्याला नागपूरच्या तुरुंगात रवाना केलं.

तात्याचा काळ दीडशे वर्षांपूर्वीचा होता. त्या काळी राजे भारतीयच होते; पण ते इंग्रजांचे मांडलिक होते. सर्वत्र इंग्रजांचं राज्य होतं. इंग्रज त्यांना मदत करणाऱ्यांचे हित पाहत. श्रीमंत सावकार हुशार होते. गावातले पाटील-मालगुजार साहेबांचे हित पाहत. गरीब अडाण्याला अडवणूक करीत होते. पोलीस मालगुजार-पाटलांचे हस्तक होते. ते सांगत तसे अधिकारी करत. अशा कोंडीत तात्या सापडला. कायद्यानं गुन्हेगार ठरला.

# पाटलाची यशोदा आणि तात्यावर आळ

तात्याला शिक्षा झाली. नागपूर जेलमध्ये होता. तेथे तो एकच विचार करत होता. माझं काय चुकलं? चुकी झाली तर सरकार शिक्षा करते. चोरी केली, पोलीस डांबून ठेवतात, फटके मारतात हे माहीत होतं. तो ऐकून होता. गुन्हेगारांना शिक्षा करणं सायेबाचं कामच होतं.

आपला काय गुन्हा आहे? शिवबा पाटील गोड बोलत होते. शेतावर काम कर म्हणाले. मग जमीन का देत नाहीत? वकील साहेब म्हणाले, माझं वागणं वाईट आहे. मी चोरी केली. हिंमत पाटलानं हे कोर्टात सांगितलं.

शिक्षा भोगून झाली. तात्या जेलबाहेर आला. पोखरच्या काळ्याआईची ओढ होती. बायको-पोराची आठवण येत होती. या वर्षात त्यांचे हाल झाले असतील. बायकोला भाऊ होता. त्यानं मदत केली होती.

तात्या पुन्हा पोखरला आला.

पोखर गावात एक पीर होता. त्याला नवगजा पीर म्हणत. गावाच्या उत्तर भागात हे ठिकाण होतं. बाजूला मोठं चिंचेचं झाड होतं. त्याच्या बाजूला बेलाचं झाड होतं.

नवगजाबाबा सुफी संत होते. बाबाची मजार लांब आकाराची होती. नऊ गज लांबीमुळं त्यांना नवगजा म्हणत. बाबाची पोखर गावावर कृपा होती, अशी लोकांची श्रद्धा होती. अडचणीच्यावेळी ते बाबा मदत करतात, या भागाचं रक्षण करतात, संकटकाळी धावून येतात असं सगळे मानत होते.

बाबाची मजार कच्ची होती. पांढऱ्या मातीची बांधली होती. त्यावर भक्त चादर चढवत. काम व्हावं म्हणून नवस करत. काम सफल झालं की मग ते मजारवर नवी चादर चढवत. हा कपडा न मोजता आणत. दुकानदारास बाबाची चादर मागत. दुकानदार कपडा न मोजता देत असे. न मोजलेला कपडा मजारीवर पुरायचा, अशी लोकांची श्रद्धा होती.

मजारीच्या मागच्या बाजूला बेलाचं झाडं होतं. त्याच्या बगलेत पांढरी कन्हेर होती. मजारीसमोर रस्ता होता. तो गावात जात होता.

तात्या नवगजा बाबाजवळ राहू लागला. गावातले काहीजण मित्र झाले होते. त्यात नहाल होता. नहालला लिहिता वाचता येत होतं. तात्यावर अन्याय झाला. नहालला तात्याची सहानुभूती वाटत होती. खांडव्याला तात्यानं अर्ज केला होता. यावेळी नहाल सोबत होता.

तात्यानं नवगजा बाबाजवळ नवस केला. माझी काळीआई मला परत मिळू दे.

तात्या पुन्हा शिवबा पाटलाकडं गेला. त्यानं शेतीचा विषय काढला. आजोबाचं कर्ज फेडतो म्हणाला. पाटील हुशार होते. कावेबाज होते. त्यांनी तात्याला संमती दिली. भाबडा तात्या पाटलांच्या शेतावर पुन्हा राबू लागला.

पाटील तात्याशी गोड बोलत होते. शेतावर राबवून घेत होते. तात्याला नवा हुरूप आला होता. तो मनाशी स्वप्न पाहू लागला. त्यानं शेत नांगरलं. औत धरलं. पावसानं वेळीच माया दाखवली. पीक तरारून आलं. धान्याची मोठ्ठी रास तयार झाली. मालकाला खळ्यावर धान्य भरून दिलं. पाटलाच्या कर्जातून मुक्त झाला होता.

तात्या स्वप्न रंगवीत होता. घाम गाळीत होता.

शिवबा पाटलांना एक मुलगी होती. तिचं नाव यशोदा. बालपणीच तिचं लग्न झालं होतं. दुर्दैवानं ती बालविधवा बनली होती. यशोदा स्वभावानं सरळ होती. तात्याची बायको भिकीशी तिची ओळख होती. दोघी बालपणीच्या मैत्रिणी होत्या. यशोदा तात्यापेक्षा आठ-दहा वर्षांनी लहान होती.

यशोदेला वडिलांचे डावपेच माहीत होते. तात्यावर वडील अन्याय करतात, त्याला खोटं सांगतात, त्याची फसवणूक करतात, हे तिला कळत होतं. तिला तात्याबद्दल सहानुभूती वाटू लागली. ती तात्याला भाकरी द्यायची. जमेल तेवढी मदत करायची.

वडिलांचं कारस्थान तिनं तात्याला सांगितलं. तात्या व यशोदाचे संबंध आहेत अशी गावात चर्चा सुरू झाली. माणसं कुजबुजू लागली. यशोदा पाटलाची पोरगी होती. तात्या भिल्ल जातीचा होता. भिल्लाला गुन्हेगार जातीचे समजले जाई. गुन्हेगार जातीच्या पोरानं अशी हिम्मत करावी? या प्रेमसंबंधाचे वादळ उठले. गावाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला.

गावकऱ्यांनी निर्णय घेतला. यशोदेच्या वडिलांना जातीबाहेर टाकलं. गावाची इज्जत गेली, असं माणसं म्हणू लागली. गावात काही तरुण पोरं होती. त्या पोरांचा यशोदेवर राग होताच. त्यांना ही संधी मिळाली. तात्याला धडा शिकवावा. मारहाण

करावी. पोरांची कुणकुण यशोदेनं ऐकली. तिनं तात्याला सावध केलं.

तात्यानं गावकीला त्रास दिला नव्हता. यशोदेच्या संबंधाचा त्याच्यावर आळ घेतला होता. हा अन्यायच होता. तात्याला या लोकांचा राग येऊ लागला. यशोदेच्या शत्रूला धडा शिकविण्याचं त्यानं ठरविलं. त्यांच्या म्हशीचे कान कापले, विरोधकांना भेट दिले.

पाटलांना गावकऱ्यांनी जातीबाहेर टाकलं होतं. त्या लोकांच्या दारी तात्या आला. यापुढं नीट वागा, नाहीतर घरं पेटवून देईल. त्यानं सर्वांना धमकावलं.

यशोदेचे विरोधक नरमले. त्यांनी नमतं घेतलं. शिवबा पाटलांनी शंभर रुपये दंड भरावा, गावकी त्यांना माफ करील असा तोडगा पुढं आला. पाटलांनी दंड भरला.

## दुसऱ्यांदा तुरुंगवास

पोखर गावात राहणं कटकटीचं होतं. तात्यानं नहालशी चर्चा केली. पुढचा त्रास त्यालाही नको वाटत होता. त्याने निर्णय घेतला. पोखर सोडायचं. बाजूला हिरापूर गाव होतं. ते होळकर मुलुखात होतं. पोखर खांडव्यात होतं. इथं गोऱ्या साहेबाचं राज्य होतं.

तात्या हिरापूरला आला. मोलमजुरी करू लागला. बायको-पोरांसोबत राहू लागला. साधं जीवन जगण्याची धडपड करीत होता.

हिरापूरला तात्याला एक मित्र मिळाला. त्यांची ओळख झाली. दोघांची लवकरच गट्टी जमली. तो मित्र उंचा-पुरा होता. काळ्या पहाडासारखा धिप्पाड होता. त्याचं नाव बिजनिया. जवळच खजुरी गाव होतं. बिजनिया तिथला राहणारा होता.

हिरापूरजवळ बारी गाव होतं. त्या गावात चोरी झाली. पोलिस चोरीचा तपास करत होते. पोलिसांना तात्या-बिजनियाचा संशय आला. अटक करायला पोलिस आले. बेगुनाह बिजनियानं पोलिसांवर हल्ला केला. शेजारी तात्या होता. पोलिसांनी दोघांना पकडले. खांडव्याला घेऊन आले. कोर्टात केस सुरू झाली. बोरी गावच्या चोरीचा आरोप लावला. त्याचा पुरावा मिळाला नाही. चोरीचा गुन्हा सिद्ध झाला नाही. पोलिसांवर दोघांनी हल्ला केला. हा गुन्हा सिद्ध झाला. दोघांना तीन-तीन महिन्यांची शिक्षा झाली. बिजनियाला जबलपूरला पाठविलं. तात्याला खांडवा तुरुंगात पाठविलं.

दुसऱ्यांदा शिक्षा भोगून तात्या बाहेर आला.

दोन्ही वेळेस खोटे आरोप होते. खोट्या साक्षी झाल्या होत्या. सरकारनं त्याला गुन्हेगार ठरविलं होतं. प्रत्यक्ष त्याचा काही गुन्हा नव्हता.

मी गुन्हेगार नाही. माझी काही चूक नाही. तात्या सांगत होता. कोणी ऐकतं नव्हतं.

आता कुठं जायचं?

इंग्रज पोलिसांनी त्याला दोनदा अडकवलं. शिवबा पाटील आणि हिंमत पाटलांनी तक्रार केली होती. जमिनीचा विचार सोडून द्यावा, असं त्याला वाटू लागलं.

दूर जायचं त्यानं ठरविलं. तिथं पोलिस येणार नाहीत. पाटलांचा संबंध येणार नाही. या विचारानं तो सिआरो गावी आला. ते गाव होळकर राज्यात होतं. चारचौघांसारखं जगण्याची तात्याची धडपड चालली होती.

तात्या शेतात काम करी. बायको भिकी मजुरी करी. पोरगा किसन दुडुदुडु आईमागं पळू लागला. तात्याला आणखी एक मित्र मिळाला. त्याचं नाव दौल्या होतं. बिजनिया अधूनमधून भेटायला येई. तिघांच्या गप्पा होत असत.

सिआरो गावात तात्या रमू लागला होता. एके दिवशी पोखरचा जुना मित्र आला. मित्रानं खबर आणली होती. बाजूच्या गावात चोरी झाली होती. ज्याची चोरी झाली तो भिल्ल होता. सुभान त्याचं नाव होतं. सुभाननं पोलिस ठाण्यावर तक्रार केली. चोरीच्या वस्तू जेलीमकडे सापडल्या. तो शेजारच्या गावात राहत होता.

हिंमत पाटलांना ही गोष्ट कळली. ते जेलीमला भेटले.

''पोलिस तुला आत टाकतील. चोरीच्या वस्तू तुझ्याकडं सापडल्या. तुला मी वाचवतो. ह्या वस्तू तात्यानं दिल्या, असं पोलिसांना सांग.'' हिंमत पाटील जेलीमला म्हणाले.

हिंमत पाटलाला तात्याची भीती वाटत होती. त्याला पुन्हा आत टाकावं म्हणून त्यांनी डोकं चालविलं. तात्याला यात अडकवावं. मग जोखीम राहणार नव्हती. जेलीमला योजना पसंत पडली.

जेलीमनं पोलिसात बयान दिलं, त्या वस्तू तात्यानं आणून दिल्या होत्या. पोलिस तात्याकडं येत आहेत, ही खबर पोखरच्या मित्रानं अगोदरच दिली.

दोन वेळा तात्या तुरुंगात गेला होता. खडतर शिक्षेचा अनुभव घेतला होता. आता पुन्हा पोलिसांनी पकडलं तर!

तात्या हुशार झाला. पोलिसांच्या भीतीनं गाव सोडलं. बाजूला सातपुड्याच्या रांगा होत्या. घनदाट जंगल होतं. त्यानं जंगलं-दऱ्यांचा आश्रय घेतला.

पोलिस त्याच्या मागावर होते. त्यांचा ससेमिरा चुकविण्यासाठी तो फिरत होता. एका ठिकाणाहून दुसऱ्या जागी भटकंती सुरू झाली. बरोबर बिजनिया होता. दौल्या होता. आणखी दोन-तीन मित्र होते.

रानोमाळ ते फिरत होते. शेजारच्या गावातून भाकरी मागून आणायचे. एखादा दिवस उपवास घडायचा. खायला मिळायचं नाही. पोटात आग भडकायची. खाण्यासाठी छोटी मोठी चोरी करू लागले.

पाटलामुळं ही वणवण सुरू झाली होती. पाटलांना मालगुजार हिंमत पाटील मदत करत होते. पोलिस त्यांचं ऐकत होते. या सर्वांनी त्याच्यावर अन्याय केला होता.

किती दिवस हे सहन करायचं? तात्या विचार करू लागला. त्याचे साथीदार भडक डोक्याचे होते. पाटलांनी आपल्यावर अन्याय केला, त्यांना धडा शिकविला पाहिजे, त्याशिवाय ते गप्प बसणार नाहीत. बिजनिया सांगायचा.

साध्या भोळ्या तात्याला पटू लागलं. तो दुसऱ्यावर विश्वास टाकायचा. मागच्या दोन अनुभवानं तो थोडा बदलला होता. प्रत्येकाकडं तो संशयानं पाहू लागला.

तात्याचा स्वभाव मवाळ होता. त्याला चटकन राग येत नव्हता. आता तो हळूहळू कठोर बनू लागला. पोखरवाल्यांनी त्याला त्रास दिला होता, हे तो विसरू शकला नाही.

तात्याचा मुक्काम सुक्ता नदीकाठी होता. नदीचं खोरं खोल होतं. बशीच्या आकाराच्या डोंगररांगा पसरल्या होत्या. मधून नदी वाहत होती. नदीकाठी शिवाबाचं मंदिर होतं. झाडांच्या गर्दीत मंदिर झाकून गेलं होतं.

शिवाबाबा साधु पुरुष होते. शंभर वर्षांपूर्वी ते होऊन गेले होते. ते या भागात आले आणि इथंच त्यांनी समाधी घेतली होती. समाधी शेजारी जगदंबेचं मंदिर होतं. शिवाबाबांना जगदंबा प्रसन्न होती.

निमाडची माणसं शिवाबाबाच्या दर्शनास येत.

मनातली इच्छा शिवाबाबा पुरी करतो, अशी लोकांची श्रद्धा होती.

तात्या शिवाबाबाच्या दरबारात आला. बाबाचं दर्शन घेतलं. तात्या शिवाबाबा जवळच्या गुहेत राहू लागला. गुहेजवळ एक पाऊलवाट होती. ती पोखर गावाकडं जात होती.

तात्या विचार करीत बसला होता. पाऊलवाटेनं एक माणूस येत होता. तात्यानं माणसाला ओळखलं. तो पोखरचा होता. भिका पाटलाचा भाऊ काळू होता.

पोखरचा माणूस दिसताच तात्याचा राग उफाळून आला. तात्यानं झडप घातली. काळू पाटलाला पकडलं. साथीदाराच्या हवाली केलं. साथीदारांनी काळूला जेरबंद केलं.

तात्यानं एका साथीदाराला पोखरला पाठविलं. काळूला ताब्यात घेतलं. ही खबर गाववाल्यांना कळविली.

सहा दिवस काळू तात्याच्या ताब्यात होता. काळूचा भाऊ तात्याच्या मित्राकडं आला. नहाल तात्याचा चांगला मित्र होता. तात्याकडं मध्यस्थी करायला पाठवलं.

भिका पाटलानं नहालला जंगलात पाठवलं. तात्यासाठी शंभर रुपये पाठविले. नहालने तात्याची समजूत घातली. शंभर रुपयाच्या मोबदल्यात काळूची सुटका केली.

# तंट्याचे जेलमधून पलायन

काळू पाटील पोखरला परत आला. तात्यानं पोखरच्या माणसांना हात दाखवला होता. शिवबा पाटील सावध झाले. हिंमत पाटलांना काळजी वाटू लागली. तात्या मोकळा राहणं धोका आहे. तो आता गप्प बसणार नाही. त्याचा उपद्रव वाढेल.

तात्या त्यांना संकट वाटू लागला. हिंमत पाटील पाताळयंत्री होते. त्यांनी एक योजना आखली. शिवबापाटलांना सांगितली.

सरदार पाटील शिवबाचे भाऊबंद होते. त्यांचा मुलगा मोहन होता. हिंमत पाटलानं मोहनला जंगलात पाठवलं. तात्याचा शोध घेतला.

तात्या भेटताच मोहन रडू लागला.

''माझ्या घरचे माझ्याशी नीट वागत नाहीत. गावच्या लोकांनी तुझ्यावर अन्याय केला. त्यावेळी मी तुला सांगायला पाहिजे होतं. माझी चुकी झाली. चूक दुरुस्त करण्यासाठी मी आलोय. आता तुझ्याबरोबर इथं राहणार'' मोहन पुन्हा रडू लागला.

तात्यानं मोहनची व्यथा ऐकली. तो मूळचा साधाभोळा होता. मोहनचं बोलणं ऐकून त्याला वाईट वाटलं. त्यानं त्याच्यावर विश्वास ठेवला.

मोहन तात्यासोबत जंगलात राहू लागला. थोडे दिवस लोटले. एके दिवशी तात्या त्याला म्हणाला,

''तू पोखरला जा. माय-बापासंग राहा. आमच्या बरूबर ही वणवण कशाला करतुस.''

''तू माझ्याबरोबर चल. माझ्या बापाची समजूत घाल. पुन्हा परत ये.'' मोहन काकुळतीनं म्हणाला.

मोहन आग्रहानं बोलत होता. गोड भूलथापांना तात्या भाळला. एका साथीदाराला बरोबर घेतलं. मोहनसोबत पोखरला आला.

मोहनला पाहून सरदार पाटील आनंदले. ते तात्याशी गोड बोलले.

''मी आणि शिवबा पाटलांनी ठरविलं आहे. तुझ्या कटकटी संपवायच्या. तुला आता कोर्ट कचेऱ्या नाहीत. पोलिसांचा त्रास होणार नाही. उद्या काही

कागदपत्रांवर सह्या कर. सह्या झाल्या की तू मोकळा होशील.'' सरदार पाटील बोलले. त्यांच्या बोलण्यात सहानुभूती दिसत होती.

तात्याचा मित्र नहालही आला होता. त्याच्यासमोर सरदार बोलले होते. तात्यानं बोलण्यावर विश्वास ठेवला. कोर्ट-कचेऱ्याच्या कटकटी त्यालाही नको होत्या. पोलिसांचा ससेमिरा संपणार होता. त्याची जमीन परत मिळणार होती. शेवटच्या गोष्टीनं तो तयार झाला.

सरदार पाटलांच्या घरी आला. दारात पाय ठेवला. आत पोलिस दबा धरून बसले होते. त्यांनी झडप घातली. तात्याचे हात-पाय बांधले गेले.

मागच्या दारानं हिंमत पाटील पुढं आले. त्यांना आनंद झाला होता. त्यांनी मोहनचं अभिनंदन केलं.

तात्याला पोखरला अटक झाली. त्याच दिवशी दौल्या-बिजनियालाही पकडले. सर्वांना खांडव्याला आणले.

पुन्हा तात्या फसला होता. मोहनवर त्यानं विश्वास ठेवला. मित्र म्हणविणाऱ्यानं दगा दिला होता. हिंमत पाटलाचा यात हात होता.

पोलिस कोठडीत तात्या विचार करू लागला.

कोर्टात खटला उभा राहिला. साक्षीपुराव्याचं नाटक सुरू झालं. भुईफळच्या हिंमत पाटलांनी चोख काम केलं.

हिंमत खोटं सांगत आहे हे बघून तात्या खवळला.

''हिंमतदाजी, किती खोटं सांगणार हायेस. म्या भिल्ल हाय जातीचा. आता पस्तुर म्या गय केली. आता मातर पुढं गाठ हाय ह्या तंट्याची. सुटून आलो की सोय बगीन तुजी.'' तात्या गरजला. हिंमत पाटलांचा थरकाप उडाला. तोंड लपवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

साक्षी, पुरावे संपले. तात्या आणि दोन साथिदाराविरुद्ध गुन्हा शाबित झाला. न्यायाधीश उद्या शिक्षा सुनावणार होते. गुन्हेगार दोषी ठरले होते. आरोपींना रात्रीसाठी खांडवा जेलमध्ये पाठवलं.

तात्या, दौल्या आणि बिजनियासाठी ती काळरात्र होती. तुरुंगाच्या भक्कम कोठडीत ते डांबले होते. कोठडीच्या भिंती भक्कम होत्या. बाहेर उंच तटबंदी होती. हा तुरुंग बांधून पाचच वर्षं झाली होती.

तात्याचे विचार सुरू झाले.

आजची रात्र ही काळरात्र आहे. उद्या कोर्ट शिक्षा सुनावणार. कोणत्यातरी तुरुंगात रवानगी होणार. या अगोदर दोनदा हा अनुभव होता. आता तिसरी वेळ समोर येऊन ठेपली होती.

आता शेवटची संधी आहे. त्यानं विचार केला. आजूबाजूच्या बराकीचं निरीक्षण केलं. मागच्या भिंतीला एक खिडकी होती. दोन पुरुष उंच होती ती.

तात्यानं मनात योजना आखली.

बराकीतले इतर कैदी झोपी गेले होते.

त्यानं बिजनिया, दौल्याला इशारा केला. काम सुरू केलं. तात्या भिंतीशी वाकला. त्याच्या पाठीवर बिजनिया चढला. त्याच्या खांद्यावर दौल्या चढला. खिडकीजवळचा चुना नखानं टोकरू लागला. एक दगड मोकळा झाला. खिडकी ओढून बाहेर काढली. एकाच्या खांद्यावर दुसरा उभा राहिला. खिडकीच्या बोगद्यातून पलीकडं उतरले.

बाजूच्या बराकीचे कुलूप तोडले. पाच कैद्यांना बाहेर काढलं. तुरुंगाच्या बाहेरच्या तटबंदीजवळ आले.

धोतरांचा दोर बनविला. साथीदारांनी माणसाची शिडी केली. एकजण तटावर चढला. दोराच्या साहाय्यानं सगळे तटावर आले. एकेक पलीकडं उतरला. शेवटी तात्या राहिला होता.

तात्यानं ओरडून पोलिसांना आव्हान दिलं.

''ह्यो तंट्या चालला हाय. जो कोनी माईचं दूद पेलाला आसन, त्येंन मले पकडून दाकवावं.''

तात्याचा आता तंट्या झाला होता.

तंट्यानं गर्जना केली. तटावरून खाली उडी मारली. त्याच्या साथीदारानं त्याला अलगद झेललं. बाहेर अंधार होता. अंधाराचा फायदा घेऊन ते पसार झाले.

खांडवा जेलची धोक्याची घंटा वाजू लागली. पोलिसांची पळापळ सुरू झाली. पोलिसांचे धाबे दणाणले. सर्व पोलिस ठाण्यांना तारा गेल्या.

उजेडण्यापूर्वी तंट्या दूरच्या जंगलात पोहोचला होता.

एका रात्रीत तंट्यात बदल झाला होता. त्याच्या जीवनाला कलाटणी मिळाली. आतापर्यंत त्यानं सगळ्यांवर विश्वास दाखवला होता. पण सर्वांनी त्याला फसवलं होतं. तो खरं बोलत होता. समोरचे खोटं बोलत होते.

कशी ही जगाची रीत? माझं तर चुकत नाही ना! तंट्या सारखा विचार करू लागला.

बिजनिया म्हणायचा, हे लोक बदमाश आहे. सावकार आपल्याला लुटायलेत. मालगुजार पिळायलेत. पोलिस त्यांना साथ देत आहेत.

बिजनियाचं सांगणं पटत नव्हतं. वाटायचं, पाटील-मालगुजार मायबाप आपले. तेच मदत करतात. अडीअडचणीला धाऊन येतात. त्यांच्या बद्दल असा राग धरायचा?

बिजनियाचं बोलणं पटू लागलं तंट्याला. काळी आई भाकरीचा तुकडा होता. तोंडातला तुकडा पाटलानं हिसकावून घेतला. खोटा आरोप केला. जेलमध्ये तीन वेळेस डांबलं. हा अन्याय आहे. आता गप्प बसलो तर तो पुन्हा अडकवील. त्यांना धडा शिकवला पाहिजे.

धडा शिकवायचा म्हणजे काय करायचं? ती मोठी माणसं. त्यांच्याकडं पैसा आहे. पोलिस त्यांच्या ओळखीचे. गावातली माणसं त्यांच्याबरोबर. आपण सात-आठजण काय करणार?

तंट्या सारखा विचार करू लागला. साथीदारांशी बोलू लागला.

तंट्या एका गावातून दुसऱ्या गावात फिरत होता. तरुण साथीदार वाढू लागले. आता संख्या वीस झाली होती. जुने साथीदार येऊन मिळाले होते.

टोळी जंगलात फिरत होती. जवळच्या गावातून भाकरी मागून आणत होती. आटा मागत होते. जंगलातली फळं खात होती.

तंट्याचा जंगलात मुक्काम होता. एकदा भाकरी मिळाल्या नाहीत. आटा संपला होता. दोन दिवसांचा उपवास घडला होता. पोटात आग उसळली. भूक गप्प बसू देईना. दौल्या बाजूच्या गावात गेला. बंद घराचा कोंडा तोडला. आटा-धान्य घेऊन आला. नाइलाजानं चोरी करावी लागली.

सातपुड्याच्या पायथ्याशी तंट्याचा मुक्काम होता. जवळच सामपुरा गाव होतं. दौल्या गावात आला. नामा चांभाराचं घर लागलं. नामानं एक तलवार दिली. चाकू दिला. काही पायताने दिली.

बाजूला शिवना गाव होतं. हे होळकरांच्या हद्दीत होतं. तंट्या शिवनाच्या शिवारात मुक्कामाला होता. खांडव्याला डेप्युटी कमिशनर होते. त्यांना आव्हान देणारा निरोप तंट्यानं पाठविला. पोलिसांचा अवमान करणारा हा निरोप होता.

''मी पोलिसाची आज्ञा पाळणार नाही. तंट्याशी तुमची गाठ आहे.'' असा बेगुमानपणाचा संदेश होता.

पोलिसांचा अपमान करणारा तो निरोप होता.

पोलिस प्रमुखाला तंट्यानं आव्हान दिलं होतं. त्याच्या बंडाची ती सुरुवात होती.

तंट्याची टोळी सातपुड्यात फिरू लागली. चिरवेलीच्या सोनाराला लुटलं. त्यानं भाकरी दिल्या नव्हत्या. सुंदरेलचा पाटील तंट्याला ओळखत होता. बिजनिया त्याला माहीत होता. पाटलाचं गाव होळकर मुलखात होतं. तंट्या सुंदरेला आला.

पाटलानं तंट्याला सोळा रुपयांची मदत केली. हरवंसपुराला जेसू पाटील होते. पाटलानं तंट्याला शेतात आश्रय दिला. एक आठवडा ते तिथं होते. निघताना पाटलानं काही पैसे दिले.

तंट्या केळवणला आला. तिथं नबी बक्श मिस्त्री राहात होता. तो बंदूक व इतर शस्त्र विकायचा. त्याच्याकडून तंट्यानं एक बंदूक घेतली. एकोणावीस रुपये दिले.

खांडवा जेलमधून तंट्या पळाला होता. ही बातमी निमाडभर पसरली होती. पोलिस त्याला पकडण्यासाठी प्रयत्न करत होते. तंट्याच्या नावाचा सगळीकडं बोलबाला झाला होता. तरुणांना त्याचं आकर्षण वाटू लागलं होतं.

त्या दिवशी खांडव्याचा बाजार होता. तंट्या बाजारात आला. खांद्याला बंदूक होती, सोबत साथीदार होते. तंट्या आल्याची बातमी बाजारात पसरली. बाजारातले भिल्ल-आदिवासी तरुण धावू लागले. त्यांना बहादूर तंट्याला पाहायचं होतं.

तंट्या बाजारात उजळ माथ्यानं फिरू लागला. माणसं त्याच्याकडं कौतुकानं पाहू लागली. तरुण पोरांना त्याच्याबद्दल आदर वाटत होता.

तंट्या बाजारात आला. पोलिसांना उशिरा खबर लागली. ते जागे झाले. धावपळ सुरू केली. लवाजमा बाजारात पोहोचला. तोपर्यंत तंट्या फरार झाला होता. पोलिस तपासाचा वेग वाढला.

तंट्याला मदत करणाऱ्याला शिक्षा होईल. फर्मान निघालं.

## तात्याचा तंट्या झाला

एप्रिलचा महिना होता. उन्हाळ्याचे दिवस. महिना सुरू होऊन नऊ दिवस झाले होते. तंट्याचा मुक्काम खांडव्याजवळच होता. गावाच्या दक्षिण बाजूला बुटक्या टेकड्या होत्या. टेकड्यामधून बऱ्हाणपुराकडे रस्ता जात होता. रस्त्यात पन्हाळी नाला आडवा लागतो. नाल्याकाठी जंगल होतं. तंट्या साथीदारासह ह्या नाल्यात लपला होता.

काही दिवसांपूर्वी खांडवा बाजारात तो दिसला होता. पोलिसांनी तपासाचा वेग वाढविला होता. आजूबाजूच्या गावात दवंडी दिली होती. यामुळं तंट्या व साथीदार लपून बसले होते. शेजारी गावातून भाकरी आणता आल्या नाहीत. जंगलातल्या फळांवर गुजारा चालू होता. प्राण्याच्या शिकारीवर भागवावं लागत होतं.

दोन-तीन दिवस पोटभर भाकर मिळाली नाही. उद्या काहीतरी सोय केली

पाहिजे. तंट्या विचार करत होता. रात्र झाली होती. ती चांदणी रात्र होती. घुंगराचा आवाज ऐकू येऊ लागला. तंट्यानं आवाजाच्या दिशेनं पाहिलं. दूरवरून बैलगाडी येताना दिसली. बैलांच्या गळ्यातल्या घुंगराचा आवाज जवळ येऊ लागला.

गाडी जवळ आली. सामानानं गाडी भरलेली होती.

''कोनच्या गावाचं हाव पाव्हनं?'' तंट्यानं गाडीवानास विचारलं.

''सोनखेडीच्या धनू सावकाराची हाय. पोरीचं लगीन हाय. त्येचं सामान घिऊन चाललो'' गड्यानं सांगितलं.

सावकाराची गाडी?

तंट्याच्या मनात काहूर उठलं. आतापर्यंत तंट्याची फरफट झाली होती. ह्यात सावकाराचा मोठा वाटा होता. आजोबा सावकाराच्या जाळ्यात अडकले. सोन्यासारखी जमीन गेली. जमीन मागायला तो गेला. खोटे आरोप चिकटवले. जेलची हवा खावी लागली.

ह्या त्रासाला सावकारच जबाबदार आहे आणि सगळे सावकार सारखेच आहेत. त्यांनी मला लुटलं. माझ्या भावांना ते लुबाडीत आहेत. गरिबांना नागवीत आहेत. स्वत: मात्र श्रीमंत होत आहेत.

सावकाराच्या पोरीचं लग्न आहे. ते आता मौज करणार. आमच्या जिवावर त्यांची मदार सारी.

पोटात पुन्हा भुकेचा डोंब उठला. समोर सामानानं भरलेली गाडी चालली होती.

तंट्याचा सगळा राग उफाळून आला. त्यानं निर्णय घेतला. तीन साथीदारांना इशारा केला. एकानं गाडी अडविली. दुसऱ्यानं गाडीवानाला व त्याच्या साथीदाराला फटके दिले. गाडीतलं सामान बाहेर काढलं.

''सांग मालकाले, तंट्या होता म्हनावं.'' तंट्या गाडीवानास म्हणाला.

सावकाराविरुद्ध तंट्याची ही सुरुवात होती.

छेगाँव पोलिस स्टेशनमध्ये सामसूम होती. फौजदार साहेब शेजारच्या भुईफळला गेले होते. ते तीन मैलावर होतं. गाव छोटं होतं. जेमतेम १८३ घरांची वसती होती. हिंमत पाटील मालगुजार होते.

हिंमत पाटलांनी फौजदार साहेबांना खाना ठेवला होता. जेवताना साहेबांशी बोलता येईल, तंट्याला पुन्हा पकडण्यासाठी काय करावं, विचारता येईल असा पाटलांचा बेत होता.

तीन वेळेस पोलिसांनी तंट्याला अडकवलं होतं. या कामात हिंमतची मदत झाली होती. त्यांनी कोर्टात साक्ष दिली होती. शिवबा पाटील त्यांचे नातेवाईक होते. तंट्याची त्यांना अडचण वाटू लागली होती. यशोदेच्या निमित्तानं बदनामी झाली होती.

तो तंट्या आता पळाला होता. तो बाहेर होता. त्याचा धोका वाटू लागला. फौजदारांशी हिंमतचे संबंध होते. त्यातून पार्टीचा बेत आखला होता.

छेगाँव माखन गाव खांडवाहून पंधरा मैलावर होतं. खांडवा इंदूर रस्त्यावर पोलिस चौकी होती. भुईफळ-पोखर ही गावं त्यांच्याकडं होती.

तंट्याच्या नावाची सगळीकडं चर्चा सुरू झाली होती. भिल्ल-आदिवासी तरुण त्याच्या भोवती जमू लागले. शेतकरी-मजुरांना त्याच्याबद्दल आदर वाटू लागला होता.

तंट्या धीट बनत होता. साथीदारांची साथ मिळू लागली. त्याचं धैर्य वाढू लागलं. खाण्या-पिण्यासाठी चोरी करीत होता. छोटी-मोठी लूटमारी करीत होता. या काळात त्यानं कुठंही मारहाण केली नाही. खून खराबी घडली नाही. स्त्रिया-मुलांना त्याच्या टोळीनं त्रास दिला नाही.

तो सहकाऱ्यांची काळजी घेत होता. गरजूला शक्य ती मदत करीत होता. शेतकरी-आदिवासींना तो जवळचा वाटू लागला होता.

यातून तंट्याचा आत्मविश्वास वाढत होता.

एप्रिल महिन्याची पंचवीस तारीख होती. फौजदारसाहेब हिंमत पाटलांच्या वाड्यात बसले होते. रात्री जेवणाचा बेत रंगात आला होता. इकडं तंट्यानं साथीदार बरोबर घेतले. सगळे मिळून ते सतराजण होते. त्यांच्या बरोबर बंदूक होती, तलवार-धनुष्यबाण होते, कुऱ्हाडी-लाठ्या होत्या.

भुईफळ गावाबाहेर चिंचेचं मोठं झाड होतं. झाडाखाली टोळीनं मुक्काम केला. भल्या पहाटे तंट्या उठला. साथीदारांसह गावात शिरला. हिंमत पाटलाचं समोरचं दार बंद होतं. तंट्यानं हाक मारली.

''हिंमत दाजी, बायेर या. तंट्या तुमाला भेटाया आला हाय.''

हिंमत पाटलानं दरवाजा उघडला. समोर हत्यारबंद टोळी होती. पाटलानं चटकन दार बंद केलं. घरात लपण्याचा प्रयत्न केला. दौल्या-बिजनियानं दार तोडलं. हिंमत आणि त्याचा मुलगा गोविंदला बाहेर खेचलं.

टोळीतल्या साथीदारांनी दोघांना बदडून काढलं.

''हिंमतदाजी, ह्यो तंट्या शबूदाचा पक्का हाय, म्या तुमाले सांगलं व्हतं. आपली गाठ व्हईल पुना. कुठं ठिवलं सरकारनं देलेलं डबूलं?''

हिंमत गयावया करू लागला. सुटकेसाठी धडपडू लागला. हिंमत हातातून निसटला. पळण्याचा प्रयत्न करताच बिजनियानं गोळी झाडली. जायबंदी हिंमत कोसळले. त्यांची आरडाओरड सुरू झाली. गावातली माणसं धावली.

तंट्या त्याच्याकडं वळत म्हणाला,

''तुमच्या संग आमचा झगडा नाय. तुमी कशाला मदे पडता. नसती खून-खराबी वाढेल. ह्यो तंट्या तुम्हावानीच हाय.''

धावून आलेली माणसं मागं सरकली.

तंट्याच्या साथीदारानं हिंमतचं घर लुटलं आणि टोळी जंगलात निघून गेली.

जायबंदी हिंमतला गाडीत घातलं. खांडवाला आणलं. दुसऱ्या दिवशी ते जग सोडून गेले.

तंट्यावर हिंमतनं अन्याय केला होता. हिंमतला धडा शिकवण्यासाठी तो भुईफळला आला होता. हिंमतला लुटावं, मारहाण करून दम द्यावा, असा तात्याचा बेत होता.

भुईफळवर चाल करून येण्याची तंट्यानं योजना आखली होती. पाटलांचा खून करावा, असं त्याच्या मनात नव्हतं. पाटलांना दम द्यावा. दंड म्हणून पैसे लुटावेत. सरकारनं हिंमतला बक्षीस दिलं होतं. ती रक्कम परत मागावी. असा त्याचा बेत होता.

हिंमतचा खून करणे त्याचा कट असता तर त्यानं लागलीच गोळी घालण्याचा हुकूम दिला असता. तंट्याची माणसं हिंमत व गोविंदला मारहाण करीत होती, त्यावेळी तंट्या त्यांना सबुरीनं घ्या म्हणाला. तंट्यानं हिंमतला लपवून ठेवलेला पैसा अडका मागितला. सरकारी बक्षिसाची रक्कम परत मागितली. हिंमतनं धन देण्याची तयारी दाखविली नाही. उलट जीव वाचविण्यासाठी तो पळू लागला.

हातची शिकार पळून जाते काय? ह्या गोंधळलेल्या अवस्थेत बिजनियानं बार केला. तंट्यानं गोळी झाडण्याचा हुकूमही केला नव्हता.

हिंमत पाटलाचा खून झाला. सरकारी यंत्रणेपुढे एक आव्हानं उभं राहिलं.

# तंट्यानं सावकार-माल गुजारांना हिसका दाखवला

गुन्हेगार धीट झाले होते. ब्रिटिश सरकारला याची काळजी वाटू लागली. भिल्ल-आदिवासी नेहमी चोऱ्या करतात. लूटमार करतात. तो त्यांचा पिढीजात धंदा समजला जाई. ही चोरी पोटासाठी असायची.

पोलीस अशा भिल्लांना पकडून आणीत. दम देऊन सोडून देत. काही वेळेस ते शिक्षा करीत. गुन्हेगार पुन्हा पाटलांच्या आश्रयाला येत.

पोलिसांचा सर्वांना धाक होता. पोलीस मारझोड करीत. चौकीवर डांबून ठेवीत. म्हणून भांडणं गावातच मिटली जायची. मोठा गुन्हा घडला तर पोलिसांना कळविले जाई.

तंट्यानं भुईफळवर हल्ला केला. बरोबर पंधरा-वीस माणसं होती. बरोबर हत्यारं होती. त्यानं हिंमत पाटलाचं घर लुटलं. यापूर्वी त्यांना मारहाण केली. त्यांच्या मुलाला झोडपलं. एवढ्यावरच दरोडेखोर थांबले नाहीत. हिंमत पाटलावर गोळी झाडून खून केला.

भुईफळचे फौजदार या बातमीनं हादरले. खांडवा येथे खबर पोहोचली. वरचे अधिकारी धावत आले. सगळ्या पोलीस ठाण्याला तारा केल्या. पोलीस पाटलांना निरोप पाठविले.

पोलिसांनी जोरात मोहीम सुरू केली.

तंट्या-बिजनिया बाजूच्या जंगलात लपले होते. पोलिसांची धावपळ काही दिवसात मंदावली. गुन्हेगारांचा ठावठिकाणा लागत नव्हता.

तंट्यानं काही दिवस जंगलात विश्रांती घेतली. पांगलेले साथीदार एकत्र आले होते.

चिचखेडा गाव ब्रिटिश हद्दीत होतं. मालगुजार आटा देत नाही म्हणाला.

तंट्यानं मालगुजाराचं घर लुटलं. त्याला पकडलं. दोरखंडानं बांधलं. जंगलात घेऊन गेले.

चिचखेडीच्या मालगुजारास तंट्या पकडून घेऊन गेला ही खबर सगळीकडं पसरली. मालगुजारास पकडण्याचा त्याचा उद्देश होता. यामुळं इतर मालगुजारांना दहशत बसणार होती. ते तंट्या विरुद्ध पोलिसांना मदत करणार नाहीत. मालगुजाराची सुटका करताना जबर किंमत वसूल करण्याचा इरादा होता.

टोळीचा मुक्काम बागमारच्या जंगलात होता. चिचखेडीचे मालगुजार तंट्याच्या ताब्यात होते. पैसे पाठवण्याचा निरोप गेला होता. एके दिवशी मालगुजार हिकमतीनं निसटले. गावी परत आले. पोलिसांना खबर दिली. त्या दिशेनं पोलिसांनी तपास केला. माग काही सापडला नाही.

छेगाँव पोलीस स्टेशनचे हवालदार बसले होते. समोर डे बुक होतं. हवालदारानं रजिस्टरचं पान उघडलं. १८ जानेवारी १८८० तारीख लिहिली. रजिस्टर बंद केलं.

छेगाँव पोलीस स्टेशनपासून मैलावर हसवरा गाव होतं. सकाळची वेळ. गावात सामसूम होती. हसवरा गावाच्या वेशीत पोलीस पथक आले होते. पोलीस पथकाच्या प्रमुखानं पोलीस पाटलांना बोलावले. पाटील हजर झाले.

''पाटील आम्ही सरकारकडून आलोय. येथल्या बनियाच्या तक्रारी आल्यात. तो गरिबांना लुटतो. त्रास देतो. तुम्ही आणि मालगुजार त्याला साथ देता.'' मोठ्या साहेबांनी पोलीस पाटलांना दरडावलं.

पाटलांनी घाबरून हात जोडले. मालगुजारास बोलावून घेतलं. पोलीस पथक बनियाच्या दारी आले. बनियाला आवाज दिला. तो बाहेर आला. पोलिसांच्या अंगावर काळे कोट होते. डोक्यावर लाल पगडी होती. पोलीस बघून त्याची बोबडी वळली.

''सावकार गरिबांना लुटणं कम करो बनियाजी'' पोलीस अधिकाऱ्यानं तंबी दिली. साथीदाराकडं वळून म्हणाले, ''याच्या घराची झडती घ्या.''

पोलीस बनियाच्या घरात घुसले. घर धुऊन काढलं. पैसा-अडका लुटला. सामान बांधून घेतलं. पोलीस निघून गेले.

हसवरा गावचा कोतवाल पळू लागला. त्याला दम लागला होता. धापा टाकत छेगाव पोलीस स्टेशनात शिरला. हसवरा गावची खबर दिली..

हसवरा गाव हे छेगाँव पोलीस ठाण्याच्या हद्दीत होतं. येथे न कळवता वरचे

पोलीस अधिकारी कसे आले?

छेगाँवचे फौजदार गोंधळले. हसवरा गावी दाखल झाले. तंट्या पोलिसाच्या वेशात येईल, असा त्यांनी विचारच केला नव्हता.

यानंतर तंट्या मालगुजार-सावकारांना लुटू लागला. एका महिन्यात अठरा घटना घडल्या. पोलीस यंत्रणा चक्रावली.

नर्मदा तापीच्या खोऱ्यात तंट्या फिरत होता. त्याच्या कारवायांनी पोलिसांची झोप उडाली होती. तो गावोगावच्या सावकारांना धडा शिकवीत होता. मालगुजारांना लुटत होता. मिळालेली लूट साथीदारात वाटीत होता.

तंट्या गरिबांना मदत करीत होता. सावकाराकडं अडलेल्यांना सोडवीत होता. साथीदारांची काळजी घेत होता. अडचणीतली माणसं त्याच्याकडं येत होती. तंट्यांचा त्यांना आधार वाटत होता.

एका वर्षात तंट्याचं नाव निमाडच्या गावागावात पसरलं होतं. त्यानं डेप्युटी कमिशनरांना आव्हान दिलं होतं. एक अडाणी भिल्ल पोलिसांना सरळ आव्हान देतो, मालगुजार-सावकारांना धडा शिकवितो, लुटीची रक्कम गरजूंना वाटतो, ह्या गोष्टी निमाडमध्ये पसरू लागल्या.

आदिवासी-भिल्ल-शेतकरी आणि मजुरांना तंट्या आपला वाटू लागला. तंट्याच्या कारवायांनी त्यांची हिंमत वाढू लागली.

यापूर्वी निमाडवर सावकार-मालगुजार आणि पोलीस पाटलांची पकड होती. ते शेतकरी-आदिवासींना पिळत होते. लुबाडीत होते. शिक्षा करत होते. त्यांचा सर्वांवर वचक होता. दहशत होती. याविरुद्ध जनता तोंड उघडीत नव्हती.

या सत्तेविरुद्ध तंट्या उभा राहिला होता. तो त्यांना लुटू लागला. शिक्षा करू लागला. सावकार-मालगुजारांच्या जुलमातून सोडविण्यासाठी तंट्या आला आहे, असं त्यांना वाटू लागलं.

आदिवासींची तंट्याला साथ मिळू लागली. शेतकरी त्याला मदत करीत होते. आतापर्यंत भिल्ल, सावकार- मालगुजारांची त्यांना भीती वाटायची. ते दबून वागत होते. आता तंट्याचा त्यांना आधार वाटू लागला. ते स्वतःला स्वतंत्र समजू लागले. त्यांचं गावातलं वागणं बदललं होतं. ते धीटाईनं वागू लागले. कोणी त्यांना दटावलं, घालून-पाडून बोललं तर पूर्वी ते ऐकून घेत, आता मात्र ते भांडखोरासारखे वागू लागले.

पूर्वी ते पोलिसांना भीत होते. गावात पोलीस आला की लपून बसायचे. पांदीनं जंगलात पळून जात. आता त्यांच्या या वागण्यात बदल दिसू लागला. पोलिसांसमोर ते येऊ लागले. पोलिसांनी मारलं, तरी सहन करीत होते. तंट्याचं आम्हाला काही

माहीत नाही, असं सांगत होते. ते आता कोणालाच जुमानेनासे झाले होते.

परक्या सरकारबद्दल लोकांना चीड वाटू लागली होती. त्यांच्या असहकारातून ती दिसत होती. ब्रिटिश सरकार आपलं नाही. ते बाहेरून आले आहेत. होळकर आपले आहेत. घाटाखेडीचा राजा इथला आहे हा फरक जनतेला जाणवू लागला होता.

तंट्यामुळं लोकांत राष्ट्रीय भावनेची जाणीव वाढीस लागली होती. सावकाराचा जुलूम फेकून द्यावा. मालगुजाराचा अन्याय संपावा. हे गुलामगिरीचं जोखड आहे, ते झुगारून द्यावं, अशी भाषा ते करू लागले होते.

जनतेची सहानुभूती तंट्याला मिळू लागली आणि त्याची ताकद अनेक पटींनी वाढली होती. तंट्या गावात आला की लोक त्याचं स्वागत करीत होते. राजासारखी वागणूक देत होते. त्याचा सन्मान करीत होते.

लोक त्याला जंगलचा राजा म्हणू लागले. त्याचे साथीदार जणू सरदार होते. तंट्याचं वागणं उदारपणाचं होतं. लोक त्याच्याकडं तक्रारी घेऊन येत. तो न्यायी होता. अन्याय झाला त्याला ताबडतोब मदत करी. अन्याय करणाऱ्याला शिक्षा करी.

तो अडी-अडचणीत त्यांना मदत करी. सर्वांना त्याचा आधार वाटू लागला. कोणालाही खाली हात परत पाठवीत नसे.

तंट्याचं साथीदारांवर जिवापाड प्रेम होतं. तो त्यांची काळजी घेत होता. त्यांच्या बायका-मुलांसाठी नियमित पैसा देत होता. तंट्याचं एक विशेष होतं. त्यानं आपल्या साथीदारांना ताकीद दिली होती. मालगुजार-सावकारांना ते लुटायचे, त्यावेळी घरातल्या स्त्रियांना हात लावायचा नाही. त्यांच्या अंगावरचे दागिने ओरबाडायचे नाही. लहान पोरांची काळजी घ्यायची.

सावकार-मालगुजारांची लूट तंट्याची मिळकत होती. ह्या मिळकतीत सर्व साथीदारांचा वाटा असे. त्यामुळं मिळकतीची वाटणी समान करायचा.

गरिबाबद्दल त्याला कणव वाटत होती. अशांना तो सढळ हातानं मदत करीत होता. गावात पांडे-पटवारी होते. ते ब्राह्मण होते. ब्राह्मणाबद्दल त्याला आदर होता. त्यांनाही तो मदत करायचा.

पोलिसांना तंट्याच्या रूपानं संकट उभं राहिलं होतं. ते नवनवीन योजना आखीत होते. त्यांना यश मिळत नव्हतं. तंट्याचा ठावठिकाणा मिळत नव्हता. तंट्याविरुद्धच्या कारवाईत जनतेची साथ मिळावी असं सरकारला वाटत होतं. या

करिता सरकारनं तंट्याला पकडण्यासाठी बक्षीस जाहीर केलं. जमिनीची मालगुजारी देऊ केली.

तंट्या मालगुजारांना लुटीत होता. सावकारांना धडा शिकवीत होता. गावात घटना घडली की पोलिस येत. तपासाचं काम करत. ज्यांच्या घरी घटना घडली ते गप्प बसत. गावातली माणसं माहीत नाही सांगत. जनतेची पोलिसांना साथ मिळत नव्हती. लोक गप्प बसत होते. याचा अर्थ त्यांचा पोलिसांना छुपा विरोध होता.

पोलिसांच्या हालचाली तंट्याला कळत होत्या. गावागावातून खबरे होते. ते तंट्याला माहिती पुरवीत होते. अशा लोकांना तंट्या मदत करी. तंट्याचे हे हेर जलद हालचाल करायचे. आदिवासी काटक होते. चपळ होते. निरोप द्यावयाचे. निरोप पाठविण्याची त्यांची चांगली पद्धत होती. कमी वेळात निरोप दूरपर्यंत पोहोचला जाई. याचा फायदा तंट्याला होत होता. पोलिसांच्या बातम्या त्याला माहिती होत आणि तंट्या त्याविरुद्ध चाल खेळत होता. त्याची ही यंत्रणा दूरपर्यंत पसरली होती.

एखादा मालगुजार तंट्याविरुद्ध पोलिसांना मदत करतोय. सावकार तंट्याला विरोध करीत आहे, ही खबर तंट्याला खबऱ्याकडून कळायची.

तंट्या त्या मालगुजार-सावकारास निरोप पाठवी. त्यात नीट वागा, अशी धमकी असायची. इशारा देऊनही त्यानं ऐकलं नाही; पोलिसांना मदत चालूच ठेवली तर अशा गद्दारांना तंट्याचे साथीदार लुटून शिक्षा करीत.

याचा चांगला परिणाम दिसू लागला. तंट्याविरुद्ध माहिती पोलिसांना कोणी देईना. आजूबाजूला तंट्याचे हेर आहेत, तंट्याला कळलं तर तो सोडणार नाही ही भीती वाटत होती. त्याला विरोध करण्याचं धाडस कोणी करत नव्हतं.

## इन्स्पेक्टर बेग तंट्याच्या नातेवाईकांना पकडतात

इन्स्पेक्टर इब्राहीम बेग नावाचे पोलीस अधिकारी होते. बेग होशंगाबादला होते. त्या भागात त्यांनी गुन्हेगारांविरुद्ध दहशत निर्माण केली होती. बेगचं नाव घेतलं की आरोपी थरथर कापायचे, असा त्यांचा यांचा दरारा होता.

बेगची बदली खांडवा येथे झाली. दरोडेखोर तंट्या विरुद्धच्या मोहिमेचे प्रमुख म्हणून त्यांना नेमलं. ते खांडवा येथे आले. त्यांनी वरिष्ठांशी चर्चा केली. आतापर्यंत कारवाईचा आढावा घेतला.

तंट्या सापडत नाही. गावातली माणसं त्याच्या बद्दल बोलत नाहीत. त्याचे

नातेवाईक कानावर हात ठेवतात. अशानं तपास कसा लागायचा?

इन्स्पेक्टर बेगनी एक योजना आखली. तंट्याच्या नातेवाईकांची यादी केली. वेगवेगळ्या गावी पोलिस गेले. तंट्याच्या नातेवाईकांना पकडून खांडव्याला आणलं. पोलिस कार्यालयात डांबलं. धाक-दडपशाही केली. काहींना मारहाण केली. तुरुंगात टाकू, अशी भीती दाखवली.

तुरुंगाच्या भीतीनं काहीजण तयार झाले. तंट्याचा ठावठिकाणा शोधायला मदत करतो म्हणाले. असे वीस भिल्ल निवडले. ही तुकडी पोलिसांबरोबर निघाली. जंगल तुडवू लागली. तंट्याचा माग घेणं सुरू झालं.

तंट्याला ही पोलिसाची कारवाई समजली होती. यावेळी तंट्याचा मुक्काम सुक्ताकाठी होता. बिरडा गावाच्या बाजूला डोंगरात गुहा होती. खालच्या बाजूला शिवाबाबाची समाधी होती. सुक्ता नदीच्या खोऱ्यात घनदाट जंगल होतं. तिथं गंभीरपुरा छोटं गाव होतं. दरवर्षी इथल्या आमराईत यात्रा भरायची. आजूबाजूच्या गावाहून माणसं येत. शिवाबाबाला नवस बोलत. शिवाबाबा बंजारा संत होते. तंट्याची शिवाबाबांवर भक्ती होती.

तंट्याचा मुक्काम वरच्या गुहेत होता. सोबत बिजन्या, दौल्या, महादा हे जिवाभावाचे साथीदार होते. दिवसभर टोळी इथं राहायची. रात्र झाली की मोहिमेवर निघायची. ठरलेल्या गावी सावकार अथवा मालगुजारांच्या घरावर धाड टाकायचे. परत येऊन आनंदात मेजवानी घेत. या वेळी गाणं होई. नाच होई. तंट्या तऱ्हेतऱ्हेचे सोंग काढी. आपल्या रांगड्या साथीदारापुढं तंट्या तलवारीचा नाच करी. एकदा त्याला तलवारीमुळं इजा झाली होती.

बेगनं नातेवाईकांना पकडून नेलं. पोलीस इकडं येतील. त्यापूर्वी तंट्यानं मुक्कामाचं ठिकाण बदललं. निमाडच्या पूर्वेला कालीभीतचं जंगल होतं. जंगलात छोट्या मोठ्या अनेक टेकड्या होत्या. बाजूला तापी नदीचं खोरं होतं. या ठिकाणी तंट्यानं आश्रय घेतला.

तंट्या कालीभीतमध्ये आला होता. त्याचे इतर साथीदार मात्र वेगवेगळ्या ठिकाणी पांगले होते. ते तंट्याच्या नावानं कारवाई करतच होते. ही ठिकाणं एक दुसऱ्यापासून दूर दूर होती. सर्व ठिकाणी तंट्या कसा पोहोचतो? पोलिसांना कोडं सुटत नव्हतं.

तंट्याची एक पद्धत ठरून गेली होती. ज्यांच्या विरुद्ध तो येई, त्यांना अगोदर निरोप पाठवी. गावात प्रवेश करताना स्वतःचं नाव जाहीर करी. काम आटोपून निघून जाई. गावातल्या इतरांना तो त्रास देत नसे.

सावकार-मालगुजार लुटला गेला, ही खबर पोलीस पाटील उशिरा पोलीस

चौकीला कळवी. पोलीसही घटनास्थळी उशिरा पोहोचत. ज्यांना तंट्यानं लुटलं, ते पोलिसांसमोर तोंड उघडायचे नाहीत.

उलट तो मालगुजार सांगे, 'साहेब आमचं काही नुकसान झालं नाही. आमची कोणाबद्दल तक्रार नाही.'

एखादा मालगुजार लुटला गेला हे कबूल करी. यावर पोलीस विचारत, ''तंट्या होता का?'' तंट्याच्या भीतीनं त्याचं नाव घ्यायला कोणीही पुढं येत नव्हतं.

१८८० चा मे महिना होता. मध्यरात्र उलटून गेली होती. जबलपूर शहरा बाहेरच्या सेंट्रल जेलची घंटा वाजू लागली. धोक्याची घंटा ऐकून धावपळ सुरू झाली. सात बहादूर भिल्लांनी पलायन केलं होतं. गेल्या वर्षी त्यांना तुरुंगात डांबलं होतं. तंट्याला मदत करतात, हा आरोप त्यांच्यावर होता. ते सातजण जेलमध्ये शिक्षा भोगत होते.

तंट्याच्या या साथीदारांनी जेलची तटबंदी तोडली. अभेद्य भिंतीवरून पलायन केलं. रक्षकांच्या हातावर तुरी ठेवल्या. ह्या घटनेनं पोलिसांची सगळीकडं नाचक्की झाली.

या सातपैकी तिघे भिल्ल तंट्याला येऊन मिळाले. तंट्याच्या साथीनं त्यांनी मालगुजारांवर हल्ले सुरू केले.

तेवीस जूनचा दिवस होता. पहिला पाऊस पडून गेला होता. शेतकरी शेतीवाडीच्या कामात गुंतले होते. छेगाँव पोलीस स्टेशनपासून तीन मैलावरच्या बरूर गावात सामसूम होती.

तंट्या-बिजनिया बरूरमध्ये आले. बरोबर आणखी तीन साथीदार होते. गावच्या पारावर दोनचार म्हातारे बसले होते.

''म्या तंट्या आन् ह्यो बिजन्या. हितला मालगुजार आमची खबर सरकारला देतुया. त्येचा समाचार बगाया म्या आलोया.'' तंट्यानं जाहीर केलं. मालगुजाराचं घर कोणत्या बाजूला आहे, हे विचारलं.

पारावरच्या एकानं मालगुजाराच्या घराकडं हात दाखविला. बरूर गावात बाराशेच्या आसपास घरं होती आणि छेगाँव पोलिस स्टेशनही हाकेच्या अंतरावर होतं. तंट्यासोबत चारच माणसं होती.

गावकऱ्यांनी ठरविलं असतं तर ते तंट्याचा प्रतिकार करू शकले असते. त्याला पकडू शकले असते. तंट्याचा राग मालगुजाराबद्दल आहे, हे गावकऱ्यांना माहीत होतं आणि गावकऱ्यांना मालगुजाराबद्दल थोडीही सहानुभूती नव्हती.

तंट्या मालगुजारांच्या घरी आला. त्यांच्या माणसांना घराबाहेर काढलं. घराला आग लावली आणि निघून गेला.

पोलीस पाटील गावातच होते. तंट्या आल्याची खबर त्यांना पोहोचली. भीतीनं ते बाहेर आले नाहीत. तंट्या दूर गेल्यानंतर ते बाहेर आले. उशिरा कोतवालाला बोलावलं. छेगाँव पोलिस स्टेशनला खबर दिली.

घटना घडून बारा तास झाले होते. खांडवा जिल्हा पोलीस प्रमुख बरूर गावी आले. मालगुजारांना चावडीवर बोलावलं.

''काय पाटील, घटना घडली. उशिरा खबर का दिली?'' मोठ्या साहेबांनी विचारले. पोलीस पाटील बोलत नव्हते.

मालगुजाराचं घर जाळलं होतं.

त्यांना साहेबांनी विचारलं,

''कोण आलं होतं काल?''

''कोनी नाय आलं मायबाप, बायकुच्या हातून चिमणी पडली आन् घरानं भडका घेतला. आमच्या नशिबात होतं ते साब.'' मालगुजार म्हणाले.

''तंट्या-बिजन्या आले नव्हते?'' साहेबांनी रोखून विचारलं.

''नाय नाय सरकार, त्येंचं कशाला नाव घेता. आमची कुनाबद्दल तक्रार नाय.''

मालगुजारांचे जबाब ऐकून साहेब चक्रावले.

काय करावं तंट्याच्या भीतीला?

# बिजनियाला फाशी

इब्राहीम बेगनं खाजगी खबऱ्यांना नोकरीस नेमलं. त्यांना पगार मिळू लागला. तंट्याची हालचाल पोलिसांना कळवायची, एवढंच काम त्यांच्यावर होतं.

बरूरला तंट्यानं दिवसा घरं पेटविली. गावाबाहेर पडला. बरूरच्या पश्चिमेला हल्लेखोर निघून गेले होते. खबऱ्यांनी पोलिसांना कळविलं.

पश्चिमेला खरगोन जिल्हा होता. हा होळकर महाराजांचा मुलूख होता. हल्लेखोर इकडून आले होते आणि त्याच दिशेनं निघून गेले होते. याचा अर्थ तंट्या होळकर मुलखात गेला. बेगनं सरहद्दीवर विशेष पोलिस नेमले.

शिवना गावी तंट्या येत असतो. येथील पाटलांशी त्याची दोस्ती आहे. शिवनाहून खजुरी जवळ आहे. बिजनियाचं हे गाव होतं. ह्या दोन्ही गावांच्या रस्त्यावर पहारा वाढविला.

अशा व्यवस्थेत महिना होत आला. बरूरच्या घटनेने पोलीस अस्वस्थ होते. इन्स्पेक्टर बेग प्रयत्न करीत होते. तपासात प्रगती होत नव्हती.

होळकर हद्दीबाहेर कुंदवाड गाव होतं. गावाबाहेर शिवेवर विशेष पोलिसांची चौकी होती. कुंदवाडच्या मालगुजारचा तंट्याला संशय होता. एकदोन वेळेस त्याला निरोप पाठविला होता. मालगुजाराच्या वागण्यात फरक झाला नाही.

तंट्या कुंदवाडला हजर झाला. तंट्याला बघताच मालगुजाराची बोबडी वळली. गयावया करू लागला. त्याच्याकडून नऊशे रुपयाचा दंड वसूल केला. आला तसा परत गेला.

तंट्या निघून गेला. तीन तासांनी पोलीस जागे झाले. दहा शस्त्रधारी विशेष पोलीस हाकेच्या अंतरावर होते. छेगाँव पोलीस स्टेशन चार मैलावर होतं.

तंट्या दूर निघून जावा, अशीच काळजी जणू पोलीस घेत होते. मग तंट्या कसा हाती येणार?

प्रत्येक महिन्यात कार्यक्रम ठरवून तंट्या धाडी घालीत होता. एकाच दिवशी

वेगवेगळ्या दिशांना लूटमार होत होती. एकच तंट्या सगळीकडं कारवाई करीत होता. त्याच्या हुशारीनं पोलिसांचा गोंधळ वाढत होता.

या वर्षी पाऊस कमी झाला. पिकं चांगली आली नाहीत. जनावरांना चारा-पाणी मिळेना. गरिबांना खायला धान्य कमी पडू लागलं. सावकार चढ्या भावानं धान्य विकू लागले. दुष्काळ त्यांच्यासाठी वरदान ठरला होता. बाजारात धान्य मिळेनासं झालं.

तंट्या हे सगळं पाहत होता. गरिबांचे हाल त्याला बघवत नव्हते. माणसाची उपासमार बघून तो बेचैन झाला.

खबऱ्यानं निरोप आणला होता. खांडव्याचा सावकाराचा ट्रक निघणार होता. ट्रकमध्ये धान्य होतं.

तंट्यानं दौल्यावर कामगिरी सोपविली. आजूबाजूच्या गावात निरोप दिला. धान्य घेऊन जाणारा ट्रक आडरानी अडविला. धान्याची पोती ट्रकबाहेर टाकली. आजूबाजूच्या गावच्या बैलगाड्या हजरच होत्या. गाड्यात धान्याची पोती भरली.

गावोगाव मोफत धान्य वाटून टाकलं.

निमाडमध्ये तंट्याला आता तंट्या मामा म्हणू लागले. मामा म्हणजे आईचा भाऊ. मामाचा सगळ्यांना आधार वाटेना. अडचण असली की मामा धावून येतो. संकटसमयी पाठीमागं उभा राहतो. तो बहिणीचा रक्षणकर्ता असतो. अबलांचा पाठीराखा असतो.

गावात लग्न निघायचं. या लग्नात तंट्या मामाचा आहेर यायचा. मामाच्या आहेराला मामेजा म्हणत. तंट्या मामाचा मामेजा आला, याचं गरिबाला भूषण वाटत होतं. त्याहीपेक्षा मामा पाठीशी आहे. लग्न अडचण न येता पार पडेल, हा मोठा आधार वाटत होता.

शेतकऱ्याचा बैल बसला, शेतीची कामं अडली, पेरणी जवळ आली, बी-बियाणासाठी अडचण आली, गाडीचं चाक बसलं, कोणाची पोरगी अडली, सावकारानं छळ सुरू केला, की माणसं तंट्याकडं येत होती. अडचण सांगत होती. त्यांना खात्री होती, सगळ्या गोष्टींवर तंट्या मामाकडं तोडगा आहे. कोणालाही तो रिकाम्या हातानं परत पाठवीत नव्हता.

ही कामे तंट्या करीत होता. सगळ्यांना तो हितकर्ता वाटू लागला.

इन्स्पेक्टर बेगची बदली झाली. त्यांच्या जागी शेर अली आले. नव्या शेरअलीनं कामाचा आढावा घेतला. निमाड दुष्काळानं होरपळून निघाला होता.

शेतकरी-कष्टकरी हवालदिल झाले होते. जनावरांची हाडं दिसू लागली होती.

सरकार लोकांसाठी काही करत नव्हते. सावकारांनी जनतेची लूट सुरू ठेवलीच होती. मालगुजार त्यांना मदत करीत होते. मात्र तंट्या जनतेला जमेल तेवढी मदत करीत होता. जनतेला तो पोषणकर्ता वाटू लागला होता.

अशा काळात शेरअली आले होते. दोन वर्षांच्या खंडानंतर पाऊस सुरू झाला. भयानक पाऊस पडू लागला. नदी नाले एक झाले. सगळं जनजीवन विस्कळीत झालं.

पाऊस सुरू झाल्यामुळे पोलिसांच्या हालचाली मंदावल्या. पाऊस संपेपर्यंत वाट पाहावी लागणार होती. शेरअलीनं फौजदारांची बैठक घेतली. खाजगी खबरे मदत करतील. या कामी आणखी माणसांची नेमणूक करावी. या कामाचा मोबदला वाढवून मिळेल, असं आमिष दाखवावं, असं ठरलं.

इन्स्पेक्टर शेरअलीला या कामात लवकर यश आलं. छेगाँव पोलीस हद्दीत संगवारा गाव होतं. एका खबऱ्यानं बातमी आणली, संगवारा नदीकाठी करवंदाची जाळी होती. जाळीत काही माणसं लपली होती.

हत्यारबंद शिपायांसह शेरअली धावले. करवंदाच्या जाळीला वेढा दिला. बेसावध बिजनियानं पाहिलं. आजूबाजूला शिपाई होते. बिजनियासोबत एकच साथीदार होता.

बिजनिया चवताळून जाळीबाहेर आला. पोलिसावर तुटून पडला. एकदोन शिपायांना जायबंदी केलं. त्याचा एकट्याचा निभाव लागला नाही. पोलिसांनी त्याचे हात पाय बांधले. गाडीत टाकून खांडव्याला आणले.

पोलिसांनी त्याला नाव विचारलं,

'म्या तंट्या हाय. इतक्या लवकर वळक इसरली काय?' तो म्हणाला.

पोलिसांना आनंद झाला. खऱ्या तंट्याला अलीकडं कोणी पाहिलं नव्हतं. तंट्या पकडल्याची बातमी दूरवर पसरली. शेरअलीवर अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला.

सकाळी तंट्याला पाहायला माणसं येऊ लागली. त्यात एक पोलीस अधिकारी होते. 'हा तंट्या नाही. तंट्याचा हा डाव दिसतो.' ते अधिकारी म्हणाले. पोलिसात आणखी गोंधळ उडाला. पोखरला माणसं पाठविली. तंट्याला ओळखणारी माणसं आणली.

बिजनिया होता तो. पोलिसांची थोडी निराशा झाली. तंट्या सापडला नव्हता. त्याचा उजवा हात असलेला बिजनिया हाती आला होता. १३ सप्टेंबर १८८० चा दिवस होता तो. या घटनेनं पोलीस गोटात आनंद झाला होता.

खांडवा कोर्टात खटला उभा राहिला. हिंमत पाटलांचं घर लुटणं, त्यांचा खून करणं हे दोन आरोप बिजनियावर ठेवण्यात आले. साक्षी पुरावे झाले. बिजनियाला दोषी ठरविण्यात आले. न्यायाधीशांनी त्याला फाशीची शिक्षा सुनावली.

बिजनियानं भुईफळ गावी दरोडा घातला होता. त्या गावी त्याला फाशी द्यावी, असा निर्णय झाला.

बिजनियाच्या फाशीची बातमी दऱ्याखोऱ्यात पसरली.

२८ फेब्रुवारी १८८१ फाशीचा दिवस ठरला होता. सकाळ झाली. चहूकडून भिल्ल-आदिवासी भुईफळ गावाकडं येऊ लागले. मोठा जमाव वेशीबाहेर जमा झाला होता.

आपल्या बहाद्दर सरदाराचं शेवटचं दर्शन घ्यावं, त्याला पाहावं, म्हणून माणसं येत होती. ऐनवेळेस बंदोबस्तासाठी पोलीस कुमक मागविली. परिस्थिती स्फोटक बनली होती. पोलीस अधिकाऱ्यांचे परिस्थितीवर लक्ष होते.

वेशीजवळच्या झाडाला फास लावला होता. पोलीस बिजनियाला घेऊन आले. भिल्लं-आदिवासी त्याच्या नावानं गर्जना करू लागले. बिजनियाच्या गळ्याभोवती फास अडकला गेला, उघड्यावर त्याला जाहीर फाशी दिली.

जमाव बसून होता. परिस्थिती तापू लागली. पोलिसांनी जमावाला हुसकावलं. बंदुकीचा धाक दाखविला. उघडी-बोडकी माणसं जिवाच्या भीतीनं सैरावैरा धावू लागली.

दोन दिवस बिजनियाचं प्रेत झाडावर लटकत होतं. पोलिसांनी प्रेत ताब्यात दिलं नाही. लोकांत दहशत बसावी म्हणून तसंच उघड्यावर ठेवलं.

बिजनियाला फाशी झाली, ह्या घटनेनं तंट्याला खूप दुःख झालं. बिजनिया त्याचा उजवा हात होता. बहादूर साथी होता. सरकारनं बिजनियाला उघड्यावर फाशी दिली.

ह्या घटनेचा तंट्यावर खूप परिणाम झाला. तो पेटून उठला. खांडवा पोलिस चौकीवर चालून जाण्याचा विचार करू लागला. त्याच्या साथीदारानं त्याला आवरलं. असा सरळ हल्ला करणं बरोबर नाही. तंट्याची समजूत काढली.

काही दिवस तंट्या दुःखानं वेडा झाला होता.

बिजनियाला फाशी झाली. त्या दिवसाला उद्या एक महिना होणार होता. बिजनियाची आठवण त्याला अस्वस्थ करत होती. तंट्या निघाला, बरोबर निवडक साथीदारांना घेतलं.

संगवारा गावच्या खबऱ्यानं गद्दारी केली होती. पोलिसांना बिजनियाची खबर दिली होती. त्या गावाला धडा शिकवायला तंट्या निघाला.

दुपारची वेळ होती. गर्जना करत तंट्या गावात शिरला. प्रत्येक घर पेटवू लागला.

पाटील-पटवारी धावत आले.

''तंट्या मामा, एकानं शेण खाल्लं. त्याची शिक्षा सगळ्याला नको करू.'' पाटील विनवणी करू लागले.

''पाटील, ह्या तंट्यानं तुमच्या काडीला हात लावला नाय. वाघासारख्या बिजनियाला पकडून देलं तुमच्या माणसानं.''

''ज्यानं ह्ये काम केलं त्याला भर चौकात गोळी घाल. सगळ्या गावाला शिक्षा करू नको.'' पटवारी कळवळून म्हणू लागले.

''त्यो मानूस पुढं येनार नाय पांडेजी. असा मानूस ह्या गावचा हाय, त्ये गावाला म्या मोकळं सोडत नाय.''

तंट्यानं घरातली माणसं बाहेर काढली. सामान रस्त्यावर काढलं. एक एक घर पेटू लागलं. माणसं धडधडणाऱ्या घरांकडं पाहात होती.

तंट्या निघून गेला.

रात्रभर त्याला झोप आली नाही. डोळ्यासमोर संगवाराची माणसं दिसत होती. पेटलेल्या घराकडं बघून ओरडत होती.

एकानं चुकी केली होती. आपण सगळ्या गावाला शिक्षा केली. त्याला पश्चाताप होऊ लागला. सगळ्यांचा अपराध नव्हता. सगळ्यांना शिक्षा करणं चुकलं आपलं.

त्याचं मन त्याला खाऊ लागलं होतं.

## तंट्याचा बदला

इन्स्पेक्टर शेरअली उत्साहात होते. बिजनिया पकडला. फाशी झाली. तंट्याचा महत्त्वाचा साथीदार गेला. त्याच्या नावाचा दरारा होता. या कामगिरीनं पोलिसांत हुरूप आला होता.

खांडवा विश्रामगृहात शेरअली थांबले होते. चौकीदार झाडलोट करीत होता. काठी टेकवीत एक मुल्ला आले. ते कमरेत वाकले होते. दाढी पांढरी फेक झाली होती.

''इन्स्पेक्टर साबसे मिलना चाहता हूँ! थोडा काम है! दूर से आया हूँ!'' चाचा चौकीदाराला म्हणाले. चौकीदार आत गेला. शेरअलींना सांगितलं. एक म्हातारा भेटायला आला आहे.

चौकीदार चाचांना घेऊन आत आले.

''आपको दुवा देने के लिए आयाँ हूँ, हुजूर!''

शेरअलीनं चाचाकडं पाहिलं. कशासाठी हा दुवा देत असेल. ते विचार करू लागले.

''वो सैतान था. हजारो को बरबाद किया उसने....''

''आप कहासें आये हो?''

''मै खजुरीसे आया हूँ, सरकार.''

''खजुरी!'' शेरअली पटकन म्हणाले, ''वो बिजनिया का गाव?''

''हाँ हुजूर! आपने उसे सजाए मौत दिलाई. मेरा घर बर्बाद किया था ये सैतान ने. मेरे जैसे बहुत लोग दुवा दे रहे है आपको.'' चाचा. थोडं थांबले. साहेबांच्या चेहऱ्याचा अंदाज घेतला. ''और एक बताने आया सरकार. दुसरा सैतान तंट्या पकडा नही जाता, तब तक मुझे चैन से निंद नहीं आयेगी मालिक... यदी आप ये गरीब पर भरोसा रखेंगे तो मै उसके अड्डेका पता बताता हूँ!''

शेरअली सावध झाले.

''तंट्या का अड्डा!'' इन्स्पेक्टर शेरअलींना चाचा अल्लानं पाठविला वाटला. ''कल सुबह निकलेंगे चाचा. आप जो बता रहे, सच निकला तो सरकार आप को...''

''आप कल ही बता देना हुजूर..'' चाचा चटकन म्हणाले.

शेरअलीनं निवडक शिपाई बरोबर घेतले. सकाळी सकाळी ते निघाले. पंधाना पोलिस स्टेशन मागं पडलं. समोर डोंगराच्या रांगा दिसत होत्या.

चांगला रस्ता संपला. घोडागाडी तिथंच सोडावी लागली. शेरअली घोड्यावर बसले. गावाच्या बरगडीनं दरी सुरू झाली. घोड्यावर बसलेले साहेब खाली उतरले. चाचाबरोबर चालू लागले.

दुपार झाली. डोंगर तापला होता. एका दरीतून दुसऱ्या दरीत ते चालले होते. चाचाच्या अंगात तरुणाचा जोम चढला होता. चालण्यात तडफ होती. शेरअली थकले होते. बरोबरचे पोलिस मागं रेंगाळले होते.

''कितना दूर हैं अड्डा चाचा?'' शेरअलीनं वैतागून विचारलं.

''बस वो चट्टान है ना! उस खाई में है हुजूर!''

शेरअली जड पावलानं चालत होते. दरीच्या कडेला चाचा थांबले.

''सायेब एक इचारु?'' म्हाताऱ्याचा आवाज बदलला. शेरअलीनं चमकून त्याच्याकडं पाहिलं. 'आता तंट्या दरीतून वर आला तर काय कराल?'

शेरअली नुसते बघू लागले.

चाचानं त्याचं पिस्तूल हिसकावून घेतलं.

''म्या तंट्या हाय. काय करनार शेरअली साब? काय बक्सीस देऊ तुमाले? ह्या दरीत फेकू! कुत्रे-लांगडे फाडून खातेल. ह्यो तंट्या तसं काई करनार नाय.''

''हात वर करा. जीव प्यारा आसंल तर कपडे काडा. मागं न बगता पळा.''

शेरअलीनं मागं वळून पाहिलं. दूर झाडाखाली शिपाई बसले होते. त्यांच्यावर हल्ला झाला होता. शिपाई वाट मिळेल तिकडं पळू लागले.

त्यांनी कपडे काढले. तंट्यासमोर टाकले. मागं न पाहता अनवाणी पायांनी पळू लागले. ते पंधानाला पोहोचले. त्यांचा स्वत:वर विश्वास बसत नव्हता. तंट्यानं त्यांना जिवंत कसं पाठवलं. सगळ्यांना ह्या प्रश्नाचा उलगडा होत नव्हता.

तंट्याचा वावर निमाडभर होता. सातपुडाचे डोंगर त्याचं घर-अंगण झालं होतं. जंगलाच्या पायवाटा त्याला माहीत होत्या. तो कुठंही असला तरी पोखरची आठवण येत होती. दोन गोष्टींचं त्याला आकर्षण होतं.

पोखरला नवगजाबाबा होते. बाबाची त्याच्यावर कृपा आहे, असं त्याला वाटायचं. बाबा त्याच्या स्वप्नात यायचे. त्याला दृष्टांत द्यायचे. बाबांनी त्याला सांगितलं होतं. तू निमाडवर दहा वर्षे राज्य करशील. मी तुझ्या पाठीशी आहे. तू कशाची काळजी करू नको. शत्रू तुझ्या केसाला धक्का लावणार नाहीत.

नवगजाबाबाचे ताईत तंट्याच्या गळ्यात होते. दंडात कडं होतं. ताईत आणि कडं बाबाची कवचकुंडले होती. ती अंगावर आहेत, तोपर्यंत त्याला भीती नव्हती.

तंट्याला बाबांची आठवण यायची. आठवण आली की तो पोखरला येई. दर्शन घेई. बाबांच्या दरबारात त्याला शांत वाटे.

पोखरला यशोदा होती. तिच्या संबंधाचा त्याच्यावर आरोप केला होता. तंट्यानं चिडून त्या माणसांना दम दिला. धाक दिला. त्यांच्या म्हशीचे रागानं कान कापले होते.

त्यानं पुढं पोखर सोडलं. गाव सोडताना त्याच्यावर आरोप करणाऱ्यांना बजावलं, 'यापुढं यशोदा आणि तिच्या बापाला त्रास देऊ नका, नाही तर माझ्याशी

गाठ आहे.'

त्यानं ते गाव सोडलं; परंतु तो यशोदेला विसरला नाही. तिच्याबद्दल त्याला काळजी वाटत होती. यशोदा सरळ स्वभावाची होती. वडील तंट्यावर अन्याय करीत आहेत, असं तिला वाटत होतं. त्यामुळं तिनं वडिलांचा बेत त्याला सांगितला होता. धोका पत्करून तिनं तंट्याला हे सांगितलं होतं.

हे तंट्या विसरला नाही.

यशोदेच्या वडिलाबद्दल त्याचा राग संपला होता. गावकऱ्यांनी त्यांना जाती बाहेर टाकलं होतं. गावात नामुष्की झाली होती. याला आपणच जबाबदार आहोत, असं त्याला वाटायचं. यातून तो यशोदेला मदत करू लागला. साथीदारांसोबत पैसे पाठवू लागला.

अधूनमधून तंट्या पोखरला येई. नवगजाबाबाचं दर्शन घेई. यशोदेची ओझरती भेट होई. तिच्या आई-बाबांची खुशाली विचारी आणि निघून जाई.

✪

# तंट्या जनतेचा वाली आणि सरकारची डोकेदुखी

निमाडची माणसं अनेक वर्षं अन्याय सहन करीत होते. आठशे वर्षांचा इतिहास असाच होता. या काळात अनेक राज्ये उदयास आली. यात उत्तरेकडून राजपूत आले. त्यांच्या मागाहून मुसलमान सरदार आले. त्या अगोदरचे स्थानिक हिंदू राजे होते.

रयतेची काळजी कोणीच घेतली नाही. दोन राज्यात लढाया होत. या काळात सैनिक जनतेला लुटायचे. यानंतर सावकार मालगुजारांनी जनतेला पिळलं होतं.

सुरुवातीला निमाडवर राजपूत-मुसलमान सरदारांचा अंमल होता. नंतर मराठ्यांनी हा मुलूख जिंकला. मराठ्यात शिंदे आणि होळकर सरदार होते. त्यांच्यात सत्तेसाठी भांडणं होती. वैर होतं. याचा नेमका फायदा इंग्रजांनी उचलला. त्यांनी पूर्व, आणि पश्चिम निमाड अशी विभागणी केली. पश्चिम निमाड म्हणजे खरगोन. हा टापू इंदूरच्या होळकरांना दिला. पूर्व विभाग खांडवा जिल्हा होता. हा भाग होळकरांकडं होता, होळकरांनी हा भाग ब्रिटिशांना आंदण दिला. त्याच्या उत्पन्नातून ब्रिटिश सैन्याचा खर्च केला जाई.

यामुळं पूर्व निमाडवर ब्रिटिश अंमल होता. पश्चिम निमाडवर होळकराची हुकमत होती. दोन्ही भागात गावपातळीवर पाटील-मालगुजार प्रमुख होते.

शेतसारा वसुलीचं काम मालगुजार करीत, त्यांची गावावर पकड होती. गावात काही श्रीमंत होते, ते सावकारी करीत. पाटील, मालगुजार आणि सावकाराचा गावावर वचक होता. हे सत्ताधारी वर्गाशी चांगले संबंध ठेवून होते आणि सत्ताधारी रयतेपेक्षा ह्या सधन वर्गाचं हित बघत होते.

शेतकरी गरीब होते. आदिवासी-भिल्लं श्रीमंत मालकाकडं सालदारी करीत होते. मालक ह्यांना जनावरांसारखं राबवून घेत होते. वेठबिगाराचं जीवन जगत होते.

जनता गरीब होती. श्रीमंत वर्गाच्या अत्याचारापुढं भरडली जात होती. कोणाकडं तक्रार करता येत नव्हती. त्यांना कळत होतं, पण तोंडातून शब्द

काढायची हिंमत नव्हती. त्यांच्या मनात या वर्गाबद्दल राग खदखदत होता.

तंट्या आला. त्याचं नाव सगळीकडं झालं. आतापर्यंत पाटलाविरुद्ध कोणी बोलत नव्हतं. मालगुजाराचा सगळ्यांना धाक होता. सावकाराच्या हाती गावाच्या आर्थिक नाड्या होत्या.

तंट्या मालगुजारांना धडा शिकवीत होता. सावकारांना शिक्षा करीत होता. पिचलेली माणसं हे बघत होती. त्यांच्यासाठीच तंट्या हे करीत आहे, असं त्यांना वाटू लागलं होतं.

जनता गांजली होती. अन्याय करणाराविरुद्ध चीड निर्माण होत होती. मात्र हे उघड दाखवू शकत नव्हते. तंट्याच्या कारवाईचं त्यांना कौतुक वाटत होतं. तो आपला राखणदार आहे, आपलं हित बघण्यासाठी आला आहे, त्याला मदत केली पाहिजे. साथ दिली पाहिजे.

प्रत्येकाला मनापासून असं वाटू लागलं.

यामुळं गावागावातून तरुण पुढं येत होते. तंट्याला मदत करीत होते. त्याच्यासाठी धोका पत्करण्यात त्यांना आनंद होत होता.

पोलिसांना तंट्या विरुद्ध यश येत नव्हतं. सुरुवातीला तंट्या निमाडमध्ये कारवाया करीत होता. आता बेतूल, होशंगाबादपर्यंत तो धुमाकूळ घालू लागला होता. दोनशे मैलांचा हा पट्टा होता.

सेंट्रल प्रॉव्हिन्स आणि वऱ्हाडचं मुख्य कार्यालय नागपूर होतं. या प्रांताचे प्रमुख चीफ कमिशनर होते. या प्रांताच्या कारभाराची जबाबदारी त्यांच्यावर होती.

कायदा आणि व्यवस्था पाहणं पोलिसांचं काम होतं. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस हे त्यांचे प्रमुख होते. ह्यांना आयजीपी म्हणत. त्यांचं कार्यालय ही नागपूरला होतं.

तंट्याचा उपद्रव वाढला होता. चीफ कमिशनरांना याची काळजी वाटत होती. पोलिसाच्या कामाबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. आयजीपींना पत्र लिहिले. पत्रातली भाषा कडक होती.

तंट्याविरुद्ध कडक कारवाई केली पाहिजे, असे चीफ कमिशनरांनी आदेश दिले. डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस हे स्वतंत्र पद निर्माण केलं. तंट्याचे दरोडे व लूटमारीचा बंदोबस्त करणे, गावपातळीवरच्या यंत्रणेची मदत घेणे, हा उद्देश समोर ठेवून ही नवीन नेमणूक केली. खांडवा हे मुख्यालय केलं.

हॅमिल्टन यांनी नवं काम स्वीकारलं. नव्या साहेबांनी जिल्हा पोलीस प्रमुखांची

बैठक घेतली. खांडवा, बेतूल, होशंगाबादचे अधिकारी हजर होते. बाजूच्या खरगोनला होळकरांचा मुलूख होता. होळकर महाराजांना विनंती केली. त्यांचे अधिकारी बैठकीला आले होते.

हॅमिल्टन साहेबांनी सहकाऱ्यांना कामाला लावले.

प्रत्येक गाव एक घटक आहे. या गावाचं रक्षण गावकऱ्यांनी करावं. बाहेरून दरोडेखोर आले. चोर आले. या पथकानं विरोध केला पाहिजे. प्रतिकार केला पाहिजे.

या ग्रामरक्षक पथकात गावातल्या तरुण मुलांची निवड केली. एका पथकात वीस-पंचवीस मुलं होती. एकाला पथक प्रमुख नेमलं. गावातले पाटील अथवा मालगुजारावर प्रमुखाची जबाबदारी टाकली. पथकातील सभासदांना मोफत शस्त्र दिले. त्यात बंदुका होत्या. तलवारी आणि लाठ्या होत्या. ही हत्यारं कशी वापरावी, हे शिकविलं.

काही सावकार-मालगुजारांवर पोलिसांचा विश्वास होता. त्यांना ऑनररी इन्स्पेक्टर नेमलं. चार-पाच गावाच्या रक्षणाचं काम त्यांच्यावर दिलं. ग्रामरक्षक पथकावर या इन्स्पेक्टरांचं लक्ष होतं. तंट्या अथवा त्याची माणसं आली अथवा दिसली की ग्रामरक्षक पथकानं जवळच्या पोलीस ठाण्याला खबर द्यायची. पोलिसांनी लाल कागदाची तबकडी तयार केली. दरोडेखोर आले. ही खबर आजूबाजूच्या गावांना पाठवायची. लाल तबकडीवर निरोपाचा मजकूर लिहायचा. लाल तबकडी पाहिली की माणसं सावध होतील. पोलीस धावत येतील.

ग्रामरक्षक पथकानं दरोडेखोरावर हल्ला केला. बंदुकीची गोळी झाडली. यात दरोडेखोर जखमी झाला, अथवा मारला गेला तरी ज्या व्यक्तीकडून हे घडलं, त्याला बक्षीस मिळेल. खुनाबद्दल माफी दिली जाईल.

हॅमिल्टन साहेबांची योजना सुरू झाली. थोड्या दिवसात चांगला परिणाम दिसू लागला. पोलीस अधिकाऱ्यांचा उत्साह वाढला. ग्रामरक्षक पथकाचे सभासद जोमाने कामाला लागले होते.

•

हॅमिल्टन साहेबांची मीटिंग झाली. तंट्याला पोलीस शिपायानं खबर दिली. नव्या साहेबानं बरीच तयारी केली. साहेबाला आल्या आल्या सलामी दिली पाहिजे. तंट्या मनाशी म्हणाला, चटकन विचार केला. आता उशीर नको.

हॅमिल्टन साहेब खांडव्याच्या गेस्ट हाऊसमध्ये मुक्कामाला होते. तंट्या विरुद्ध कारवाई सुरू केल्याचं समाधान झालं होतं. योजनेचा चांगला परिणाम दिसू लागेल,

अशी साहेबांना खात्री होती.

तंट्याचा मुक्काम छोटा तवा नदीकाठी होता.

खबऱ्या येऊन गेला, तंट्यानं चौदाजणांना बरोबर घेतलं.

मालगावाकडं कूच केलं. खांडवा येथून दहा मैलावर होता.

गाव जवळ येताच तंट्या थांबला. तुकडीचे दोन भाग केले. एक तुकडी गोविंद तेल्याच्या घराकडं निघाली, दुसरी गावाच्या धर्मशाळेकडं आली.

गावाच्या कडेला धर्मशाळा होती. धर्मशाळेत लछमन पाटील बसले होते. त्यांच्या बरोबर एक पोलीस शिपाई होता. तो सायंकाळचं जेवण तयार करीत होता.

तंट्या धर्मशाळेपुढं उभा राहिला. पाटील आणि पोलिसांना याची कल्पना नव्हती.

''कोन हाय आत?'' तंट्यानं आवाज दिला.

लछमन पाटलानं बाहेर बघितलं. तंट्या दिसताच ते चटकन उभे राहिले.

''राम राम तंट्या मामा'', पाटील गडबडीत म्हणाले.

''आनकी कोन हाय बरुबर?''

लछमन पाटलानं स्वयंपाक करणाऱ्या शिपायाकडं बघितलं. हळू आवाजात, पोलीस आहे, असं म्हणाले.

तंट्या बरोबरच्या साथीदारानं बंदूक रोखली. चाप ओढला, पोलीस शिपाई पुन्हा उठला नाही.

तंट्याच्या सलामीनं हॅमिल्टन साहेब सावध झाले.

हॅमिल्टन साहेबांचे ग्रामपथकाचे काम सुरू झाले. लाल तबकडीवर इशारा गेला. पोलीस पथक धावले. घटनास्थळी पोहोचले. तो पर्यंत खुनी पसार झाले होते. गाववाले कोण आलं, हे सांगत नव्हते.

एका दिवशी पोलिसांना खबर आली. तंट्या येत आहे. पोलीस त्या गावी धावत आले. यावेळी तंट्यानं शेजारचं गाव लुटलं. मालगुजाराची बंदूक हिसकावून नेली.

एकाच दिवशी अठरा चौक्यांवर लाल तबकड्या पोहोचल्या होत्या. पोलिसांची भागदौड झाली. तंट्याच्या नावानं त्याचवेळी दुसरं गाव लुटलं होतं. लुटली गेलेली गावं दूरदूर होती. मात्र हल्ल्याची वेळ एकच होती. लाल तबकडीनं निरोप दिला होता. त्या गावावर तंट्या चालून येत आहे. ग्रामरक्षक पथक तयार झाले. पोलीस दबा धरून बसतो. नेमका यावेळी तंट्यानं दुसऱ्या ठिकाणी झटका दिला होता.

लाल तबकडीनं सगळीकडं गोंधळ माजविला. खरं-खोटं कळेना. तंट्यानं पोलिसांचा डाव त्यांच्यावर उलटविला. भागदौडीनं दमविल होतं. साहेबांनी लाल तबकडीची योजना बंद केली.

## बापू मांगाची तंट्याविरुद्धची मोहीम

बापू मांग पोलीस हवालदार होता. पथकाला शस्त्र चालविणं बापूनं टिकविलं होतं. ही बातमी तंट्याला ग्रामरक्षकाकडून कळली होती. त्या बापूला धडा शिकवायचा, तंट्यानं निर्णय घेतला.

तंट्याचे खबरे बापूच्या मागावर होते. बापू सुलगाव बंजाराला होता. तंट्यानं साथीदार बरोबर घेतले. वीस जणांची टोळी झाली होती. ह्यात बोंदऱ्या होता, बिजनियाला फाशी झाली होती आणि त्याची जागा बोंदऱ्यानं घेतली होती.

ती एकवीस मार्चची सायंकाळ होती.

सुलगाव बंजारा गावात तंट्या आला. देवथरा नावाचा मालगुजार पोलिसांना मदत करीत होता आणि बापू मांगाची त्याला पूर्ण साथ होती, हे तंट्याला पक्क समजलं होतं.

देवथराच्या घरासमोर बापू मांग बसला होता. बोंदऱ्यानं त्याला बाजूच्या झाडाला बांधलं.

''बापू मानसाले हत्यार चालवाया शिकवतुया. लई साथ देतुया, बापूले कोनचं बक्तीस द्यायचं?'' तंट्यानं बोंदऱ्याला विचारलं.

''त्येला वर पाठून देवा. लई चांगला काम कतोय त्यो,'' बंदूक रोखीत बोंदऱ्या म्हणाला.

''नाय तंट्या दादा, मारु नाय बाप्याला. त्येचं नाक छाटून सोडून देवा. म्हंजे त्येच्या सायबाले जाईल नकटे नाक दाकवाले.'' दुसऱ्यानं सुचविलं.

शेवटची सूचना तंट्याला आवडली. बापू मांगाचं नाक छाटलं. दोन फटके मारले. पळवून लावलं. त्यानंतर तंट्या मालगुजाराकडं वळला. त्याचा समाचार घेतला, त्याला दंड म्हणून बाराशे रुपये घेतले. दागिने घेतले. दम देऊन टोळी निघून गेली.

तंट्याला आपली हालचाल कशी कळते?

पोलीस अधिकारी गोंधळात पडले होते. आपलीच माणसं तंट्याला मदत करतात. पोलिसांच्या हालचालीची खबर पोहोचवतात, अशी पोलिसांची खात्री

झाली होती.

तंट्याचे खबरे पोलिसांपेक्षा हुशार होते. पोलीस पथक निघालं. एखादा मालगुजार गद्दारी करतो. सावकार पोलिसांची सरबराई करतो, यावर तंट्याचे गुप्तहेर लक्ष ठेवून होते.

पोलीस नवी योजना आखीत होते. तंट्या त्यांच्यावर डाव उलटवून चढाई करीत होता. पोलिसांना अपयश येत होतं.

इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यामुळे नाराज होते. चीफ कमिशनर त्यांना पोलिसांच्या अपयशाबद्दल असमाधान व्यक्त करीत होते. खांडवा जेलमधून तंट्या पळाला होता, ह्या घटनेला सात वर्षं होत आली. ह्या कालावधीत पोलिस त्याच्या मागावर होते. ह्यांच्या दोन तीन साथीदारांना पकडले होते. याशिवाय पोलीस काही करू शकले नव्हते.

१८८० ला दौत्याला अटक झाली होती. खटला भरला होता. जन्मठेपेची शिक्षा झाली. १८८१ ला बिजनियाला फाशी झाली. यानंतर पोलिसांना काही यश आलं नव्हतं.

उलट तंट्याचा दरारा वाढला होता. पोलीस यंत्रणेवर नामुष्कीची वेळ आली होती.

तंट्या सापडत नव्हता. त्याच्या हालचाली थांबत नव्हत्या. तो मालगुजारांना लुटत होता. सावकारांना दंड करीत होता. गरिबांना मदत करीत होता आणि पोलीस मात्र धावपळ करीत होते.

असं का व्हावं?

खरंच तंट्या आहे काय? की त्याच्या नावानं अनेक डाकू फायदा उठवीत आहेत?

इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांचं कोडं सुटत नव्हतं. त्यांनी एक निर्णय घेतला. दोन हुशार इन्स्पेक्टरांना बोलावलं.

''तुमच्यावर एक विशेष कामगिरी सोपवीत आहोत. तुम्ही व्यापाऱ्याच्या वेशात निघायचं. होशंगाबाद, बेतूल, खांडवा, खरगोनहून इंदूरपर्यंत जायचं. हा सगळा तंट्याचा मुलूख आहे. तुम्ही या भागात लोकांना भेटा. शेतकरी आदिवासींशी बोला. पोलिसाची माहिती काढा. परत येऊन रिपोर्ट करा.''

ते दोघे इन्स्पेक्टर नागपूरहून निघाले. व्यापाऱ्याचं वेशांतर केलं. सुरक्षितता म्हणून सोबत पिस्तोल व तलवार घेतली. त्यांचा प्रवास सुरू झाला.

वरील भागातून ते इंदूरपर्यंत गेले. परत नागपूरला आले.

इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांना आपला अहवाल सादर केला. अहवालात त्यांनी लिहिलं होतं,

सातपुडा-विंध्याच्या पट्ट्यात आम्ही फिरलो. तंट्याची या भागावर पकड आहे. शेतकरी, आदिवासीतील भिल्ल-कोरकू-बंजारावर त्याच्या अलौकिक शक्तीचा खूप मोठा प्रभाव (सुपर नॅचरल पॉवर) आहे. येथली माणसं त्याला देवासारखे समजतात. ह्यामुळं ती पोलिसांना मदत करत नाही. तंट्यासाठी जीवावर उदार झालेले अनेक तरुण आहेत.

या इन्स्पेक्टरांची मोहीम यशस्वी झाली होती. त्यांच्या गैरहजेरीबद्दल साथीदारांनी काही विचारलं नाही. वेशांतरात पोलिसांनी त्यांना ओळखलं नाही. चौकशी केली नाही. संशय दाखविला नाही.

यात पोलीस यंत्रणेचा हलगर्जीपणा दिसून आला होता. कामाबद्दल अनास्था दिसत होती. जणू पोलिसांना तंट्याला पकडण्यात रस नव्हता आणि होळकर पोलिसांचे बिलकूल सहकार्य मिळत नव्हते.

खांडवा तेथे पोलीस अधीक्षक नेलर आले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला, अस्वस्थ होऊन चीफ कमिशनरांना अहवाल पाठविला.

आपले पोलीस कुचकामी आहेत. मला शंका येते. ते तंट्यासाठीच जणू काम करतात. पोलिसांची छोटी हालचाल तंट्याला कळते. याचा अर्थ तंट्याचे गुप्तहेर आपल्यापेक्षा कार्यक्षम आहेत. या प्रकारानं लोकांचा पोलिसांवर विश्वास राहिला नाही. ते तंट्यालाच साथ देत आहेत. इतकी वर्षं झाली. तंट्या अथवा त्याचा साथीदार दिसत नाही. सापडणं तर दूरच राहीलं. आता तंट्या विरुद्ध कारवाई करण्यासाठी ब्रिटिश इन्स्पेक्टरांशिवाय दुसरा पर्याय नाही.

✪

# जंगलचा राजा तंट्या

चीफ कमिशनरासमोर पोलीस अहवाल होता. त्यात मोठा भाग तंट्याबद्दलच होता. एका भिल्लानं बलाढ्य सत्तेला दमविलं होतं. सात वर्षे झाली होती, तंट्याचा बंदोबस्त होऊ शकला नव्हता.

चीफ कमिशनर एका मजकुरापाशी थांबले. होशंगाबाद जिल्ह्याबद्दल अहवाल होता. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसांनी अहवालात लिहिलं होतं,

होशंगाबाद जिल्ह्यात तंट्याचं वर्चस्व आहे. निमाडमध्ये तर त्याचीच अधिसत्ता आहे. तो एखाद्या गावात आला की गावकरी त्याचं स्वागत करतात. एखाद्या राजासारखा मान देतात.

चीफ कमिशनरांनी अहवाल बंद केला. ते विचार करू लागले. तंट्याच्या रुपानं त्यांच्यासमोर संकट होतं. त्यानं आता गंभीर रूप धारण केलं होतं. तो एक सामान्य भिल्ल नव्हता. जनतेच्या गळ्यातला ताईत बनला होता. काळजी करण्यासारखी परिस्थिती होती.

मुंबईहून खास ब्रिटिश इन्स्पेक्टरांना निमाडमध्ये पाठवायचं ठरविलं. देशी इन्स्पेक्टर गद्दारी करतात, यावर हा उपाय काढला होता.

तंट्याला पकडायचं. ब्रिटिश इन्स्पेक्टरांनी आव्हान स्वीकारलं. तो अधिकारी मुंबईहून रेल्वेनं निघाला. इंदूरजवळ महूगाव आहे. जवळच पाताळपाणी रेल्वे स्टेशन आहे. तिथं पोलिसांची छावणी होती. तंट्याविरुद्धच्या कारवाईचं ते केंद्र होतं.

पाताळपाणी स्टेशन दोन मैल राहिलं होतं. रेल्वे रस्त्याला चढ होता. तसेच रस्त्याला बांगडी आकाराचं वळण होतं. उरजड चढण होती. झुकझुक करत रेल्वे चालली होती. रेल्वेच्या प्रथमवर्गाच्या डब्यात ते इन्स्पेक्टर बसले होते. गाडीचा वेग कमी होता. प्रथमवर्गामागच्या डब्यात दोघं हमाल चटकन चढले. चालत्या गाडीत चढण्याची त्यांना सवय होती.

पाताळपाणी रेल्वे स्टेशन आलं. गाडीचा वेग कमी झाला होता. ब्रिटिश इन्स्पेक्टरांनी बाहेर बघितलं. स्टेशनच्या नावाची पाटी वाचली. सामान घेऊन डब्या

बाहेर आले.

इन्स्पेक्टर इकडं तिकडं पाहू लागले. एक किरकोळ शरीराचा हमाल पुढं आला. गोऱ्या साहेबांना हात जोडले. लाल डगल्याचा हमाल म्हणाला, ''रामराम सायेब, सामानाला हात लावू का? तुमाले छावनीकडं जायचं हाय ना? म्या दाकवितो रस्ता. हमालीचं काय नाय. तुमच्या खुशीला जे येईल ते द्या.''

बडबड्या हमालाकडं इन्स्पेक्टर बघत होते.

साहेब हसले. हसणं ही परवानगी वाटली त्याला. सामान डोक्यावर घेतलं. पोलीस छावणीकडं निघाला. हमालानं बोलणं सुरू केलं. बोलता बोलता हमालानं साहेबांना सहज सांगितलं. त्याच्या ओळखीचा एक शेतकरी आहे. त्या डोंगर करपाडीला राहतो. त्याच्याकडं अधून मधून तंट्या येत असतो.

इन्स्पेक्टरनं चमकून हमालाकडं पाहिलं.

''तुला माहीत आहे काय?'' साहेबांनी विचारलं.

''सरकारनं मोठ्ठ बक्षीस ठेवलं आहे. तू मला मदत केली तर....''

हमालानं घाबरायचं नाटक केलं. आढेवेढे घेतले. शेवटी साहेबाला मदत करायला तयार झाला. हमालानं एक अट घातली. बक्षिसाची अर्धी रक्कम अगोदर द्या. त्यातला हिस्सा शेतकऱ्यास आज देऊन येतो.

सायंकाळी साहेबांनी हमालाला रक्कम दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी निघायचं ठरलं.

रात्रभर साहेबांना नीट झोप आली नाही. पहाटे पहाटे डोळा लागला. त्यांना स्वप्न पडत होतं. मोठी कामगिरी त्यांनी केली होती.

सकाळी हमाल परत आला. साहेब वाट पाहत होते.

पोलीस छावणीसमोर एक धबधबा होता. त्याचं नाव कालाकुंड होतं. साहेब धबधब्याशेजारी उभे होते. दरीतून हमाल वर येत होता.

हमालानं साहेबाला रामराम केला.

''सायेब तुमी लई नशिबवान हायेत. आज शिकार जाळ्यात येईल बगा.'' हमालानं माहिती पुरवली. ''चला सायेब, निगू आपून.''

धबधब्याच्या बाजूनं ते चालू लागले. हमाल पुढं चालत होता. साहेब त्याच्या मागून. दरी ओलांडून झाली. समोरची डोंगराची रांग मागं पडली. जंगल सुरू झालं. हमाल झरझर चालत होता. साहेब पाय ओढत चालत होते.

सूर्य डोक्यावर आला. जंगल असूनही उकाडा जाणवत होता. साहेबांची दमछाक झाली होती. तहान लागली होती. घसा कोरडा पडला.

थकलेल्या साहेबांना हमाल म्हणाला, ''म्याच हाय तंट्या, पकडा मले.''

साहेबाचं हत्यार तंट्यानं हिसकावून घेतलं. साहेब त्याच्या मागं धावू लागला. झुडपा आड लपाछपी सुरू झाली. साहेबांना दमवून तंट्या जंगलात पसार झाला.

साहेब कसेबसे परतले. त्यांचा स्वत:वर विश्वास नव्हता. तंट्यानं त्यांना जिवंत कसं सोडलं? हाच विचार ते करू लागले.

निमाडमध्ये अनेक संस्थानं होती. त्यांना रियासत म्हणत. या रियासतीकडं काही गावाची जहागिरी होती. संस्थानिक या गावाचा सारा वसूल करत. त्यातला काही हिस्सा ब्रिटिश सरकारकडं पाठवीत. या रियासतीचा कारभार त्या त्या राजाकडं होता. जे राजे ब्रिटिशांचे मांडलिक होते, त्यापैकी घाटाखेडी एक रियासत होती. खांडव्याहून ते वीस मैलावर होतं. पंधाना पोलीस स्टेशन आठेक मैलावर होतं. ठाकूर तखतसिंहजी घाटाखेडीचे राजा होते.

ठाकूरजीचे पूर्वज राजस्थानात राहत होते. त्यांचे आजोबा पाचशे वर्षापूर्वी इकडं आले. ते राजपूत होते. लढवय्ये होते. लढाया करून त्यांनी हुकमत वाढविली. घाटाखेडी संस्थान स्थापन केलं.

आजोबाच्या काळात संस्थान मोठं होतं. तीनशे सत्तर गावं होती. ब्रिटिशांनी जहागिऱ्या खालसा केल्या. गावांची संख्या कमी झाली. ठाकूर तखतसिंहाच्या काळात तीस गावं उरली.

घाटाखेडीच्या पश्चिमेला बिरडा गाव होतं. ते तंट्याचं गाव होतं. तंट्या इथं जन्मला. इथंच वाढला होता. त्याचे वडील मंजुरी करीत होते. मालकाचं शेत कुळानं करीत होते. कुळाची रक्कम थकली. मालकानं झिडकारलं. चारचौघात मारलं. भीती आणि उपासमारीनं ते वारले. बिरडा सोडून तंट्या पोखरला आला.

घाटाखेडी पंधाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत होतं. पंधाना मात्र ब्रिटिश हद्दीत होतं. तंट्या निमाडमध्ये धुमाकूळ घालू लागला. सर्व पोलीस स्टेशनांवर कुमक पाठविली होती.

ठाकूर तखतसिंहाबद्दल ब्रिटिशांना संशय येऊ लागला. ठाकूरजी घाटाखेडीचे संस्थानिक होते. ब्रिटिशांचे मांडलिक होते. ते तंट्याला मदत करतात. तंट्या त्यांच्याकडं येत असतो. मिळालेली लूट ठाकूरजीकडं ठेवतो. ठाकूरजी ब्रिटिशांशी गद्दारी करतात, असे अधिकाऱ्यांना वाटत होते. पोलीस ठाकूरजींच्या हालचालीवर नजर ठेवू लागले.

तरीही तंट्याच्या हालचाली कमी होत नव्हत्या. ठाकूरजी तंट्याशी गुप्तपणे मदत करीत होते. पोलिसांना ही माहिती मिळत होती.

शेवटी पोलीस अधीक्षकांनी निर्णय घेतला. एका हवालदाराला घाटाखेडीला पाठविलं. ठाकूरजींना पंधाना पोलीस ठाण्यावर घेऊन आले.

''ठाकूरसाब, आपण तंट्याला मदत करता. मोठ्या साहेबांनी तुम्हाला इशारा द्यायला सांगितलं, यासाठी तुम्हाला आज बोलाविलं आहे. इथून पुढं जपून राहा. नाही तर....'' पंधाना ठाणेदार म्हणाले.

''आम्ही तर माय-बाप सरकारचे हित पाहणारे. तंट्याला आम्ही कसे मदत करणार? त्याचं गाव आमच्या रियासतीजवळ आहे, एवढाच आमचा त्याचा संबंध.'' ठाकूर तखतसिंगजी म्हणाले.

''ठाकूरजी, तुम्ही सफाई करू नका. आमच्याकडं पुरावा आहे. तंट्याचा वावर तुमच्या हवेलीपर्यंत आहे. याचा अर्थ काय लावायचा आम्ही?''

ठाकूरजी गप्प झाले.

त्या दिवशी ठाकूर तखतसिंगजी घाटाखेडीला परत आले नव्हते. खांडव्यालाही मोठ्या साहेबाकडे गेले नव्हते. महाराजांना पोलीस ठाण्यावरच बसवून ठेवलं होतं. ही खबर आजूबाजूच्या गावात पसरली.

घाटाखेडी संस्थानातली माणसं पंधानाकडं येऊ लागली. आपल्या राजाला गोऱ्या साहेबांनी अडकून ठेवलं. राजाला सोडविलं पाहिजे. चौकीभोवती गर्दी वाढू लागली. जनतेनं पोलीस ठाण्यास वेढा घातला.

दोन-तीन हजार माणसांचा जमाव होता.

''आमच्या राजाला सोडा. राजाला सोडल्याशिवाय आम्ही इथून हलणार नाही.'' जमाव ओरडू लागला.

खांडव्याला बातमी गेली. मोठ्या साहेबांनी माणूस पाठविला. तखतसिंगांना समज देऊन सोडलं.

ठाकूर तखतसिंग पोलीस ठाण्याबाहेर आले. रयतेनं त्यांच्या नावाचा जयजयकार केला. आपल्या राजाला घाटाखेडीपर्यंत घेऊन आले.

## शेतकरी-आदिवासींचा तारणहार

तंट्याला अनेक साथीदार येऊन मिळाले होते. त्यात भिल्ल होते. बंजारा होते. कोरकू होते. राजपूत होते. परदेशी होते. कुणबी होते. सगळ्या जातींचे आणि जमातीचे साथीदार होते.

नारायण कुणबी तंट्याचा एक साथीदार होता. नारायण टाकळीचा राहणारा

होता. सावकारानं त्याच्यावर अन्याय केला होता. त्यामुळं सावकाराबद्दल त्याला राग होता.

तंट्यानं सावकाराविरुद्ध लढा सुरू केला होता. तो जुलमी सावकारांना शिक्षा करीत होता. ह्या कारणानं नारायणला तंट्या जवळचा वाटू लागला. तंट्याला मदत करावी असं त्याला वाटू लागलं. तंट्याला येऊन तो मिळाला.

निमाडमध्ये सावकार शेतकऱ्यांना पिळतात. आदिवासींना कर्जात गुंतवून ठेवतात. पिढ्यानंपिढ्याची गुलामगिरी संपत नाही. हे तंट्या आणि नारायण कुणबी पाहत होते.

सावकाराचा हा गरिबांच्या गळ्याभोवती पाश आहे. त्यातून शेतकरी-आदिवासींची सुटका केली पाहिजे.

सुटका कशी करायची?

तंट्या आणि नारायणनं तोडगा काढला. गरिबांना नड असते. अडचण आली की त्यांना सावकाराकडं जावं लागतं. मजबुरीनं हात पुढं पसरावे लागतात. शेतकरी-आदिवासींची ही अडचण सोडविली पाहिजे.

तंट्यानं गरिबांना मदत सुरू केली.

आम्ही मदत करतो. दिलेल्या पैशावर व्याज आकारणार नाही. पण सावकाराकडं जाऊ नका. तंट्याची माणसं गावोगाव मदत करू लागली. ही मदत अनेक प्रकारची होती.

लग्न समारंभासाठी ते पैसे देत. एखाद्याकडं शेतीसाठी बैल नाही. बैल घेऊन दिला. बैलगाड्या दिल्या. शेतात पेरायला बी-बियाणं नाही. ती मदत केली गेली.

शेतकरी धान्य विकायला दुकानदाराकडं जात. दुकानदार बनियाचे होते. ते कमी भावानं धान्य खरेदी करायचे. धान्य मोजताना दांडी मारायचे. मापाड्याचा हिस्सा अगोदर काढून घ्यायचे. ही दुहेरी पिळवणूक होती. कर्जाऊ धान्य देताना जास्त भाव लावायचे. खळ्यावर दिलेल्या धान्याच्या दुप्पट वसूल करायचे.

हे थांबलं पाहिजे. बनिया ऐकणार नाहीत. त्यांची साहेबांपर्यंत पत होती. शेतकरी-आदिवासींना ते जवळचे वाटत. शेतकऱ्यांना तंट्याची माणसं भेटत होती. त्यांचं धान्य खरेदी करीत होती. बनियापेक्षा जास्त भाव तंट्या देत होता. सावकार-बनियांना काळजी वाटू लागली. त्यांचा लोकांवरचा वचक कमी झाला होता.

ठाकूर तखतसिंगाबद्दल तंट्याला आदर होता. ठाकूरजी त्याच्या भागाचे राजाच होते. लहानपणापासून राजा जवळचा वाटायचा. त्यांचा घाटाखेडीचा महाल भव्य होता.

तंट्याचं बिरडा गाव घाटाखेडीहून जवळ होतं. पूर्वी तंट्या घाटाखेडीला आला होता. दुरून राजवाडा पाहिला होता. राजवाड्याचं मुख्य दार मोठं होतं. बाहेर राजाचे चौकीदार असायचे. दसऱ्याला ठाकूर तखतसिंग रयतेला दर्शन देत. तंट्यानं दूरवरून या राजाला पाहिलं होतं. खूप वर्ष झालीत या गोष्टीला.

तंट्या बिरडाहून पोखरला आला.

तंट्याचं नाव निमाडमध्ये गाजू लागलं. हे ठाकूर तखतसिंग ऐकून होते. त्यांना तंट्याबद्दल सहानुभूती वाटत होती. आपण जे करू शकत नाही, ते तंट्या करतो. ह्या गोष्टीचं त्यांना कौतुक होतं.

तंट्याला मदत केली पाहिजे. ठाकूरजींना वाटू लागलं. उघड मदत करता येत नव्हती. ते ब्रिटिशांचे मांडलिक होते. ठाकूरजींचा ब्रिटिश सत्तेबद्दल रागही होता. कारण त्यांनी ठाकूरजींची रियासतीची गावं कमी केली होती. पंख कापलेल्या पक्ष्यासारखे ते झाले होते.

तंट्या सरकारविरुद्ध काम करतो, ह्याचं त्यांना समाधान वाटत होतं. त्यामुळं तंट्याला ते आतून मदत करू लागले. तंट्याच्या माणसांना रियासतीत मुक्त वावर होता, आणि तंट्याही या इलाख्यात त्रास देत नव्हता.

ठाकूर तखतसिंगांना पंधानाला एक दिवस डांबून ठेवले, ही खबर तंट्याला कळली होती. ठाकूरजी आपल्याला मदत करतात, हे गोऱ्या साहेबांना देखवत नाही. पोलिसांनी राजाला पंधानाला बोलावले, हा त्यांचा अपमान होता. एक प्रकारे मानहानी होती.

पंधानाचे फौजदार आनंदात होते. ठाकूरजींना धडा शिकविला. या कारवाईनं ते सुखावले होते. आठ दिवस झाले होते या घटनेला.

सकाळची वेळ होती. फौजदार खोलीबाहेर बसले होते. खोली चौकीच्या बाजूला होती. नेहमीचा न्हावी अजून आला नव्हता. दाढी केल्याशिवाय उठता येत नाही. फौजदार साहेब त्याची वाट पाहत होते.

बगलेत धोपटी अडकवलेला न्हावी समोर आला. बुटकेला नवा न्हावी दिसला. साहेबांनं शिपायाकडं आश्चर्यानं पाहिलं. नेहमीचा न्हावी बाहेरगावी गेला. दुसरा शोधून आणला, यामुळं उशीर झाला. शिपायानं खुलासा केला.

फौजदारासमोर न्हावी बसला. साहेबांच्या दाढीला पाणी लावत विचारलं, ''सायेब, आज लई गरबडीत दिसता?''

न्हावी बडबड्या होता. साहेबांची स्तुती करू लागला. फौजदार खुलले. ते

सहज म्हणाले,

''काय करावं, साला त्या तंट्यानं नाकात दम आणला. दररोज नव्या ठिकाणी दणका देतोय.''

न्हाव्यानं फौजदाराकडं पाहिलं. त्याचा दाढीवरचा हात थांबला. हातातला वस्तरा तसाच होता. न्हाव्यानं साहेबाकडं रोखून पाहिलं. त्याचा चेहरा रागानं लालबुंद झाला होता.

''तंट्याला साला म्हणता व्हय'' म्हणत न्हाव्यानं चपळाईनं वस्तरा चालविला. फौजदारांचा नाकाचा शेंडा उडवला गेला. न्हावी उभा राहिला. ''सायेब, आता सांगा लोकाले, तंट्यानं नाक कापलं.''

धोपटी सोडून न्हाव्यानं उडी मारली. फौजदार ओरडू लागले. अरे पकडा तंट्याला.

पोलिसांची पळापळी सुरू झाली. तंट्या मात्र पसार झाला होता.

पोलिसांनी तखतसिंगांची मानहानी केली होती. याचा बदला तंट्यानं घेतला होता. त्याला आपल्या राजाबद्दल आदर होता. ब्रिटिशांनी राजाचा अपमान केला होता, ही गोष्ट तंट्याच्या मनाला लागली होती.

ब्रिटिशांच्या दृष्टीनं तंट्यानं कायदा हातात घेतला होता. त्यानं फार मोठा गुन्हा केला होता. तंट्यानं मात्र त्याचं कर्तव्य केलं होतं, असंच त्याला वाटत होतं.

ब्रिटिशांच्या नजरेत तंट्या दरोडेखोर होता. पण तंट्या खरंच तसा होता का? त्याला भारतीय राजा आपला वाटायचा. घाटाखेडी संस्थान आणि होळकरांचा त्याला आधार वाटायचा.

गरिबाबद्दल कणव वाटायची. साथीदारांबद्दल प्रेम वाटायचं. त्यांच्यावर तो जिवापाड माया करायचा. पण साथीदारानं चुकी केली की तो त्यांना कठोर शिक्षा करायचा. सगळ्यांना तो सारखा समजे. हा त्याचा न्याय होता. आजारी माणूस पाहिला की तो दु:खी होई. त्याला चटकन मदत करी. दुसऱ्याची वेदना त्याला स्वत:ची वाटे. ही त्याची माणुसकी होती.

फौजदाराच्या घटनेनं पोलीस बिथरले. तंट्या विरुद्धची मोहीम जोरात सुरू झाली. आणि तंट्यानं कालीभीतच्या जंगलात मुक्काम हलवला.

# कालीभीत जंगलात तंट्या

खांडव्याच्या पूर्वेला कालीभीत जंगल होतं. सातपुड्याच्या रांगांचा हा भाग होता. जंगलात एक टेकडी होती. टेकडीवर कालियाबाबांचं ठिकाण होतं. हे ठिकाण पवित्र समजलं जाई. सगळ्या रहाळांतली माणसं कालियाबाबांच्या दर्शनाला येत.

कालीभीत टेकडी भोवतीचं जंगल घनदाट होतं. नद्या नाल्यांनी टेकडीला वेढा घातला होता. टेकडीवर मोठमोठे दगड होते. काळेशार दगड जणू कालियाबाबांचे रक्षण करीत होते. दगडामुळं गुहा तयार झाल्या होत्या. इथं लपायला भरपूर जागा होती. टेकडीची जागा उंचावर होती. आजूबाजूला टेहळणी करायला सोपी होती.

कालीभीत जंगलाला लागून मकडाई संस्थान होतं. मकडाईच्या राजाची तंट्याला मदत होती. राजानं कालीभीत जंगलात झोपड्या बांधल्या होत्या. त्या निवाऱ्याच्या जागी तंट्या थांबायचा. राजानं झोपड्यात अन्नधान्य ठेवलं होतं.

मकडाई संस्थान छोटं होतं. सगळा डोंगराळ भाग होता. जंगल होतं. जंगलात आदिवासी राहत होते. त्यात कोरकूंची संख्या जास्त होती. संस्थानाच्या चारही बाजूंना ब्रिटिशांचा मुलूख होता.

तंट्या कोरकूंना मदत करत होता. त्यामुळं ते त्याला मामाच म्हणत होते. कोरकू तरुण त्याच्यासाठी काही करायला तयार होते.

तंट्या कालीभीत जंगलात मुक्कामाला होता. पोलिसांना पक्की खबर मिळाली होती. कालीभीत जंगलातले रस्ते अवघड होते. पायवाटा धोक्याच्या होत्या. वाघाच्या गुहेत शिरण्याचा धोका होता. तंट्याला तो भाग परिचयाचा होता. पोलीस मात्र जंगलात जायला धजत नव्हते.

पोलीस अधिकाऱ्यांची बैठक झाली.

तंट्या कालीभीत टेकड्यात लपला आहे. त्या टेकड्यांना वेढा द्यायचा. त्याच्या मदतीची रसद बंद करायची. त्याची उपासमार करायची. कोंडी झाली की

तो बाहेर येईल. पोलिसांचा असा अंदाज होता.

नर्मदा खोऱ्याच्या डेप्युटी कमिशनरांनी चीफ कमिशनरांना विनंती केली. तंट्याला पकडण्यासाठी ही संधी आहे. यासाठी अधिक पोलीस बळाची गरज आहे. सेंट्रल पॉव्हिन्स आणि वऱ्हाडच्या पोलीस तुकड्या निमाडमध्ये पाठवा. त्यात घोडदलांचा समावेश हवा.

चीफ कमिशनरांनी परवानगी दिली. इतर जिल्ह्यातलं अधिक पोलीसं दल पाठविलं. निमाड, होशंगाबाद, बेतूल जिल्ह्यात ते तैनात केलं. प्रत्येक गावात तंबू उभारला. तात्पुरती पोलीस चौकी उभारली. बाहेरून आलेल्या पोलिसांना तिथं नेमलं यांच्या मदतीला पोलिसाचं घोडदळ दिलं. घोडदळानं कालीभीत जंगलाला वेढा दिला.

ब्रिटिश अधिकाऱ्यांचा आदिवासींचा अभ्यास होता. आदिवासी चालीरीती त्यांनी समजून घेतल्या होत्या. त्यांच्या लोकजीवनात घोड्याबद्दल पवित्र भावना होत्या.

आदिवासी घोड्याला पवित्र मानतात. घोड्यावर बसलेली व्यक्ती देवासारखी असते. देवाला मान दिला पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा असते. यामुळं घोड्यावर बसलेल्या माणसाला आदिवासी हात लावत नाहीत. त्रास देत नाहीत. हल्ला करत नाहीत. त्याचा आदर करतात.

घोडा ही शक्ती आहे. ह्या शक्तीला ते मान देतात. ह्या घोड्याला आदिवासी संस्कारात स्थान आहे. आदिवासी माणूस मरण पावतो, अंत्यसंस्कार केला जातो. त्या ठिकाणावर एक दगडी चिरा उभारतात. दगडी चिऱ्यावर घोड्यावर बसलेली आकृती कोरतात. घोड्यावर बसलेली व्यक्ती श्रद्धेचं प्रतीक बनतं.

आदिवासींच्या जीवनात हे घोड्याचं महत्त्व आहे.

सावकार-मालगुजारांना हे माहीत होतं. त्यामुळं ते घोड्यावरून जंगलात प्रवास करू लागले. घोड्यावर बसलेल्या माणसावर आदिवासी हल्ला करीत नाहीत, हे सावकार-मालगुजार जाणून होते.

हीच गोष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी ओळखली होती. त्यासाठी त्यांनी पोलीस बोलावले. घोड्यावर बसलेल्या माणसावर हल्ला करू नये असा आदिवासींचा संकेत आहे. तंट्याची माणसं पोलिसांवर हल्ला करणार नाहीत, असं अधिकाऱ्यांना कळत होतं.

निमाड पोलीस अधीक्षकांनी आणखी एक तक्रार केली. स्थानिक इन्स्पेक्टर भरवशाचे नाहीत. सरकारशी निष्ठा नाही, असं त्याचं वागणं दिसतं. याकरिता मुंबईहून ब्रिटिश इन्स्पेक्टर पाठवा. त्यांच्या निगराणीखाली कालीभीत जंगल

तपासता येईल.

चीफ कमिशनरांनी ही सूचना मान्य केली. मुंबईहून ब्रिटिश इन्स्पेक्टरांना या मोहिमेसाठी पाठविलं. कालीभीत जंगलाभोवती पोलिसांनी वेढा दिला. जंगलं आणि दऱ्याखोऱ्यात तपास केला. कालीभीत टेकडीवर कालीबाबांची गुहा होती. पोलीस तेथे पोहोचले.

एका टेकडीवर कालियाबाबाचा तांदळा होता. आजूबाजूला प्रचंड आकाराचे मोठाले दगड होते. दगडाच्या आडोशामुळं गुहेसारखा भाग तयार झाला होता. या ठिकाणी कोणी तरी राहात असावं, अशा खुणा आढळून आल्या.

पोलीस या ठिकाणी पोहोचण्यापूर्वी तंट्यानं तळ हलविला होता. कालीभीतचं जंगल मकडाईच्या राजाच्या हद्दीत येत होतं. मकडाई छोटं संस्थान होतं. सगळा भाग डोंगर आणि घनदाट जंगलानं व्यापलेला होता. जंगलात आदिवासीचीच वस्ती होती.

तंट्या वारंवार कालीभीत जंगलात येतो अशी पोलिसांना पक्की खबर मिळली होती. जंगलातली सगळी माणसं तंट्याला मदत करतात. पोलिसांच्या हालचालीची खबर पोहोचवितात. त्यामुळं पोलीस पोहोचण्यापूर्वी तंट्या राहण्याचं ठिकाण बदलत होता.

चीफ कमिशनरांनी मकडाईच्या राजाकडं कडक शब्दात तक्रार केली. तंट्या विरुद्धच्या मोहिमेत मकडाईचे पोलीस ढिलाई करीत आहेत.

मकडाईच्या राजानं चीफ कमिशनरांना हमी दिली. सर्व प्रमुख रस्त्यावर पोलीस चौक्या उभारीत आहोत. जंगलात तंट्या येणार नाही, याची काळजी घेतो. पुन्हा तक्रारीची वेळ येणार नाही.

ब्रिटिश अधिकारी संशयी होते. मकडाईच्या राजाच्या या आश्वासनावर त्यांनी विश्वास ठेवला नाही. होशंगाबादचे पोलीस अधीक्षक कॅप्टन रतनसिंग होते. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस रतनसिंगांबद्दलही संशय येऊ लागले. रतनसिंग भारतीय अधिकारी होते. त्यांना आतून तंट्याबद्दल सहानुभूती वाटत असावी. त्यामुळं ते तंट्याविरुद्ध कानाडोळा करत असावेत.

ही गोष्ट रतनसिंगांच्या कानावर आली. ते एक कार्यक्षम पोलीस अधिकारी होते. त्यांच्या सेवेबद्दल वरिष्ठांनी अशी शंका घेतली, ही गोष्ट रतनसिंगांच्या मनाला लागली.

रतनसिंगांनी कालीभीत जंगल आणि मकडाई राजाच्या भागात स्वतः मोहीम सुरू केली. सगळं जंगल पुन्हा पिंजून काढलं. जंगलात एक जागा आढळली. मोठा निवारा बांधलेला होता. अन्नधान्याचा साठा होता.

कोणीतरी इथं येऊन राहात होतं. जागा आडवळणाची होती आणि बरेच दिवस पुरेल एवढा अन्नधान्याचा साठा होता. नक्की तंट्या इथं असावा. त्याचे साथीदार येत असावेत. हा बंदोबस्त मकडाईच्या राजानेच केला होता. हा भाग त्यांच्याच संस्थानात येत होता.

रतनसिंगानी मकडाईच्या पोलीस चौक्यांची चौकशी केली. राजानं जंगलाच्या हद्दीवर चौक्या उभारल्या नव्हत्या. ब्रिटिश वरिष्ठांना मात्र खोटच कळविलं होतं.

रतनसिंगानं वरिष्ठांना हा अहवाल सादर केला.

चीफ कमिशनरांनी मकडाई संस्थानात ब्रिटिश पोलीस नेमण्याचे आदेश दिले. जंगलाभोवती नव्याने चौक्या उभारल्या.

मकडाईच्या राजाला शेवटचा निर्वाणीचा इशारा दिला.

मूळ प्रश्न मात्र सुटत नव्हता. तंट्याचा ठावठिकाणा सापडत नव्हता. पोलिसांच्या नव्या नव्या मोहिमातून हाती काही येत नव्हतं.

## कर्नल वॉर्डची तंट्याविरुद्ध कारवाई

कर्नल वॉर्ड यांची नर्मदा विभागात नव्यानं नेमणूक झाली. 'स्पेशल कमिशनर तंट्या ऑपरेशन' हे नवं पद निर्माण करण्यात आलं. खांडवा त्यांचं मुख्यालय होतं. खांडवा, बेतूल, होशंगाबाद जिल्ह्यांचा यात समावेश होता.

कर्नल वॉर्ड खांडवा येथे हजर झाले.

जिल्ह्याचा मुख्य अधिकारी डेप्युटी कमिशनर होते. त्यांच्यासह पोलीस यंत्रणेच्या प्रमुख पोलीस अधीक्षकांची बैठक बोलावली.

तंट्याविरुद्धच्या कारवाईत पोलिसांना यश येत नाही. ही गोष्ट नामुष्कीची आहे. तंट्याबद्दल आपणास दोन गोष्टी करावयाच्या आहेत. त्याच्या हालचाली कमी झाल्या पाहिजेत. असं झालं तरच जनता पोलिसांना सहकार्य करील. दुसरी मोहीम म्हणजे तंट्याची पूर्ण कोंडी करायची. त्याशिवाय तो हाती येणार नाही. कर्नल वॉर्डनं सर्वांसमोर विचार मांडले.

तंट्याची दमछाक करावयाची. त्याशिवाय या मोहिमेत यश मिळणार नाही; हे कर्नल वॉर्ड चांगले ओळखून होते. त्यांनी योजना सर्वांपुढे ठेवली.

नर्मदा व्हॅलीत आदिवासींची मोठी वस्ती आहे. हे सगळेजण तंट्याच्या चढायांनी धीट झाले आहेत. त्याला सर्व प्रकारची मदत करतात. त्यांच्यात धीटपणा वाढला आहे. अशावेळी या आदिवासींवर कडक बंधनं लादली पाहिजेत. त्यांच्या

विरुद्ध छोटे मोठे गुन्हे नोंदविले पाहिजे. दंड केला पाहिजे. पोलीस चौक्यावर डांबून ठेवलं पाहिजे. बळाचा वापर केला तरी चालेल. असं केल्यास त्यांच्या मनात पोलिसांबद्दल भीती निर्माण होईल.

गावात पाड्यात भिल्ल, बंजारा, कोरकू राहतात. इतर आदिवासी आहेत. सूर्य मावळला की अदिवासींनी घराबाहेर पडायचं नाही. रात्रीचं जेवण त्यांनी झोपडीबाहेर उघड्यावर घ्यायचं. एखादा आदिवासी रात्री फिरताना आढळला तर त्याला अटक करायची. हे काम गावच्या पोलीस पाटील आणि पटवाऱ्यानं करायचं. जे पोलीस पाटील-पटवारी कामात कुचराई करतील, त्यांचे पद काढून घेतले जाईल. वर कडक शिक्षा ठोठावली जाईल.

बाहेरगावचा आदिवासी गावात आला तर त्यानं अगोदर पाटलांना भेटलं पाहिजे. नाव-गाव नोंदविलं पाहिजे. मुसाफिराकडं लक्ष ठेवायचं काम कोतवालावर सोपविलं.

वरील बाबींची तात्काळ अंमलबजावणी करायची.

कर्नल वॉर्डनं मुलकी आणि पोलीस अधिकाऱ्यांसमोर ही योजना ठेवली.

डेप्युटी कमिशनर-पोलीस अधीक्षक आपापल्या जिल्ह्यात परतले. कर्नल वॉर्डच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही सुरू झाली.

कर्नल वॉर्डनी चीफ कमिशनरांना विनंती केली. मध्यप्रांत आणि वऱ्हाडमधील अधिक पोलिसांचे बल इकडे पाठवावे. त्यात घोडदलही असावे. सर्व जिल्ह्यातून पोलिसांच्या तुकड्या रवाना झाल्या. खांडवा, बेतूल, होशंगाबाद जिल्ह्यात तैनात झाल्या.

ह्या तिन्ही जिल्ह्यात प्रत्येक गावात तंबू उभारला. हा तंबू म्हणजे पोलिसचौकी होती. बाहेरून आलेल्या पोलिसांना या चौकीवर नेमलं. या पोलिसांची खाण्या-पिण्याची व्यवस्था स्थानिक पोलिसांवर सोपविली.

देशी इन्स्पेक्टरच्या कामाबद्दल वॉर्ड समाधानी नव्हते. हे अधिकारी कर्तव्यात कसूर करतात, असा त्यांचा संशय होता. वॉर्डनी चीप कमिशनरांना पुन्हा विनंती केली. काही दिवसांसाठी ब्रिटिश इन्स्पेक्टरांची या भागात नेमणूक करावी. असं केल्यास, मोहीम तीव्र करता येईल.

मुंबईहून ब्रिटिश इन्स्पेक्टर खांडवा येथे हजर झाले. त्यांच्या निगराणीखाली मोठी मोहीम सुरू झाली. दोनशे मैलाचा जंगल टापूत शोध सुरू झाला. कालीभीत जंगल पुन्हा तपासलं.

तंट्याचा माग सापडत नव्हता. आणि त्याच्या कारवायाही थांबत नव्हत्या. मालगुजार-सावकाराला तंट्या लुटत होता. असहाय पोलीस यंत्रणा त्या गावच्या

पोलीस पाटलांविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करीत होती. मूळ प्रश्न तसाच राहत होता. तंट्या सापडत नव्हता.

आणि तंट्याचा प्रतिहल्ला सुरूच होता.

कर्नल वॉर्ड नवीन नवीन योजना आखीत होते. पण त्यांना थोडंही यश मिळत नव्हतं.

कर्नल वॉर्डनी चीफ कमिशनरांना आणखी एक प्रस्ताव पाठविला. तंट्या गावात येतो. सावकार-मालगुजारांकडून दंड वसूल करतो. हा दंड पैशाच्या स्वरूपात असायचा. कधीकधी धान्य आणि वस्तूत असायचा. बरेच सावकार-मालगुजार आता स्वत: होऊन पुढं येत होते. तंट्याला मदत करीत होते. मदत करणाऱ्याला तंट्या काही त्रास देत नव्हता. अशांची संख्या वाढत चालली होती.

तंट्या येऊन गेला ही खबर पोलिसांना दिली नाही, अशा गावावर सामूहिक दंड आकारावा. दंडाची रक्कम वसूल करावी. त्यातून त्या गावात अधिक पोलीस दलाची नेमणूक करावी. या पोलिसांच्या पगाराचा व जेवण-राहण्याचा खर्च त्या गावावर लादावा.

कर्नल वॉर्डनं असा प्रस्ताव पाठविला. भुईफळ आणि निमखेडी या दोन गावांना सामूहिक दंड लावावा, अशी शिफारस केली. असं केलं तरच इतर गावात धाक निर्माण होईल.

चीफ कमिशनरांनी ही योजना ताबडतोब मंजूर केली. तंट्याला मदत केली म्हणून दोन्ही गावावर सामूहिक दंड लावला. ही बाब गावोगाव दवंडी देऊन कळविली.

कर्नल वॉर्डनं भुईफळ गावावर दंड बसविला. तंट्याला बातमी कळली. नवे साहेब तयारीत आहेत. नवीन नवीन गोष्टी करत आहेत. त्यांना चुणूक दाखवली पाहिजे.

तंट्यानं साथीदारांशी चर्चा केली.

पश्चिमेला बिजासन गड ते पूर्वेला कालीभीत जंगलापर्यंत त्याचा वावर होता. उत्तरेला नर्मदा आणि दक्षिणेला तापी नदी ही हद्द होती. पूर्व पश्चिम दोनशे मैल आणि दक्षिण-उत्तर शंभर मैलांचा हा पट्टा होता. चार-पाच जिल्ह्यांचा यात समावेश होता.

एका रात्री एका वेळेस वेगवेगळ्या गावी धाडी पडल्या. मालगुजार अथवा

सावकाराचीच घरं लुटली होती. दुसऱ्या दिवशी जवळच्या पोलीस स्टेशनला खबर पोहोचत होती.

कर्नल वॉर्डनं या गावांचा आढावा घेतला. ही सगळी गावं दूरदूर होती. चार जिल्ह्यात विखुरलेली होती. हल्ल्याची वेळ आणि पद्धत मात्र एक सारखी होती. यापूर्वीही असं घडलेलं होतं.

हे काम तंट्याचंच होतं. कर्नल वॉर्डची खात्री झाली. ज्या गावी हल्ला झाला ते मात्र काही सांगायला तयार नव्हते. पोलीस विचारायचे, दरोडेखोर कोण होते?

लुटले गेलेले एकच सांगायचे, ''आम्ही त्यांना ओळखत नाही. तंट्या मात्र नक्कीच नव्हता.''

ह्या उत्तरानं पोलीस चक्रावून गेले होते. कर्नल वॉर्डनी चीफ कमिशनरांना पुन्हा पत्र लिहिलं. विनंती केली. हा सगळा नर्मदा-तापीतला तंट्याचा भाग आहे. ह्या सगळ्या भागावर पोलीस कायदा कलम १५ खाली सामूहिक दंड लावावा. तसेच अशांत भाग म्हणून घोषित करावा. या भागात विशेष सैन्य तैनात केल्याशिवाय तंट्याच्या हालचाली थांबणार नाहीत.

चीफ कमिशनरांनी कर्नल वॉर्डची सूचना स्वीकारली नाही. असं करणं कायद्यात बसत नाही. अशानं जनमत आपल्या विरुद्ध जाईल. अगोदरच सगळी माणसं तंट्याला मदत करतात. आपण सामूहिक दंड आकारला, तर जी माणसं तंट्याला मदत करत नाहीत, त्यांच्यावर अन्याय केल्यासारखा होईल.

तंट्याचा भाग लहान नव्हता. दोन हजार चौरस मैलांचा हा टापू होता. दोन-तीनशे गावं या भागात होती. भिल्ल-कोरकू इतर आदिवासींचे शेकडो निवारे यात होते. या भागात तंट्याचा वावर होता. त्याचे साथीदार सगळीकडं विखुरलेले होते. त्याला गावोगावातली माणसं मदत करत होती. ही मदत अन्न-धान्याच्या स्वरूपात असे. गावाच्या शिवारात राहण्यासाठी मदत करीत होते. इतकेच काय, पोलिसांच्या हालचाली कळवीत होते.

हे सगळं खरं होतं; परंतु विशेष गावानं तंट्याला मदत केली. त्याला आसरा दिला. हे पुराव्यानिशी सांगायला कोणी पुढं येत नव्हतं. पुरावा नसल्यानं त्या गावाविरुद्ध कार्यवाही करता येत नव्हती.

चीफ कमिशनरांनी कर्नल वॉर्डला स्पष्ट कळविले. तंट्याविरुद्ध पोलिसांना ठोस पुरावा मिळत नाही, तोपर्यंत सामूहिक दंडाची कार्यवाही करणं बरोबर नाही.

तंट्याच्या भागात इतर माणसं आहेत. ते तंट्याला मदत करीत नाहीत. काही श्रीमंत जमीनदार पोलिसांना साथ देतात. शेती व्यवसाय नसलेली इतर जनता आहे. आपण सगळ्यांवर दंड लावला, तर ह्या वर्गांवर अन्याय केल्यासारखं होईल. आज

ते तंट्याला मदत करीत नाहीत. उद्या मात्र त्यांना आपल्यापेक्षा तंट्या जवळचा वाटू लागेल.

तंट्याला मदत करणाऱ्या माणसांचा शोध घ्या. तो पुरावा मिळवा आणि त्याविरुद्ध कडक दंडात्मक कार्यवाही करा. पोलीस यंत्रणा कार्यक्षम झाल्याशिवाय ह्या कामात प्रगती होणार नाही.

मधल्या काळात कर्नल वॉर्डला भोपाळहून बोलावणं आलं. गव्हर्नर जनरलचे कार्यालय भोपाळला होते. गव्हर्नर जनरलचे विशेष प्रतिनिधी सर लेपेल ग्रिफीन नावाचे अधिकारी होते.

कर्नल वॉर्ड भोपाळला आले. गव्हर्नर जनरलच्या प्रतिनिधींची भेट घेतली. सर ग्रिफीन यांनी सांगितलं; गव्हर्नर जनरलांनी तंट्या विरुद्धच्या कारवाईत लक्ष घालावयाचं ठरविलं आहे. गेली काही वर्षं तंट्यामुळं ब्रिटिश प्रशासनासमोर नामुष्कीची वेळ आली आहे. मध्य प्रांत आणि वऱ्हाडच्या पोलिसांना यश मिळत नाही. या भागात परिस्थिती आणखी बिघडत गेली आहे. ही गोष्ट मानहानीकारक आहे. यापुढं तंट्या विरुद्धची मोहिमेची सूत्रं मी हाती घेत आहे.

सर लेपेल ग्रिफीन नामांकित ब्रिटिश मुत्सद्दी होते. त्यांनी असा निर्णय घेतला, त्यावेळी वरिष्ठ अधिकारी हजर होते.

सर ग्रिफीन यांनी एक योजनाच तयार केली होती.

'तंट्या पोलीस' नावाच्या स्वतंत्र सैन्यदलाची स्थापना केली. रिसालदार मेजर ईश्वरी प्रसाद यांना प्रमुख नेमलं. सैन्यदलात मध्य भारत सरकारच्या खास बटालियनमधील पंधरा सैनिक, होळकर दरबाराच्या पायदळाचे साठ जवान, घोडदळाचे तेरा सवार आणि इंदोर दरबाराच्या राखीव घोडदळातील सात अधिकाऱ्यांनी नेमणूक केली.

कर्नल वॉर्ड खांडव्याला परत आले. त्यांच्या बदलीचे आदेश मागाहून आले. भोपाळच्या बेगमाचे मंत्री म्हणून त्यांना नेमले गेले.

सर लेपेल ग्रिफीन साहेबांनी आदेश काढला. रिसालदार मेजर ईश्वरी प्रसादांनी नवी जबाबदारी स्वीकारली. सैन्याची जमवाजमव केली. खांडव्याला आले. खांडव्याच्या पोलीस अधीक्षकांची भेट घेतली.

मेजर ईश्वरी प्रसादांची नेमणूक गव्हर्नर जनरलांनी केली होती. वरिष्ठांचा आदेश आहे असे खांडवा पोलीस समजत होते.

ही गोष्ट इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि चीफ कमिशनरांना उशिरा

कळली. मध्य प्रांताच्या पोलिसांच्या मदतीने ईश्वरी प्रसाद काम करतील, अशी नागपूर कार्यालयाची कल्पना होती. परंतु ईश्वरी प्रसादांनी नागपूर कार्यालयाला काही न कळविता स्वत: मोहीम सुरू केली. या प्रकारानं खांडव्याचे अधिकारी अचंब्यात पडले. वरिष्ठाकडून त्यांना याबद्दल काही आदेश नव्हते आणि ईश्वरी प्रसादांना सहकार्य न करावे तर, गर्व्हनर जनरलच्या आदेशाविरुद्ध काम केल्यासारखं होणार होतं.

सर ग्रिफीनचा आदेश जणू वरिष्ठांचा हुकूम होता. या विरुद्ध नाराजी व्यक्त करण्याचं कोणी धाडस करत नव्हते.

याचा थोडा परिणाम पोलीस यंत्रणेवर झाला. खांडवा, बेतूल, होशंगाबादचे अधिकारी आतापर्यंत तंट्याविरुद्ध मन लावून प्रयत्न करीत होते. ईश्वरी प्रसादांच्या नेमणुकीनं त्यांच्यात नाराजी आली. पूर्वीच्या कामात शिथिलता आली.

मेजर ईश्वरी प्रसादांनी ब्रिटिश व होळकर हद्दीवर सुरक्षा चौक्या उभारल्या. संशयितांची धरपकड सुरू केली. तंट्या पोलीस या विशेष सैन्य दलानं सगळा मुलूख पिंजून काढला.

तंट्याची खबरबात मिळत नव्हती. मात्र त्याचे छुपे हल्ले थांबले नव्हते.

# भारतीय राजे-संस्थानिक तंट्याला मदत करतात, ब्रिटिशांचा आरोप

भारतीय मांडलिक राजे आणि संस्थानिकांची निष्ठा दुहेरी आहे असा ब्रिटिश अधिकाऱ्यांचा आरोप होता. होळकर, शिंदे हे राजे होते. घाटाखेडी, मकडाई, अचलपूरसारखे संस्थानिक कडक कारवाई करत नाहीत. ब्रिटिश पोलिसांना तंट्याविरुद्ध मदत करत नाहीत. उलट तंट्याला लपण्यासाठी छुपे संरक्षण देत आहेत, -असे आरोप होत होते.

या संदर्भात पोलीस अधिकाऱ्यांनी चीफ कमिशनरांना वारंवार कळविलं होतं. तंट्या ब्रिटिश मुलुखात राजरोस हल्ला करतो आणि होळकर हद्दीत पसार होतो. होळकरांचे पोलीस काहीच सहकार्य करत नाहीत.

चीफ कमिशनरांनी होळकरांविरुद्ध गव्हर्नर जनरलांना याबद्दल कळविलं. होळकरांचं सहकार्य मिळालं तर तंट्याविरुद्धची मोहीम यशस्वी होऊ शकेल.

सर लेपेल ग्रिफीन यांनी यात लक्ष घातलं. होळकर सरकारला आदेश दिला.

होळकर दरबारानं कॅप्टन मोहम्मद खान या अधिकाऱ्यास तंट्याविरुद्ध कार्यवाहीचं प्रमुख नेमलं. कॅप्टन खान यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांना मदत करावी, अशी अपेक्षा होती.

कॅप्टन मोहम्मद खान यांनी मोहिमेची सूत्रे हाती घेतली. खरगोन-खांडवा जिल्हा होळकर आणि ब्रिटिश सरहद्द होती. या सरहद्दीवर पोलिसांची गस्त वाढविली. जागोजागी टेहळणी चौक्या उभारल्या. तंट्याची हालचाल कळावी म्हणून खाजगी गुप्तहेरांच्या नेमणुका केल्या. गुप्तहेरांत भिल्ल कोरकूंची नियुक्ती केली. त्यात काही तंट्याचे नातेवाईकही होते.

आतापर्यंत तंट्याविरुद्धच्या मोहिमेची सूत्रे ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हाती होती. त्यामुळं कामात एकसूत्रता होती. याचा थोडा परिणामही दिसून येत होता.

सर लेपेल ग्रिफीन यांनी स्वतंत्र 'तंट्या फौज' स्थापन केली. मोहिमेची सूत्रे स्वत:कडे घेतली. हे करताना ग्रिफीन यांनी कमिशनरांना नागपूरला कळविलं नाही. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसांना विश्वासात घेतलं नाही.

मेजर ईश्वरी प्रसादानं सरळ मोहीम सुरू केली. यामुळं खांडवा-होशंगाबाद आणि बेतूलचे ब्रिटिश अधिकारी गोंधळले. गव्हर्नर जनरलचे प्रतिनिधी तंट्याविरुद्ध काम करू लागले. सरहद्दीवर होळकरांचे कॅप्टन मोहम्मद खान तयारीत होते. आणि मूळ मोहीम चालविणाऱ्या ब्रिटिश पोलिसांना मात्र या सर्व मोहिमेची नीट कल्पना नव्हती.

ह्या तीन यंत्रणा काम करीत होत्या. तिन्ही यंत्रणांत परस्परात सुसंवाद नव्हता. सहकार्याच्या भावनेचा लवलेशही नव्हता. आपसात नाराजी होती. ह्या बाबी धूर्त तंट्याला कळल्या होत्या. त्याचा फायदा उठविण्याचं त्यानं ठरविलं.

## तंट्या-यशोदा संबंधाची गोष्ट

पोखरचे शिवबा पाटील पोलीस पाटील होते. त्यांनी तंट्याच्या वडिलांची जमीन बळकावली होती. पाटलांनी तंट्याच्या आजोबाला कर्ज दिलं होतं. ते कर्ज त्याचे आजोबा फेडू शकले नाही. जमीन गहाण पडली. पुढं व्याज वाढत गेलं.

तंट्या आजोबाचं कर्ज फेडतो म्हणाला होता. कर्जाच्या बदल्यात पाटलांकडं राबण्याची त्याची तयारी होती. आपल्या पूर्वजांचं कर्ज फेडावं. कर्जातून मुक्त झालो की जमीन परत मिळेल, अशी त्याची भाबडी आशा होती.

पाटील जमीन परत देत नाहीत. ती जमीन त्यांनी बळकावली. खोटी कागदपत्रे केली. त्या जमिनीवर आपली मालकी उरली नाही, हे तंट्याला कळलं. ह्यामुळं तो चिडला. फसवलो गेल्याचं त्याला दु:ख झालं.

तंट्या नवगजाबाबाच्या मजारीजवळ राहत होता. यशोदा भाकरी कुटका देत होती. या निमित्तानं त्यांची भेट होत होती.

या भेटींचा पराचा कावळा केला गेला.

वास्तविक, सव्वाशे वर्षांपूर्वीची ही घटना आहे. बालविधवेला बंधनं होती. सगळ्यांचा दु:स्वास सहन करावा लागत होता. कुटुंबातले सगळे लक्ष ठेवून असत. तिच्या वागण्या-बोलण्याकडं सगळ्यांचं लक्ष असे.

अशा परिस्थितीत ती तंट्याला जमेल ती मदत करत होती. या मागं तिची हिंमत होती. तंट्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल कणव होती. यशोदा बंडखोर होती.

बंडखोरपणात संयम होता, अशा वागण्यामुळं गावातली तरुण पोरं तिला वचकून होती.

याउलट तंट्या एक भिल्ल. गुन्हेगार जातीचा प्रतिनिधी होता. दोन-तीनदा त्याला शिक्षा झाली होती. तुरुंगात जाऊन आला होता. अशा खालच्या जातीच्या गुन्हेगाराशी पाटलाची मुलगी संबंध ठेवते, त्याच्याशी बोलते, तिचा बाप ज्याच्या विरुद्ध आहे या पोराला भाकरी-कुटका देते, ही गोष्ट त्याकाळच्या ग्रामजीवनाला पटत नव्हती. ते तंट्या-यशोदेचा संबंध पाप समजत होते.

तंट्या पोखरला आला, त्यावेळी तीस वर्षांचा होता. यशोदा बावीस-तेवीस वर्षांची होती. यावेळी तंट्याचं लग्न झालेलं होतं. त्याची बायको भिकी पोखरचीच होती. त्यांची लहानपणाची ओळख होती. भिकीचा बाप पोखरचा होता.

भिकी यशोदा एकत्र खेळल्या होत्या. तंट्या बालपणीच्या मैत्रिणीचा नवरा होता. हे सगळं यशोदाला माहीत होतं. त्याच्यावर सगळे अन्याय करीत आहेत. त्याला फसवीत आहेत, हे हुशार यशोदेच्या लक्षात आलं. तिला तंट्याबद्दल सहानुभूती वाटू लागली.

यशोदा तरुण विधवा होती. तंट्याच्या बंडखोर बहादुरीबद्दल तिला आकर्षण वाटू लागलं असेल. तिचं आकर्षण फक्त शारीरिक नव्हतं.

तंट्या भिल्ल जमातीचा होता. भिल्ल स्त्री-पुरुष संबंधाबाबत फार संवेदनशील असतात. भिल्ल साधे असतात. त्यांचा स्वभाव सरळ असतो. ते दुसऱ्यावर चटकन विश्वास टाकतात. मात्र ते नवरा-बायकोच्या संबंधाबाबत हळवे आणि संशयी असतात. त्यांना एखाद्याबद्दल संशय आला, काही दिसलं तर खूनखराबी करून टाकतात.

त्यांच्या स्वातंत्र्याच्या कल्पना स्पष्ट होत्या. एखाद्या स्त्रीला वाटलं, नवऱ्याला सोडून द्यायचं. दोघांच्या संमतीनं ते वेगळे होऊ शकत होते. नवरा बायकोच्या लैंगिक संबंधाशिवाय इतरांचे संबंध भिल्लात खपवून घेतले जात नव्हते.

अशावेळी तंट्या-यशोदा संबंधाचा शोध कसा लावायचा?

एक गोष्ट इथं स्पष्ट होते.

यशोदा धाडसी होती. गावरहाटीच्या विरोधाला तिनं जुमानलं नाही. तिची तंट्याबद्दलची सहानुभूती वाढत गेली.

तंट्या निमाडमध्ये गाजू लागला.

यशोदेनं त्याला अडचणीच्या काळात मदत केली होती. स्वत: मानहानी सहन केली होती, हे तंट्या जाणून होता. तंट्या यशोदा आणि तिच्या कुटुंबियांना मदत करू लागला. ही मदत आर्थिक स्वरूपाची होती. मानसिक आधाराची सुद्धा होती.

तंट्या-यशोदा संबंधाची ब्रिटिश अधिकाऱ्यांना माहिती होती. तंट्या यशोदाच्या कुटुंबाला मदत करीत होता हे सगळे जाणून होते. तंट्या अधून मधून पोखर गावी येत होता. गावात नवगजाबाबाची मजार होती. बाबावर त्याची श्रद्धा होती. त्यांचा आशीर्वाद होता, असं तो मानत होता. त्यांच्या दर्शनासाठी तो येत होता. पोखरला येण्याचं दुसरं कारण यशोदा होती. तिची आणि तिच्या कुटुंबियांची काळजी तो घेत होता.

आपल्यामुळं यशोदा आणि तिच्या वडिलाला त्रास झाला. गावकऱ्यांनी जातीबाहेर टाकलं. भाऊबंदांनी नावे ठेवलीत याला आपणच जबाबदार आहोत, ही बोचणी त्याला वाटत होती. गावगुंडांपासून यशोदा आणि तिच्या कुटुंबाला संरक्षण देणं त्याला कर्तव्य वाटत होतं. ह्या भावनेतून तो सर्व प्रकारची मदत करीत होता.

तंट्या पोखरला येत असतो, ही माहिती पोलीस पाटील पोलिसांना कळवीत नव्हतें, हे पोलिसांना माहीत होतं. या कारणांनी पोखर गावात एक विशेष पोलीस चौकी उभारली होती. हत्यारधारी शिपाई नेमले. त्यांच्या मदतीला ग्रामरक्षक पथकाचे तरुण होते. पटवाऱ्यास कडक सूचना दिल्या होत्या.

ही खबर तंट्याला कळली होती.

हॅमिल्टनसाहेब नाकेबंदी करू पाहत होते. त्यांना काही राजपूत-मराठी तरुणांची साथ मिळत होती.

मालेगावला गोविंद तेली होता. तो आणि त्याचा भाऊ पोलिसांचा खबऱ्या होत्या. गावचा मालगुजार मात्र तंट्याचा मित्र होता. मालगुजारानं गोविंदची गद्दारी तंट्याला कळविली होती. गोविंद बापूराम कॉन्स्टेबलशी संबंध ठेवून होता.

ह्या सरकारी खबऱ्यास धडा शिकवला पाहिजे. तंट्यानं निश्चय केला. ते उन्हाळ्याचे दिवस होते. शेतातली कामं संपत आली होती. शेतकरी-शेतमजूर मोकळे होते.

२७ एप्रिल १८८५ ची सायंकाळची वेळ होती. मालेगावात मोकळेपणाचं वातावरण होतं. गुरंढोरं गावात परतत होती. काही माणसं मंदिरांच्या ओट्यावर बसली होती. गाव अंधारात बुडू लागलं होतं.

खरगावच्या दिशेनं हत्यारबंद तुकडी गावात शिरली. ते चौदाजण होते. तुकडीतला एकजण ओरडून म्हणाला, ''तंट्या आला आहे, गावातल्या गद्दाराला धडा शिकवायचा आहे.''

मालेगावात बातमी पसरली. तंट्या आला आहे.

गावचे मालगुजार चटकन पुढं आले. त्याच्या बरोबर त्याचा मुलगा होता. मुलाच्या हातात कंदिल होता.

''कुठं रहातु गोविंद सावकार?'' तंट्यानं मालगुजारास विचारलं, ''गरिबाले लई गांजायला आन् सरकारी कुत्र्यांना खबर द्यायलाय.''

मालगुजार पुढं चालू लागला.

गोविंद तेल्याच्या घरासमोर टोळी थांबली. बैठकीत बापूराम कॉन्स्टेबल बसला होता. बापूरामनं तंट्याला पाहिलं. भीतीनं तो उठला. लपण्यासाठी आत जाऊ लागला.

एकानं बंदुकीचा चाप ओढला. बापूराम जागीच कोसळला. गोविंद तेली आणि त्याच्या भावाला घराबाहेर काढलं. चांगला चोप दिला. पोलिसांना कळविलं तर बापूरामसारखी गत होईल असा दम दिला. त्याच्याकडून पाचशे रुपयांचा दंड वसूल केला आणि तंट्या जायला निघाला.

तंट्या आलाय, ही खबर गावात पसरली होती. त्याला पहायला, भेटायला माणसं जमा झाली होती. तंट्या एका दगडावर उभा राहिला आणि बोलू लागला,

''म्या तंट्या हाय, गोईंद तेली आन् त्येचा भाऊ लछमन गुजर मालगुजास्नी मान देत नाय. त्यें हलक्या जातीचे हायेत. तरी बी त्ये लछमन मालगुजास्नी मान देत नाय. त्येंच आयकत नाय. त्येंनी वागन्यांत सुदारना करावी. नाय तर बापूराम सारकी त्येंची गत झाल्याबिगर राहनार नाय.''

तंट्यानं बोलणं थांबविलं.

मालगुजारांनी तंट्याला आणि त्याच्या साथीदारांना तंबाखू दिली. तंट्यानं रामराम करून मालगुजाराचा निरोप घेतला.

टोळी गावापासून दूर गेली.

गावच्या पाटलांनी पोलीस ठाण्यावर खबर उशिरा कळविली. पोलीस आले. लछमन मालगुजारांनी तंट्याला मदत केली होती हा गुन्हा होता. लछमन गुजरला अटक केली. खांडव्याला घेऊन आले.

तंट्यानं कार्यवाही चालूच ठेवली होती.

बापूराम पोलीस मारला गेला होता. तंट्याविरुद्धच्या कार्यवाहीत तो कामी आला होता. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसांनी बापूच्या विधवेला ताबडतोब पेन्शन मंजूर केली. मागं तंट्यानं बापू मांग ह्या कॉन्स्टेबलचं नाक कापलं होतं. त्या बापूला प्रथम श्रेणीचा हेड कॉन्स्टेबल म्हणून बढती दिली. शंभर रुपयाचे बक्षीसही दिले.

हॅमिल्टनसाहेबांनी पोलिसांना मदत करणाऱ्या मालगुजारांची यादी केली. हे

मालगुजार विश्वासू होते. त्यांच्या ऑनररी इन्स्पेक्टर म्हणून पुन्हा नेमणुका केल्या. एकशे दहा बंदुका मोफत वाटल्या.

बक्षिसाची रक्कम वाढविली. तंट्याला पकडणारास ही रोख रक्कम मिळणार होती. शिवाय नंदगाव व चारखेडा गावातल्या पंचवीसशे एकराची मालगुजारी जाहीर केली. पोलीस नवीन नवीन आमिषं पुढं करीत होते. तंट्या मात्र सापडत नव्हता.

पावसाळा सुरू झाला होता. डोंगराळ भागातल्या पाऊलवाटा होत्या. नद्या ओढे पुराच्या पाण्यानं भरून वाहू लागले. पोलिसांच्या हालचाली मंदावल्या होत्या.

सातपुड्यात जंगल घनदाट होतं. डोंगरात काही गुहा होत्या. पावसाळ्यात तंट्या या गुहेत विश्रांती घेत असतो, हे पोलिसांना माहीत होतं. पावसात जंगलात पाय ठेवण्याची हिंमत पोलिसांना नव्हती. पाऊस उघडेपर्यंत वाट पाहणं एवढाच त्यांच्या समोर मार्ग होता.

तंट्या जंगलात एका ठिकाणी फार दिवस राहत नव्हता. त्याच्या लपण्याच्या जागा सारख्या बदलायच्या.

मधल्या काळात पावसाचा थोडा जोर कमी झाला.

पोलिसांच्या खबऱ्यानं माहिती आणली. तंट्या गोंडवनात लपला आहे. खांडवा ते पंचमढीमधील सातपुडा डोंगरास गोंडवन म्हणत. ह्यातच बुऱ्हाणपूर पूर्वेकडचा चारवा जंगलाचा भाग होता. चारवा जंगलात सातपुड्याच्या अनेक टेकड्या होत्या. त्या जंगलानं झाकलेल्या होत्या. त्यातील एक कालीयाबाबाची टेकडी होती. कालीयाबाबाचं पवित्रस्थान टेकडीवर होतं. इथं तंट्या राहत आहे. पोलिसांना खबऱ्यांनी कळविलं होतं.

डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ जनरलांनी अधिक फौज मागविली. खानदेशातून भिल्ल पलटणीतले जवान बोलावले. कालीभीत जंगलाभोवती फौज तैनात केली. टेकडी भोवतीचा वेढा घट्ट केला जाऊ लागला.

भिल्ल पलटणीतले वाटाडे पुढं सरकत होते.

फौज कालियाबाबांच्या टेकडीवर चहूबाजूंनी चढली. कालीबाबाच्या स्थानाशेजारी दगडाआड एक झोपडी होती. फौजेनं झोपडीवर छापा टाकला.

एक म्हातारा झोपडीत बसलेला होता.

पोलिसांनी त्याच्याकडं चौकशी केली. म्हातारा टकमक पोलिसांकडं बघत होता. तो बोलत नव्हता. प्रतिसाद देत नव्हता.

बहिरा आणि मुक्या म्हाताऱ्यास तिथंच सोडून ते परतले. आणखी एक मोहीम फसली होती. तंट्या इथंही सापडला नव्हता.

तंट्या खांडवा जेलमधून पळाला. या घटनेला सहा वर्ष झाली होती. पोलीस तंट्याच्या मागं धावत होते; पण तो सापडत नव्हता. तो जंगलात लपून बसला नव्हता. तो सावकारांना लुटत होता. मालगुजारांकडून खंडणी वसूल करीत होता. पोलिसाचं नाक कापत होता.

या उलट लोकांची त्याला मदत मिळत होती. तंट्या अडचणीतल्या माणसाला मदत करीत होता. गरिबांना मोफत धान्य वाटीत होता.

तंट्या गावात येई. गावातील माणसं त्याचं स्वागत करीत होते. एखाद्या राजासारखा त्याला मान मिळत होता. तो जंगलचा राजाच झाला होता. दोन हजार चौरस किलोमीटर पट्ट्यात त्याचंच राज्य होतं. या भागात त्याचीच हुकमत होती. आणि तोच इथला सार्वभौम होता.

# तंट्याला पकडण्यासाठी मोठं बक्षीस

तंट्या जेलमधून पळाला. त्यावेळी होळकर सरकारनं गॅझेटियरमध्ये हे जाहीर केलं. जो कोणी तंट्याची अथवा त्याच्या साथीदाराची माहिती देईल, त्याला बक्षीस जाहीर केलं. सुरुवातीला बक्षिसाची रक्कम दोनशे रुपयांची होती. असंच बक्षीस ब्रिटिश सरकारनं जाहीर केलं होतं.

पुढं तंट्या सापडेना. त्याच्या चढाया वाढत गेल्या. सहा सहा महिन्यांनी ब्रिटिश सरकार बक्षिसाची रक्कम वाढवू लागले. होळकर सरकारवर दबाव आणू लागले. होळकर सरकारही नाइलाजानं बक्षिसाची रक्कम वाढवीत होते.

बक्षिसाची एकूण रक्कम फुगत गेली. तंट्याचा मागही सापडत नव्हता. त्याच्या चढाया मात्र चौफेर सुरूच होत्या.

मध्य प्रांताचे मुख्य कार्यालय नागपूरला होते. चीफ कमिशनर प्रशासन प्रमुख होते. तंट्याच्या कारवायानं त्यांना चिंता वाटू लागली. एका डाकूनं बलाढ्य सत्तेपुढं आव्हान निर्माण केलं होतं.

ह्यात ब्रिटिशांची नामुष्की होती. तंट्या आता एकटा राहिला नव्हता. त्याची टोळी वाढत होती. नर्मदा विभागातील जनतेची त्याला साथ मिळत होती. हा ब्रिटिशांच्या दृष्टीने धोका होता.

चीफ कमिशनरांनी संकटाची चाहूल ओळखली. त्यांनी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसांना बोलावून घेतलं. तंट्याबद्दलचा जाहीरनामा अद्याप सादर केला नाही. ह्या कामाकडं पोलीस गांभीर्यानं पाहत नाहीत. चीफ कमिशनरांनी तीव्र नापसंती व्यक्त केली.

तंट्या आणि त्याच्या साथीदारांसंबंधी जाहीर प्रगटनाचा मसुदा तयार करण्याचे चीफ कमिशनरांनी आदेश दिले.

२३ नोव्हेंबर १८८५ रोजी पोलिसांकडून जाहीर प्रगटनाचा मसुदा सादर करण्यात आला. त्याच दिवशी चीफ कमिशनरांनी तो मंजूर केला. त्याच्या प्रती छापण्यात आल्या. मध्य प्रांत, बॉम्बे प्रांत, निजाम स्टेट, होळकर इलाखा सर्वत्र तो पाठविला गेला.

प्रत्येक गावात हा जाहीरनामा चावडीवर लावला गेला.

*तंट्या सरकारचा गुन्हेगार आहे. त्याला मदत करणे म्हणजे गुन्हेगारास मदत करणे. हे काम करणारास कडक शिक्षा होईल. या उलट, तंट्याला पकडण्यास पोलिसांना मदत करावी. मदत करणारास मोठ्या रकमेचे बक्षीस होते.*

*तंट्या अगर त्याच्या साथीदारांना पकडताना कोणाकडून खून झाला तरी मायबाप सरकार त्या खुन्यास हे सरकारचेच काम समजून माफ करील.*

सगळीकडं अशी पत्रकं लागली. बाजारात पत्रकं वाटली गेली. होळकर गॅझेटियर आणि ब्रिटिश सरकारच्या गॅझेटियरमध्ये हे सगळं छापून आलं.

पोलीस तंट्या विरुद्ध काम करीत होते. ह्या लढाईत दुर्दैवानं कोणी जखमी झाला अथवा कोणाच्या जीवाला धोका झाला, तर त्या व्यक्तीनं देशासाठी जोखमीचं काम केलं, असंच समजलं जाईल. त्या व्यक्तीच्या कुटुंबियांना तात्काळ पेन्शन मंजूर केली जाईल. त्या कुटुंबाची विशेष काळजी सरकार घेईल, असा फतवा चीफ कमिशनरांनी काढला.

तंट्याला हे सगळं कळलं होतं. त्यावेळी त्याचा मुक्काम होशंगाबाद जिल्ह्यात होता. चीफ कमिशनर साहेबांनी तंट्या विरुद्धच्या जाहीर प्रगटनावर सही केली. ह्या घटनेला एक महिना सतरा दिवस झाले होते. गावोगाव पत्रकं पोहोचली होती.

तो ११ जानेवारी १८८६ चा दिवस होता.

नकवारा आणि जिजगाव शेजारी शेजारी वसलेली गावे होती.

तिन्ही सांजाची वेळ होती. साठजणांची तुकडी नकवारा गावात शिरली. तुकडी प्रमुखानं जाहीर केलं. तो तंट्या आहे.

नकवाराचा मालगुजार मकडाईच्या राजाबद्दल चुगली करीत होता. मकडाईचा राजा तंट्याला मदत करत होता. राजानं जंगलात निवारा उभारला होता. तिथं अन्न-धान्याचा साठा ठेवला होता. तंट्या किंवा त्याचे साथीदार ह्या जंगलात राहात होते. नकवाराच्या मालगुजारास ही गोष्ट कळली होती. त्यानं पोलिसांना ही खबर दिली होती.

हे तंट्याला समजलं होतं. या गद्दार मालगुजाराच्या भेटीस तंट्या आला होता. मालगुजारानं संकट ओळखलं. गयावया करू लागला.

तंट्यानं त्याला शिक्षा केली. ४३१ रुपयांची खंडणी वसूल केली. घरातले दागिने घेतले आणि शेजारच्या जिजगावाकडं वळला. जिजगावाच्या मालगुजारानं २५३८ रुपये दंडापोटी दिले. दोन तलवार, एक बंदूक व एक पिस्तूल दिले.

दोन्ही गावातून खंडणी वसूल करून तंट्या बाहेर पडला. गावातल्या एकाही शेतकऱ्यास तंट्यानं त्रास दिला नाही.

पोलीस तपासासाठी आले. हल्लेखोर मकडाई मुलखातून आले होते. त्याच दिशेनं निघून गेले होते. बाकी गावकरी काही सांगत नव्हते. हल्लेखोर परत जाताना त्यांची एक पिशवी मागं राहिली होती. पोलिसांनी पिशवीचा तपास घेतला. ती मकडाईच्या राजाची होती. पोलिसांचा अनुमान बरोबर होता.

होशंगाबाद जिल्ह्यात तंट्यानं धुमाकूळ सुरू केला. सरकारनं तंट्या विरुद्ध जो जाहीरनामा गावोगाव लावला आणि तंट्यानं चिडून प्रतिहल्लाच सुरू केला.

तंट्यानं बैतूल जिल्ह्यातही प्रवेश केला. चिंचपोकळी पोलीस स्टेशनमध्ये चुनाहजारी गाव होतं. नऊ मैलांचं अंतर होतं. बैतूल होशंगाबाद जिल्ह्याच्या सरहद्दीला लागून होतं.

बावीस जानेवारीचा दिवस होता. नेहमीसारखी सायंकाळची वेळ होती. तंट्या चुनाहजारी गावी आला. गावखोरी शेतावर काही जण काम करीत होते. यापैकी एकाला तंट्याच्या माणसांनी पकडून आणलं.

''रामचंद्र आणि कोहार गवळीचं घर दाखव'' तंट्यानं त्याला दटावलं. त्या माणसानं माहिती दिली. तंट्यानं टोळीतल्या साथीदारांचे दोन गट केले. एक टोळी कोहारच्या घराकडं गेली. त्याच्याकडून नऊशे रुपये आणि दागिने हस्तगत केले.

तंट्या दुसऱ्या टोळीसह रामचंद्र गवळ्याकडं आला. तंट्याचा एक साथीदार रामचंद्राला घराबाहेर ओढू लागला. रामचंद्रची सून आडवी आली. तिच्या अंगावर दागिने होते. दुसरा एक साथीदार ते दागिने घेण्यासाठी पुढं सरकला.

तंट्यानं आपल्या साथीदारास खडसावलं,

''आया-बहिणींच्या अंगाला हात लावायचा नाय नियम ठाव नाय काय तुमाले?'' तो साथीदार जागच्या जागी थिजून उभा राहिला.

रामचंद्रला तंट्यानं शिक्षा केली. त्याच्याकडून दंड वसूल केला. तासभर तंट्या गावात होता. गावात एक हवालदार होता. त्याला बोलावून घेतलं. तंट्यानं बोलावल्यानं तो हवालदार मनातून घाबरला होता.

गाव सोडताना तंट्या हवालदारास म्हणाला, ''तू चल आमच्या बरुबर. नायतर आमी बायेर पडलो की चिंचपोकळी पोलीस ठेसनाची वाट धरशील.''

हवालदारास बरोबर घेऊन टोळी गावाबाहेर पडली. चारदोन नंबर अंतर चालून झालं. तंट्यानं विचार केला. ह्या हवालदारास कशाला उगी शिक्षा? पोटासाठी

नोकरी करतो. आपण गावात आलो. बिचारा पुढं सुद्धा आला नाही.

हवालदारास तंट्या म्हणाला, ''तुज्यासंग आमचा तंटा नाय. तुमी जावा माघारी.'' हवालदारास सोडून देण्यात आलं.

चुना हजारी गावचा हा कोतवाल चिंचपोकळी पोलीस स्टेशनला पोहोचला. रात्री दहा वाजता पोलीस चुना हजारीला पोहोचले. रात्री हल्लेखोरांचा माग काढणं शक्य नव्हतं. दुसऱ्या दिवशी आजूबाजूच्या टेकड्यात, जंगलात पोलिसांनी तपास केला. परंतु नेहमीप्रमाणे पोलिसांच्या हाती काही लागलं नाही.

सरदार रतनसिंह पोलीस अधिक्षक म्हणून होशंगाबादला आले. या पाठोपाठ तंट्याच्या चढायांना जोरही आला. रतनसिंहांना तंट्याचं आव्हानच वाटू लागलं होतं.

चुना हजारी गावच्या घटनेनं रतनसिंह आणखी सतर्क झाले. कालिभीत आणि चारवा जंगलात नव्यानं शोध मोहीम सुरू केली. प्रत्येक गावात चौकशी केली.

रतनसिंहाची हालचाल तंट्याला कळली होती. चारवा जंगलातून त्यानं काढता पाय घेतला. रतनसिंहांनी महिनाभर डोंगर, दऱ्या, जंगलात कसून शोध घेतला. या काळात बुंधी गावचा मालगुजार पोलिसांना मदत करीत होता. तुमला पाटील त्याचं नाव होतं.

तुमला पाटलानं व गावच्या सावकारानं मागं तंट्याला मदत करण्यास नकार दिला होता, हे तंट्याच्या लक्षात होतंच.

आता तर ते गाववाले उघडपणे पोलिसांना मदत करू लागले होते.

ही सगळी खबर तंट्याला मिळाली होती. पोलीस तपासही थंडावला होता. तंट्या पुन्हा कालिभीत जंगलात परतला.

चारवा जंगलात, चारवा पोलीस स्टेशन होतं. तिथं राखीव पोलिसांची मोठी तुकडी होती. येथून अठरा मैलांवर बुंधी गाव होतं.

२७ मार्चला दिवस सरत आला होता. सुगीचे दिवस होते. माणसं रानात कामात गुंतलेली होती. अशावेळी एक सशस्त्र तुकडी गावात आली.

मालगुजार तुमला पाटलाचं घर विचारलं. घरासमोर तंट्याला बघून पाटील गयावया करू लागले. जे हवं ते देतो म्हणाले.

''पाटील, या अगुदर तुमी काई द्यायला नाय म्हणत व्हता. पोलिसाले कळवीत व्हता. काई द्यायची विच्छा नाय तर गपतर बसायचं व्हतं. आता नकु मले काई.'' तंट्या म्हणाला.

तंट्याच्या साथीदारांनी पाटलांच्या घरातलं सगळं धान्य बाहेर काढलं.

गावात पाटलांच्या नात्यातली आणखी घरं होती. त्यांची नावं तंट्यानं अगोदर मिळवली होती. पाटलाचं रिकामं घर पेटवून दिलं. त्यानंतर नातेवाईकांच्या घरांना आगी लावल्या. एकूण सत्तावीस घरं पेटवून दिली.

आतापर्यंत तंट्यानं मालगुजारांना लुटलं होतं. सावकारांना दंड केला होता. परंतु एका ठिकाणी सत्तावीस घरं पेटवून दिल्याची घटना पहिलीच होती.

तंट्या चिडला होता. पोलिसांना मदत करणाऱ्यांना धडा शिकवला पाहिजे, ह्या भावनेतून त्यानं मालगुजार आणि त्यांच्या नातेवाईकांची घरं जाळली होती. एका गावात इतकी घरं जाळण्याची ही पहिली घटना होती.

सरदार रतनसिंह या घटनेनं काळजीत पडले. दुसऱ्या दिवशी स्वत: बुंधी गावी आले. ज्यांची घरं जळाली, त्यांच्याशी बोलले. गावातल्या इतरांशी चर्चा केली. झाल्या घटनेबद्दल हळहळ व्यक्त करणे एवढंच झालं.

हताशपणे विशेष कमिशनरांनी वरिष्ठांना कळविलं. तंट्याला कालिभीत जंगलातून बाहेर हाकललं पाहिजे. त्याशिवाय त्याचा बंदोबस्त होऊ शकणार नाही. प्रत्येक गावात नव्यानं पोलिसगार्ड तैनात करावेत. या भागातील गवळी, बंजारा, कोरकू, भिल्ल वगैरे आदिवासींची नाकेबंदी केली पाहिजे. कारण ही सगळी जमात तंट्याच्या पाठीशी उभी आहे.

चीफ कमिशनरांनी विशेष कमिशनरांच्या पत्राची तात्काळ दखल घेतली. आदेश काढले. कालिभीत जंगलाभोवतीच्या प्रत्येक पोलीस स्टेशनला वाढीव आठ ते बारा हत्यारबंद पोलिसांची तुकडी दिली.

ह्या नव्या योजनेची माहिती तंट्याला झाली होती. साहेबांनी नवी व्यवस्था वाढवली. काही काळ तंट्यानं शांत राहायचं ठरविलं. त्याच्या कारवाया थांबल्या.

होशंगाबादचे पोलीस अधीक्षक सरदार रतनसिंह आणि बैतूलचे हानकिन काही दिवसांच्या रजेवर गेले. दोन जिल्ह्याचे पोलीस प्रमुख मुख्यालयात नाहीत, ही तंट्याला माहिती पोहोचली होती.

तंट्यानं दोन्ही जिल्ह्यातली व दूरदूरची गावं निवडली. सुरुवात राजाभोरारी जंगला काठच्या देवराबंदी गावापासून केली.

अकरा एप्रिलला देवराबंदी गावावर हमला केला. दुसऱ्या दिवशी कालिभीत जंगलाभोवतालच्या गावातून खबर येऊ लागली. तंट्यानं गावावर हमला केला आहे. पोलीस स्टेशनला खबर पोहोचताच पोलिसांची धावपळ सुरू झाली.

सरदार रतनसिंह आणि हानकिन रजेवर आहेत, ह्या काळाचा तंट्यानं अचूक फायदा घेतला होता.

सगळीकडं गोंधळ निर्माण झाला. सरदार रतनसिंह व हानकिन रजा रद्द करून परतले. घटनास्थळी हजर झाले. निरोप आलेल्या ठिकाणी पोलिस पोहोचत होते. तेथे पोहोचले की लक्षात आलं, ती अफवा होती. तंट्याच्या लोकांनी पोलीस यंत्रणेला दमवलं होतं.

## तंट्याचं सोंग

तापीकाठी उसकली गाव होतं. या गावाच्या शिवारात तंट्याचा मुक्काम होता. अंधार पडला. गावात हनुमान मंदिर होतं. मंदिरासमोर टेंभे पेटले होते. बँड पथकाचा आवाज ऐकू येऊ लागला.

तापी काठी तंट्या व साथीदार बसले होते. बाजूनं गावाकडं पाऊलवाट जात होती. एक माणूस वाटेनं गावाकडं चालला होता. तंट्यानं त्या माणसाला हाटकलं.

''कशाचा उजेड हाय आन् आवाज बी येतु या?''

''माली पाटलाच्या पोराचं लगीन झालं काल. आज वरात हाय.'' माणसानं माहिती दिली.

तंट्यानं सोबत्या बरोबर जेवण उरकलं. दोघांना बरोबर घेतलं. गावाकडं चालू लागला. तंट्या गावात पोहोचला. यावेळी वरात मधल्या चौकापर्यंत आली होती.

बैलगाडी सजवलेली होती. नवरा-नवरी नव्या कपड्यात बसले होते. समोर बँड पथक तल्लीन होऊन वाजवीत होते. टेंभ्याचा फिक्कट प्रकाशात माणसं बघत होती. मालीपाटील बाजूच्या ओट्यावर बसले होते. त्यांच्या शेजारी पोलीस पाटील होते. पटवारी होते.

चौकात रायरंदा नाचत होता. कमट्यांचा घोडा होता. घोड्यावर बसलेला माणूस बँड पथकाच्या ठेक्यावर नाचत होता. मधल्या मोकळ्या जागेत घोड्यानं दोनतीन चकरा मारल्या. बँडचा आवाज थांबला तसा घोडा काळोखात बाजूच्या गल्लीत निघून गेला.

अंधारात माणसांचा आरडा-ओरड ऐकू येऊ लागला.

''साला, अब आया हाथ में, कहाँ भागे गा रे तूऽ'' म्हणत काळ्या डगल्यातले दोन पोलीस पुढं आले. एका उंच धिप्पाड माणसाच्या दंडाला साखळदंड बांधले होते. पोलिसांनी त्या माणसाला ओढत चौकात आणलं.

धिप्पाड माणसाचे डोक्यावरचे केस अस्ताव्यस्त पांगले होते. दाढी आणि छपरी मिशा पिंजारलेल्या होत्या. डोळे लालबुंद दिसत होते. अंगार पेटल्यासारखे वाटत होते.

काळ्या डगल्यातल्या पोलिसांनी ह्या डाकू सोबत मैदानाला एक फेरी मारली. पोलिसांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. चालण्यात ऐट होती. ते हसत खिदळत चालले होते.

डाकूनं दोन्ही हाताच्या साखळदंडाला एक झटका दिला. दोन्ही पोलिस धडपडत जमिनीवर आडवे झाले. डाकूने हातपायाचे साखळदंड मोकळे केले. पोलिसांचे दोन्ही पाय साखळदंडांनी बांधले. त्यांच्या अंगावरचे कपडे काढून घेतले.

''पुना कदी येताव पोलिसदादा, या तंट्याले पकडायले?'' पोलिसांना हसत विचारून डाकू अंधारात पसार झाला.

तंट्याच्या सोंगानं गर्दीतून आरोळ्या उठल्या. लहान मुलं तर आनंदानं नाचू लागली होती. तंट्यामामाचा पराक्रम बघून ती खूश झाली होती.

अंधारात आडोशाला उभं राहून तंट्या हे सगळं पाहात होता. क्षणभर त्याला स्वप्न पाहात असल्याचा भास झाला. आपलं सोंग आपणच कधी पाहू, यावर त्याचा विश्वास नव्हता.

क्षणभर तंट्या शहारला. लोकांच्या मनात आपला आदर आहे, तो तसाच राहू द्यावा या विचारानं तो परत जायला फिरला.

तंट्याला सख्खी बहीण नव्हती. गावात लग्न होत असे. प्रत्येक नवरी त्याला बहिणीसारखी वाटत होती. या बहिणीला सढळ हातानं ओवाळणी द्यावी, असं त्याला वाटायचं. नवरीला ओवाळणी देऊन तो आनंदी व्हायचा.

आजच्या वरातीतलं स्वत:चं सोंग तंट्यानं पाहिलं होतं. माणसं त्याला मान देत होती. त्याचं कौतुक करत होती. त्यांच्या मनात तंट्याबद्दलचा आदर दिसत होता. अशावेळी आपण दूरच राहणं बरं आहे, या विचारानं तो दोन पावले मागं सरकला.

बैलगाडीत बसलेली नवरी बहिणीसारखी होती. तिला लग्नाची भेट द्यावयाची होती. देण्यासाठी आणलेली भेट परत कशी न्यायची? ह्या विचारानं तो थांबला, बरोबरच्या एका साथीदारास तो म्हणाला, ''पाटलांना खबर सांगा तंट्या आलाय.''

तंट्या आल्याच्या बातमीनं माली पाटील हादरले. वरातीत सन्नाटा पसरला. भीतीचं वातावरण सगळीकडं पसरलं. तंट्याला नाही कसं म्हणायचं?

माली पाटील मनाच्या निश्चयाने उठले. नवरा-नवरीजवळ आले. तंट्या आला, हे हळू आवाजात पुटपुटले.

नवरी धीटपणे खाली पाहात म्हणाली, ''मामांजी, त्या तंट्याला सांगा, मला

त्याला तोंड दाखवायचं नाही. त्याचा आहेरपण नको मला?''

नवरीचं बाणेदार उत्तर तंट्याला ऐकू गेलं. हळव्या मनाचा तंट्या चरकला. धीर करून तो म्हणाला, ''तू मही भयीन हायेस.''

''तू मला बहीण समजतोस? मग आया बहिणींना त्रास देण्याचं काम तंट्यानं कसं सुरू केलं? असा माणूस माझा भाऊ कसा होऊ शकतो?'' तोंडासमोरचा घुंगट दूर न करता ती नवरी पुढं म्हणाली, ''मामंजी, ह्या बहादारास विचारा! आई-बहिणींची कदर करणाऱ्या तंट्यानं जामलीच्या सावकाराच्या सुनेच्या अंगाला हात कसा लावला?''

सगळ्या गर्दीत भीतीनं सन्नाटा पसरला.

तंट्या अंगातली शक्ती निघून गेल्यासारखा मागं वळला. पुन्हा थांबला. मागं वळून साथीदाराला विचारलं, ''जामलीला कोन गेलं व्हतं?''

तंट्याचा तिसरा साथीदार लछमन अंधारातून पुढं आला. तंट्यापुढं हात जोडून म्हणाला, ''मामा, म्या व्हतु तितं.''

आतापर्यंत अपराधी भावनेनं तंट्याला वेढलं होतं. त्यांच्या साथीदारानं त्याला खाली पाहावयास लावलं होतं. आतापर्यंत शांत असलेल्या तंट्याचा राग उफाळून आला.

''लछमन, त्वा काळं लावलं महे तोंडाले, कोनच्या हातानं सावकारच्या सुनेला...''

लछमननं उजवा हात पुढं केला. तंट्यानं कमरेचा तंग्या खसकन ओढला. फटक्यात मनगटापासून हात उडविला. दुसऱ्या साथीदाराकडं वळून तंट्या म्हणाला, ''लछमनला शिक्शा झाली. आता गावातला छकडा घे आन् खांडव्याला घिऊन जा डागदर सदाशिव भाऊकडं.''

तंट्या नवरीजवळ आला.

''ताई, ह्या तंट्याले माफ कर. त्येच्या गलतीबद्दल तंट्याचा न्याय सारका असतु. ज्यानं गलती केली, त्येला माफ नाय करत आमी. येतु म्या.'' कष्टी मनानं तंट्या जायला निघाला.

''तंट्या दादा, तू मला बहीण मानलंस ना! मग बहिणीचं तोंड न बघता तसाच परत जाणार आहेस?'' नवरीचे शब्द त्यानं ऐकले. तो क्षणभर थांबला.

कोपरीच्या खिशात हात घातला. मूठभर दागिने त्या बहिणीच्या ओटीत टाकले. जड अंत:करणानं अंधारात निघून गेला.

✪

# तंट्या झाला जननायक!

भिकनगाव तहसील खरगोन जिल्ह्यात होती. पूर्वेकडं खांडवा जिल्ह्याचा भाग होता. हा ब्रिटिशांचा मुलूख होता, तर खरगोन होळकर राज्याचा भाग होता.

मेजर ईश्वरी प्रसादांनी भिकनगाव तहसीलमधील अनेक भिल्लांना गुप्तहेराच्या नोकऱ्या दिल्या होत्या. तंट्याच्या हालचालीवर लक्ष ठेवायचं. ती खबर पोलिसांना द्यायची एवढंच काम त्यांच्यावर सोपविलं होतं. काही भिल्लांना फिरतीसाठी घोडे दिले होते.

यामुळं भिकनगाव तंट्याविरुद्धच्या मोहिमेचं केंद्र झालं होतं. कॅप्टन मोहंमदखान आणि लेफ्टनंट मुन्नासिंग होळकरांच्या वतीने तपास करीत होते. मेजर ईश्वरी प्रसादांची मोहीम सुरूच होती. खांडवा सरहद्दीवर ब्रिटिश पोलिसांची गस्त होती. परंतु त्यांच्यात थोडी शिथीलता आली होती.

भिकनगावला डाकबंगला होता. सरकारी अधिकारी आले की या बंगल्यात मुक्कामाला थांबत होते. भिकनगाव डाक बंगल्यात खानसामाची त्या दिवशी धावपळ चालली होती. नवीन तहसीलदारसाहेब आले होते. त्यांच्या जेवणाची तयारी चालली होती.

भुईफळचे पाटील आणि तहसीलदारांची ओळख होती. पाटलांनी साहेबांसाठी खाना ठेवला होता. साहेब आतल्या खोलीत बसले होते. पाटलांची धावपळ सुरू होती. काही सामान आणायला ते गावात गेले होते.

एक झुलीची बग्गी डाक बंगल्यासमोर उभी राहिली. बग्गीतून एक साहेब खाली उतरले. त्यांनी चौकीदारास विचारलं, ''डाक बंगल्यात कोण थांबलं आहे?''

''नवे तहसीलदार आहेत.'' चौकीदारानं सांगितलं.

बग्गीतून आलेल्या सुटाबुटातल्या साहेबानं डोक्यावरची साहेबी टोपी बगलेत मारली. रुबाबात चौकीदारास म्हणाले, ''त्यांना सांगा! होळकर सरकारचे फॉरेस्टचे

बडेसाब आले आहेत.''

मोठे साहेब आले आहेत ऐकून तहसीलदार लगबगीनं बाहेर आले. साहेबांना आदबीनं आत घेऊन गेले.

जेवणाची तयारी झाली होती. ताटं मांडली गेली. बड्या साहेबांबरोबर तहसीलदार जेवू लागले. थोड्या वेळापूर्वी बाहेर गेलेले पाटील परत आले होते.

तहसीलदारासोबत कोण बडे साहेब आहेत? पाटलांनी आत डोकावून पाहिलं. ते चटकन मागं सरकले. त्यांची बोबडी वळली. ते ह्या पाहुण्या साहेबासमोर आलेच नाहीत.

जेवण झाले. बडेसाहेब बग्गीत बसून निघून गेले. ते दूर गेल्यानंतर पाटील तहसीलदारसाहेबांसमोर आले. भीतीनं त्यांचा चेहरा पांढरा पडला होता.

''साहेब, ते बडे पाहुणे ओळखले का तुम्ही? तो तंट्या होता.'' घाबरलेल्या आवाजात पाटलानं सांगितलं.

तहसीलदार साहेबांचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता. दूर निघून गेलेल्या तंट्याच्या नावानं हात चोळू लागला.

निरनिराळी सोंगं तंट्या घेत होता. शत्रू पक्षाची फजिती करीत होता. तंट्या शिकलेला नव्हता. परंतु उत्तम संघटक होता. नेतृत्वाचे सगळे गुण त्याच्यात होते. तो हुशार होता. धाडसी होता. गनिमी काव्यानं शत्रूला नामोहरम करण्याची त्याची पद्धती होती.

बहुरूपीपणाला विनोदाची झालर होती. यामुळं संकटावर तो सहज मात करीत होता. त्याचा गनिमीकावा शिवाजी महाराजांची आठवण करून देणारा होता. त्याचे साथीदार त्याच्यासाठी जिवावर उदार झालेले मावळेच होते.

शिवाजी महाराजांना एकच शत्रू होता. तंट्याला मात्र अनेक शत्रू होते. गरिबांना लुबाडणारे सावकार एक. त्यांना साथ देणारे मालगुजार दुसरे होते. ब्रिटिश शासन तर त्याच्या जिवावर उठलं होतं.

या सगळ्यांशी तंट्या तोंड देत होता. त्याचे साथीदार हेच त्याचे सैनिक होते. पण त्याला खरा आधार होता सगळ्या रयतेचा. त्यात आदिवासी होते. किसान होते.

तंट्या भिल्ल होता. भिल्ल म्हणजे गुन्हेगार जात. सगळे या जातीची उपेक्षा करतात. अशा जातीतून तंट्या पुढं आला होता. जननायक म्हणून त्याची प्रतिमा निर्माण होत होती.

ही गोष्ट श्रीमंत सावकार-मालगुजारांना आवडणारी नव्हती. वर्षानुवर्षे ह्या वर्गाची समाजावर पकड होती. हे सरंजामवर्ग इतरांना पिळत होते. नागवीत होते. अशा वेळी एक तंट्या या व्यवस्थेविरुद्ध पुढं आला, बंड करू लागला ही घटना क्रांतिकारक होती. त्यापेक्षा सत्ताधारी पक्षाला ते एक आव्हान होतं.

तंट्या स्वत:साठी डाके घालत नव्हता. त्याचा लढा त्याच्या स्वार्थासाठी नव्हता. त्याच्या टोळीच्या स्वार्थासाठीही नव्हता. त्याचा राग लोकांना पिळणाऱ्या मालगुजार सावकाराविरुद्ध होता. सरकार ह्यांना पाठीशी घालत होतं.

तंट्या आपल्यासाठी हे करतोय असं गरीब शेतकरी-आदिवासींना वाटत होतं. कष्टकरी-पिचलेला वर्ग गांजलेला होता. सावकार-मालगुजारांबद्दल त्यांचा राग होता. पण ह्या प्रबल वर्गाचा ते उघड विरोध करू शकत नव्हते.

ह्या जुलमी वर्गाचा विरोध तंट्या करू लागला. आपलंच काम तंट्या करतो आहे, ही भावना आदिवासी किसानात पसरली होती. आणि ते तंट्याला मदत करू लागले होते. ब्रिटिश सत्तेसाठी हीच मोठी डोकेदुखी ठरली होती.

होळकरांचा मोठा मुलूख खांडव्याला लागून होता. तंट्या ह्या भागातून ब्रिटिश मुलखात येई. लूटमार करी. आणि पुन्हा होळकर मुलखात पसार होई. होळकर पोलिसांकडून तंट्याला अटकाव होत नव्हता. उलट एक प्रकारे फूसच मिळत होती.

चीफ कमिशरांनी गव्हर्नर जनरलकडे विनंती केली. होळकर सरकारला समज द्यावी. त्यांच्या भागात तंट्याला अटकाव करावा. गव्हर्नर जनरलांनी होळकर सरकारवर दबाव आणला.

होळकर दरबारानं कॅप्टन मोहम्मद खान आणि लेफ्टनंट मुन्नासिंग हे दोन काम करीत होते.

या खबऱ्याने तंट्याच्या हालचालीची माहिती ब्रिटिश अधिकाऱ्यांना पुरविली. ब्रिटिशांना मदत केल्याबद्दल कॅप्टन खान यांनी या लोकांना शिक्षा केली. तंट्या विरुद्ध पुढे काही हालचाली केल्यास कडक शिक्षा केली जाईल, असा दमही भरला.

कॅप्टन खानची ही कारवाई ब्रिटिश सत्तेविरुद्ध होती आणि तंट्याला मदत करण्यासारखी होती. तंट्याच्या काही नातेवाईकांना अटक झाली होती. तंट्याला पकडण्यासाठी मदत करतो, या अटीवर त्यांना सोडून देण्यात आलं होतं. अशा भिल्लांना कॅप्टन खाननं होळकर दरबाराची नोकरी दिली.

हे भिल्ल सरकारकडून या कामासाठी पगार घेत होते. तंट्याला पकडण्यास मदत करतो, असे नाटकही करीत होते. प्रत्यक्ष मात्र तंट्याला मदत करत होते.

ही गोष्ट वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या लक्षात आली. कॅप्टन खानबरोबर लेफ्टनंट मुन्नासिंगही यात सामील होता. हे सगळं चीफ कमिशनरांनी गव्हर्नर जनरलना कळवलं.

गव्हर्नर जनरलनी होळकर दरबाराला काय कळवलं ते माहीत नाही; परंतु इंदूरहून आदेश निघाले. सहा तासाच्या आत इंदूरला या दोघांनी हजर व्हावे, असे दरबाराचे फर्मान निघाले.

सगळीकडं अफवा पसरू लागल्या. तंट्यानं अमूक गावी हमला केला, या तमूक गावचा सावकार तंट्याला शरण आला, त्या मालगुजाराने खंडणी पोहोचती केली.

तंट्याच्या पराक्रमाच्या कथा पसरत होत्या. नव्या नव्या दंतकथा जन्म घेत होत्या.

तंट्या भेटला. प्रत्यक्ष त्याची गाठ पडली. त्याच्याशी चकमक झडली. समोरासमोर पोलिसांशी टक्कर झाली, असं एकही उदाहरण दिसत नव्हतं. त्याच्या कथा आणि अचाट शौर्याच्या कथा मात्र घराघरात सांगितल्या जात होत्या.

धार, खानदेश आणि महादेवाच्या टेकड्यांत छोटा नाईक गाजत होता. मंडलेश्वराच्या महमूद खाननं ब्रिटिशांना जेरीस आणलं होतं. या सगळ्यात भर म्हणून दोन हजार मैलाच्या नर्मदा खोऱ्यात तंट्यानं धुमाकूळ घातला होता.

तंट्याचा मुक्काम शिवना गावी होता. हे गाव होळकर हद्दीत होतं. सातपुड्याची एक दरी होती. गावच्या पूर्वेला काही मैलावर ब्रिटिशांची हद्द होती. गावाच्या तिन्ही बाजूंना सातपुडा डोंगराची तटबंदी होती. पूर्वेकडं एक नदी वाहत होती. नदीच्या कडेनं खोऱ्यातून शिवना गावात वाट जात होती.

एखाद्या किल्लाच्या तटबंदीसारखा डोंगर होता. बेचक्यात गाव होतं. गावाभोवती डोंगरात टेहळणी करिता जागा होत्या. डोंगरावर दाट झाडी होती. लपण्यासाठी नदीनाले होते. पसार होण्यासाठी अनेक पायवाटाही होत्या.

शिवनाचे पाटील तंट्याचे मित्र होते. पाटलांच्या मळ्यात तंट्याचा मुक्काम असायचा. येथून सगळीकडं निरोप जात होते. सूचना मिळत होत्या. तंट्याच्या

साथीदाराचं ते केंद्रच झालं होतं.

तंट्याचा मुलगा किसन लग्नाचा झाला होता. लग्न ठरले. लग्नाची सगळी व्यवस्था शिवनाचे पाटील पाहत होते. तंट्याच्या पोराचं लग्न ठरलं ही बातमी पोलिसांना कळली होती. पोराच्या लग्नासाठी तंट्या येणार, पोलीस तयारीला लागले.

माधवराव पाटलाच्या मळ्यात लग्न होतं. तंट्याच्या पोराच्या लग्नासाठी दूरदूरची माणसं शिवनाकडं येऊ लागली. यात तंट्याचे चाहते होते. जुने साथीदार होते. त्याच्यावर प्रेम करणारे आदिवासी किसान होते.

तंट्याला लग्नात पाहता येईल. त्याचं डोळ्याला दर्शन होईल, असे विचार करणारे तरुणही होते. शिवना गावच्या रस्त्यावर साध्या वेशातले पोलीस वऱ्हाडी म्हणून फिरू लागले. शस्त्रधारी पोलीस आड रस्त्याला दबा धरून बसले.

सायंकाळी लग्न होते. यावेळेस तंट्या येईल असा पोलिसांचा अंदाज होता. दुपारची वेळ होती. एक बैलगाडी शिवना गावाच्या खांडीत पोलिसांनी अडविली. बैलगाडीत दोन बायका आणि गाडीवान बघून गाडी सोडून दिली.

गाडी शिवना गावात आली. गाडीतल्या दोघी उतरल्या. गावामागच्या ओढ्यानं लग्नस्थळी पोहोचल्या. यशोदा आत्यानं, माधवराव पाटलांनी लग्नाची तयारी केली.

लग्न लागलं. गावाकडून पोलीस येताना दिसले. यशोदेसोबतच्या बुरख्यातल्या स्त्रीनं बुरखा काढून टाकला. साडी फेकून दिली. नवरा-नवरीला आशीर्वाद दिला. बाजूच्या ओढ्यात उडी मारली.

भिकीच्या डोळ्यात आनंदानं आसवं जमा झाले होते. पोराच्या लग्नाला बाप हजर झाला याचं समाधान झालं तिला.

पोलीस लग्नाच्या ठिकाणी पोहोचले. त्यांना कळलं, लग्न लागून गेलं होतं. आजही तंट्यानं त्यांना गुंगारा दिला होता.

नर्मदा विभागाच्या कमिशनरांनी चीफ कमिशनरांना एक प्रस्ताव पाठविला. आतापर्यंत विविध कारवाया आखल्या होत्या. तंट्याविरुद्ध पोलीस यंत्रणा काम करीत होती. यात पोलिसांना अपयशच येत होतं.

विभागीय कमिशनरांनी म्हटलं, आपली पोलीस यंत्रणा कार्यक्षम नाही. स्थानिक पोलीस तर कुचकामी आहेत. ते तंट्याला मदत केल्यासारखे वागत असतात.

अशा परिस्थितीत 'स्पेशल पोलिसांची' नियुक्ती करावी. या स्पेशल पोलिसांचं

स्वरूप सैनिकांसारखं असावं. तंट्याचा वावर असलेला अशांत भाग जाहीर करावा. या अशांत भागात ह्या नव्या यंत्रणेला ठेवावं. त्यांच्या नियुक्तीमुळे लोकावर वचक निर्माण होईल. ते तंट्याला मदत करतात. ही मदत कमी होईल.

चीफ कमिशनरांनी हा प्रस्ताव स्वीकारला नाही. पोलिसांच्या अपयशावर सैनिकी पोलिसांची योजना होऊ शकत नाही, असं त्यांनी कळविलं.

कर्नल हॅमंड नर्मदा खोऱ्यातील तंट्याविरुद्धच्या मोहिमेचे प्रमुख झाले. आल्या आल्या त्यांनी आतापर्यंतच्या कामाचा आढावा घेतला.

नर्मदा खोऱ्यात ब्रिटिश पोलिसांची दुहेरी तपास व्यवस्था होती. स्थानिक पोलिस होते. त्याशिवाय बाहेर जिल्ह्यातील अधिक पोलीसबल ह्या भागात बोलावलं होतं. बाहेरच्या पोलिसांच्या व्यवस्थेचं काम स्थानिक पोलिसावर सोपविलं होतं.

ह्या दुहेरी पोलीस यंत्रणेत मूळ काम बाजूला राहू लागलं. इतर कुरबुरी सुरू झाल्या.

कर्नल हॅमंड यांनी बाहेर जिल्ह्यातली फौज आणि अधिक पोलीसबल त्यांच्या मूळ जिल्ह्यात परत पाठविले. स्थानिक पोलिसांचं आत्मबल वाढवावं म्हणून त्यांच्यावर तंट्या तपासाचं काम सोपविलं.

छेगाँव पोलीस स्टेशनजवळ बरूर गाव होतं.

३ नोव्हेंबर १८८६ चा दिवस होता. सायंकाळची वेळ होती. बरूर गावात ललकारी करत तंट्यानं प्रवेश केला. त्याच्या सोबत वीसजण होते. सगळ्यां जवळ हत्यारं होती. पाटलांच्या घरासमोर टोळी थांबली. आवाज दिला. पाटलांचा मुलगा बाहेर आला.

तंट्याच्या माणसांनी माधोला ताब्यात घेतलं.

''पोरगा पाह्यजे आसल तर एक हजार रुपयांचा दंड भरा. एक घंटा थांबतो आमी. नाहीतर पोराले घिऊन जातो.'' तंट्या म्हणाला.

एक तास झाला. पाटील हजार रुपयांची सोय करू शकले नाहीत. टोळीनं माधोला बरोबर घेतलं. टोळी पश्चिमेकडं जंगलात निघून गेली.

छेगाँव पोलीस स्टेशन जवळ होतं. स्टेशनला खबर पोहोचली. मुख्य कॉन्स्टेबल आणि चार शिपाई धावत आले. टोळी गेली त्या दिशेनं पाठलाग केला. जंगलात एके ठिकाणी टोळी थांबलेली होती. पोलिसांनी बंदुकीच्या फैरी झाडल्या. टोळीतल्या एकाला गोळी लागली. टोळीनं पोलिसांवर प्रतिहल्ला केला. जखमी साथीदाराला बरोबर घेऊन अंधारात पसार झाले.

ही पहिली वेळ होती पोलीस तंट्याच्याजवळ पोहोचले होते; परंतु त्यांच्या हाती आलेली संधी निघून गेली होती.

तंट्यानं पकडून नेलेला माधो चौदाव्या दिवशी रात्री परत आला. पोलीस धावत बरूरला आले. चौदा दिवस त्याला तंट्यानं फिरवलं होतं. तो कसा निसटून आला? पोलीस विचारीत होते.

माधोनं सांगितलं. तंट्यानं त्याच्या डोळ्यावर कापडाची पट्टी बांधली होती. त्याला घेऊन तंट्या वेगवेगळ्या ठिकाणी फिरला. पण माधो काही सांगू शकत नव्हता. एके दिवशी टोळीची नजर चुकवून तो निसटला. आणि परत आला होता.

पोलीस अधिकाऱ्यांना माधोच्या सांगण्यावर विश्वास नव्हता. त्याची कसून चौकशी केली. माधो काही सांगू शकला नाही. तंट्याच्या भीतीनं तो तोंड उघडत नसावा, असं पोलिसांना वाटलं.

तंट्या विरुद्धच्या चकमकीत भाग घेतलेल्या पोलिसांना सरकारनं बक्षीस दिलं. त्यांच्या हिंमतीचा गौरव करण्यात आला.

# मेजर ईश्वरी प्रसादने वीडा उचलला

मेच्या भर उन्हाळ्यात मेजर ईश्वरी प्रसाद निमाडमध्ये दाखल झाले होते. निवडक फौजेसह त्यांनी तपास सुरू केला. ईश्वरी प्रसाद हे ब्रिटिश पोलिसांच्या मदतीने ही मोहीम चालविणार आहेत, असा ब्रिटिश अधिकाऱ्यांचा कयास होता. गव्हर्नर जनरलच्या आदेशानं ते आले होते.

मेजर ईश्वरी प्रसादांनी स्वत:च्या अधिकारात तपास सुरू केला. निमाडच्या पोलीस अधीक्षकांनी चीफ कमिशनरांना याबद्दल कळविलं. चीफ कमिशनरांना ईश्वरी प्रसादाच्या परस्पर कारवाईचं आश्चर्य वाटलं. ते नाराजही झाले. गव्हर्नर जनरलच्या या आदेशाविरुद्ध त्यांना नाराजी व्यक्त करता येईना. निमाडमधील ब्रिटिश पोलीस या प्रकारानं अस्वस्थ झाले होते.

मेजर ईश्वरी प्रसादांनी सातपुड्याच्या पायथ्याशी घोडदळाची गस्त वाढविली. होळकर-ब्रिटिश हद्दीवर चौक्या उभारल्या. 'तंट्या फौजेनं' सगळा डोंगराळ टापू पिंजून काढला.

या काळात चीफ कमिशनरांनी गव्हर्नर जनरलच्या एजंटांना पत्र लिहिले. पत्रात त्यांनी स्पष्ट लिहिलं. ''तंट्या हुशार डाकू आहे. गेली नऊ वर्षं पोलीस त्याचा तपास करीत आहेत. आतापर्यंतचा आमचा अनुभव असा आहे. तंट्याला सरळ पकडणं जवळजवळ अशक्य आहे. आता एकच मार्ग मला दिसतो, तंट्याच्या जवळच्या माणसाचा शोध घ्यावा लागेल. त्या माणसाला पैशाच्या लालचीनं आपलंस करावं लागेल. त्याच्या मदतीनं, तंट्याला फसवून- धोक्यानं पकडता येऊ शकेल.''

चीफ कमिशनर आणि गव्हर्नर जनरलांचे एजंट यांच्यात या संदर्भात बराच पत्रव्यवहार झाला. एजंटांनी एका पत्रात शंका व्यक्त केली. पोलीस तंट्याचा दहा वर्ष शोध घेत आहेत. पण त्याला कोणी प्रत्यक्ष पाहिलं, अशी एकही घटना नाही.

तंट्या आहे काय? खरं वास्तव काय आहे? तंट्या कल्पनेतला आणि दंतकथेच्या स्वरूपात तर नाही ना?

तंट्या दिसत नव्हता. पण त्याच्या कारवाया थांबत नव्हत्या. पोलिसांना आता

पर्यंतच्या मोहिमेत थोडही यश मिळत नव्हतं. या सगळ्या कारणामुळं खरंच तंट्या आहे काय? अशी शंका निर्माण होऊ लागली. तंट्याच्या नावानं दुसरीच माणसं लूटमार करीत असावेत, असाही विचार वरिष्ठांच्या मनात येऊ लागला होता.

तीन-चार महिने मेजर ईश्वरी प्रसादांनी 'तंट्या पोलीस' फौजेच्या मदतीनं तपास चालू ठेवला.

दरवर्षी पाऊस सुरू झाला की काही महिने तंट्याच्या हालचाली थांबत. पावसामुळं जंगलात फिरणं अवघड होई. नदी-नाल्यांना पूर येई. वाहतुकीची कोंडी होई. या काळात तंट्या आणि त्याचे साथीदार जंगलात विश्रांती घेत. हा पोलिसांचा अनुभव होता.

मेजर ईश्वरी प्रसादानं ह्या मोहिमेत होळकर आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांना विश्वासात घेतलं नव्हतं. या मोहिमेची सगळी जबाबदारी स्वत:वर घेतली. यामुळे ब्रिटिश अधिकारी व होळकरांच्या अधिकाऱ्यात नाराजी वाढत गेली. यातून त्यांच्या तपासात शिथिलता येत गेली.

तंट्याला ही सगळी खबर कळत होती. सरकारनं नेमलेले काही गुप्तहेर तंट्याचे नातेवाईक होते. ते सरकारकडे नोकरी करीत होते. तंट्याविरुद्ध काम करण्याचे ते नाटक करीत होते. आतून मात्र सगळं तंट्याला कळवीत होते.

ईश्वरी प्रसादानं पावसाळ्यापूर्वी जोरात मोहीम सुरू केली होती. यावेळी काही दिवस शांत राहायचं तंट्यानं ठरविलं. शत्रू जोरात असताना दोन पावलं मागं सरकण्यासारखं होतं ते. हा गनिमीकावा तो अनेक वर्षांच्या अनुभवानं शिकला होता.

ईश्वरी प्रसादाच्या फौजेनं पावसापूर्वी सगळा मुलूख तपासला. खाजगी गुप्तहेरांना कामाला लावलं. तंट्याला मदत करणाऱ्या मालगुजारांना दम दिला. या काळात तंट्यानं कुठेही हल्ला केला नाही. लूटमार केली नाही. दोन्ही पक्ष एक दुसऱ्यांची शक्ती अजमावीत होते.

पाऊस सुरू झाला. फौजेच्या हालचाली मंदावल्या. पाऊस उघडण्याची वाट पाहण्याशिवाय मार्ग नव्हता. ईश्वरी प्रसादानं मोठ्या उमेदीनं ही मोहीम हाती घेतली होती. थोड्या काळात आपण तंट्याला पकडू, असा त्यांचा विश्वास होता.

चार महिन्याच्या भागदौडीत त्यांच्या लक्षात आलं. तंट्याबद्दल लोक माहिती सांगत नाहीत. सावकार-मालगुजारही तोंड उघडत नाहीत. होळकरांचे अधिकारीही ह्याकडं गंभीरपणे पाहत नाहीत.

ही एकूण परिस्थिती मेजर ईश्वरी प्रसादाच्या लक्षात येऊ लागली. त्यांचा सुरुवातीचा उत्साहही कमी होऊ लागला. फौजेपुढं आणखी एक प्रश्न निर्माण

झाला. मलेरियाच्या तापानं एक एक शिपाई आजारी पडू लागला. ही साथ झपाट्यानं पसरत गेली. तंट्याविरुद्ध लढायला ही फौज आली होती. पण दुसऱ्याच शत्रूनं फौजेला जणू खिंडीत गाठलं होतं.

मलेरियाचा ताप आटोक्यात येत नव्हता. सगळी फौज तापानं बेजार होत होती. अशा परिस्थितीत मोहीम चालू ठेवणं शक्य नव्हतं.

८ ऑक्टोबर १८८८ ला मेजर ईश्वरी प्रसादानं फौजेच्या प्रमुखाला बोलावलं. सैनिकांची चौकशी केली. अर्धे शिपाई मलेरियानं पछाडले होते. बाकीच्यांत ह्या भीतीनं हे काम पुढं चालू ठेवण्यात उत्साह नव्हता.

मेजर ईश्वरी प्रसादांनी परत फिरण्याचा निर्णय घेतला. होळकर दरबाराचे सैनिक इंदूरला पाठवून दिले. भोपाळच्या सैन्याला तिकडं पाठविलं आणि ते इंदूरला परत गेले.

ईश्वरी प्रसादांनी येताना कुणाला कल्पना दिली नव्हती. मोहीम सोडून जातानाही ते तसेच निघून गेले होते.

## तंट्याचं वाढत वय

ही बातमी तंट्याला लागलीच समजली होती. तंट्या मुक्कामाच्या ठिकाणाहून बाहेर आला होता. गेली दहा वर्षे पोलीस आणि त्याचा लपंडाव सुरू होता. पोलीस एक योजना आखीत होते. तंट्या ती योजना उधळून लावीत होता.

इतकी वर्षं हा एकटा मूठभर साथीदारासह झुंजत होता. त्याच्या समोर बलाढ्य सत्ता होती. त्यांचे साथीदार पोलीस होते. गव्हर्नर जनरलच्या फौजेतल्या निवडक सैनिकांनी मोहीम आखली होती. तरीही तंट्या त्यांना सापडला नव्हता.

सातपुड्यातील डोंगर कपारीत तो शत्रूला झुलवीत होता. झुकांड्या देत होता. ह्या काळात ब्रिटिश पोलीस हताश झाले होते. अगदी सुरुवातीला, दहा वर्षांपूर्वी तंट्याच्या दोन साथीदारांना अटक झाली होती. त्यानंतरच्या वर्षांत पोलिसांच्या हाती काही लागलं नव्हतं. सगळीकडं पोलीस यंत्रणेची नामुष्की होत होती.

तंट्या आता निमाडचा वीर समजला जाऊ लागला होता. तो गरीबांचा कैवारी होता. अडचणीतल्यांना तो देवासारखा वाटू लागला. निमाडच्या स्त्रियांना तो पाठीराखा भाऊ वाटत होता. त्याच्या गौरवाची गाणी घराघरात पोहोचली होती.

आदिवासी-किसानांना तो आपला नायक वाटत होता. सगळी जनता त्याच्या मदतीसाठी आतूर होती ब्रिटिश जुलमामुळं तंट्याला उघड मदत करण्यात ते

घाबरत होते; परंतु आतून सगळ्या जनतेची सहानुभूती तंट्याच्या बाजूनं होती.

आता तंट्या ४६ वर्षांचा झाला होता. गेली सोळा वर्षं त्याच्या नशिबी ही वणवण सुरू होती. एक दिवस शांतपणे झोप नव्हती. निवांतपणा माहीत नव्हता. पोलिसांचा त्याच्या मागं ससेमिरा होता. समोरचा शत्रू प्रबळ होता. त्यांच्याकडं वाहने होती. आडरस्त्यानं पाठलाग करायला घोडदळ मदतीला होतं. सैन्याकडं शस्त्रं होती.

तंट्याजवळ काय होतं? त्याचे आणि त्याच्या साथीदारांचे काटक पाय हेच त्याचं हालचालीचं साधन होतं. एका दिवसात तो पन्नास-साठ मैलाचे अंतर सहज पार करायचा. सातपुड्यातले चढउतार त्याच्या अंगवळणी पडले होते. त्याचे साथीदार मोजकेच होते. परंतु ते त्याच्यासाठी जीव द्यायलाही मागंपुढं पाहत नव्हते. नर्मदा खोऱ्यातल्या जनतेची साथही तंट्याला मिळत होती.

तरीही तंट्याच्या या लढ्याला मर्यादाच होत्या.

कडाक्याच्या थंडीत तो जंगलातील झोपडीत आसरा घेत होता. उन्हातून फिरताना कातडी करपत होती. अगोचर पावसात हिवतापाला तोंड देत होता. जंगलातला निवारा कोणता? जाळीच्या आडोशाला राहात होता. मिळेल ती कंदमुळं खात होता. कधी कोरडी भाकरी मिळत होती. कधी अर्धपोटी झऱ्याचं पाणी पिऊन गुजराण करीत होता.

वयाच्या मानानं शरीर पूर्वीसारखं साथ देत नव्हतं. मन आणि शरीरावर विविध ताण होते. याचा परिणाम पूर्वीची उमेद कमी होऊ लागली होती.

जंगल त्याचं घर अंगण होतं. डोक्यावरचं आकाश हे कृपाछत्र वाटायचं. निसर्गातल्या जगण्याचा ताण आता सहन करताना अगोदरचा जोश राहिला नव्हता.

सोळा वर्षांची भटकंती झाली होती. रानोमाळ तुडविताना काटक पायांनाही मर्यादा होत्या. गुडघ्याच्या दुखण्यानं डोकं वर काढलं. नजर कमजोर झाल्यासारखी वाटू लागली. एका दमात पूर्वी तो पन्नास-साठ मैल न थकता पळायचा. चालत्या रेल्वेच्या मालगाडीवर चढायचा. धान्याची पोती डब्याबाहेर टाकीत असे. पुन्हा गाडीवरून उडी मारीत असे.

आता हे करणं अवघड आहे, अशी जाणीव तंट्याला होऊ लागली होती. थोडं पळालं तरी दम लागतो. शरीर साथ देत नाही. मनाची उभारी कमी होऊ लागली.

म्हातारपणाची चाहूल त्याला दिसू लागली.

आपण किती वर्षं शत्रूशी असं लढायचं? आणि याचा शेवट काय आहे? हा

विचार त्यांच्या मनात येऊ लागला. आजही कोणत्याही गावात त्याचं स्वागत होत होतं. तरुण त्याच्याकडं आदरानं पाहत होते. त्यांची सहानुभूती मिळत होती. अन्नधान्याची मदत मिळत होती; परंतु ते सगळे चोरून-लपून साहाय्य करत होते.

पोलिसांची लोकांना भीती वाटतच होती आणि पोलिसांच्या नजरेसमोर आपण एक गुन्हेगार आहोत. डाकू आहोत. राहिलेलं आयुष्य एका ठिकाणी राहावं. बायको-पोराबरोबर शांतपणे जीवन जगावं, असा विचार डोक्यात येऊ लागला. हा विचार तो साथीदारांजवळ बोलून दाखवू लागला.

तंट्याला वाटत होतं, होळकर सरकार त्याला आतून मदत करीत आहेत. असं वाटायला कारण होतं, होळकर सरकारच्या पोलिसांनी त्याला त्रास दिला नव्हता. ते त्याच्याकडे कानाडोळा करत होते. होळकर सरकार आपले आहे, गोरे सरकार आपले नाही असा फरक त्याला दिसत होता.

होळकर सरकारबद्दल त्याला आदर वाटत होता. होळकर सरकारनं आपल्याला माफ केल्यास, त्यांच्या पदरी चाकरी करावी, असं त्याला वाटू लागलं. गोऱ्या पोलिसांच्या हाती पडण्यापेक्षा होळकर सरकारला शरण जावं, असा विचारही तो करू लागला.

होळकर सरकारकडं कसं जायचं? आपली इच्छा महाराजांपर्यंत कशी पोहोचवायची?

तंट्या अशा माणसाचा शोध घेऊ लागला, जो माणूस महाराजांकडं मध्यस्थी करू शकेल.

तंट्याचा मुक्काम पोखर जवळच्या जंगलात होता. पोखरला मोहन चौधरी राहत होता. मोहनने खूप वर्षांपूर्वी तंट्याला फसवून अटक करवली होती. ह्या मागे हिंमत पाटलाचा हात होता. हिंमत पाटलाला त्यानं अद्दलही घडवली होती. तंट्या मोहनबद्दल विसरला होता.

गजरी मोहनची आई होती. ती यशोदेची जवळची नातेवाईकही होती. गजरी यशोदेला नेहमी घालून-पाडून बोलायची. तंट्याच्या नावानं नावं ठेवायची. एका भिल्लाशी तू संबंध ठेवलास. तो गुन्हेगार आहे. पोलीस त्याच्या मागं आहेत. तुझ्या अशा वागण्यानं गावाची बदनामी होते. आपल्या जातीच्या स्त्रीला हे शोभत नाही. त्याच्याकडून मदत स्वीकारणं गैर आहे.

गजरी अशा प्रकारे यशोदेला टोचून बोलत होती. चारचौघात अपमान करीत होती. अलीकडं तिनं यशोदेला या संबंधात खूप बदनाम केलं होतं.

हे सगळं तंट्याला खबऱ्याकडून समजलं होतं. यशोदा आणि तिच्या वडिलांना तंट्या मदत करत होता. ही मदत एक कर्तव्य भावनेतून होती. तंट्यामुळं शिवबा पाटलांना गावकऱ्यांनी मागं खूप त्रास दिला होता.

आपल्यामुळं पाटलांना त्रास झाला. यशोदेची बदनामी झाली, याबद्दल तंट्याला अपराधी वाटत होतं. त्यानं गावकऱ्यांना दम दिला. पाटलांना त्रास दिल्यास, त्याच्याशी गाठ आहे असं बजावलं आणि तो यशोदेच्या कुटुंबाला उघड मदत करू लागला होता.

गजरीनं यशोदेला पुन्हा छळणं सुरू केलं, हे कळल्यानं तंट्या अस्वस्थ झाला. अलीकडं त्याचं मन:स्वास्थ्यही ठीक नव्हतं. मेजर ईश्वरी प्रसाद मागं लागल्यापासून तंट्यानं बचावाचं धोरण स्वीकारलं होतं.

मेजर ईश्वरी प्रसाद इंदूरला निघून गेले. सगळी फौज परत पाठविली. तंट्याला ही खबर मिळाली होती. लपलेल्या ठिकाणातून तंट्या बाहेर पडला.

## गजरीला धडा

तंट्या अलीकडं हळवा झाला होता. एखादी गोष्ट मनासारखी झाली नाही की चिडचिड करायचा. त्याचं वागणं बदललं होतं. साथीदार हे ओळखू लागले होते.

इतकी वर्षे तंट्यानं ताण सहन केला होता. हा ताण शरीरावर पडला होता. मनावर पडला होता. दीर्घकालीन परिणामानं तो हळवा झाला होता. सगळेच आपल्या विरुद्ध आहेत, अशी भावना त्याच्या मनात वाढू लागली होती. आपण एकले आहोत, ही बोचणी अस्वस्थ करीत होती.

अशा वेळी यशोदेबद्दल त्याला कळलं होतं. गजरी यशोदेला छळू लागली होती. नावं ठेवू लागली होती. तंट्याच्या नावानं तिची निर्भर्त्सना करीत होती.

हे ऐकून तंट्या बेचैन झाला. काही साथीदारांना बरोबर घेतलं आणि पोखर गावाकडं चालू लागला.

सत्तावीस ऑक्टोबरची सायंकाळची वेळ होती. पाऊस उघडला होता. गावातली माणसं शेतावरून परतत होती.

तंट्या पोखरला आला. नवगजाबाबापुढं डोकं टेकविलं. मोहन चौधरीच्या घरी आला. मोहनची बायको अंगणात चुलीवर भाकरी करीत होती. तंट्याला बघताच ती घाबरून आत पळाली. गजरी बाहेर आली. तंट्या दिसताच ती घरात लपण्याचा

प्रयत्न करू लागली. एकानं तिला ओढून बाहेर आणलं.

''आतापस्तुर म्या तुमाले बोट लावले नाय. पर आता माजा इलाज राह्यला नाही. तुमी यशोदेला दंड लावला शंभर रुपयाचा. सरकारने तुमाले पाचशेचं बकशिस देले मले धरून देल्याचं. त्यो पैका आताच ठिव माज्या समूर आन् यशोदेला छळनं बंद कर या म्होरं.'' तंट्या चिडला होता. अनेक वर्षांचा त्याचा राग उफाळून आला होता.

मोहन चौधरीनं तंट्याला मागं पकडून दिलं होतं. या कामाबद्दल सरकारनं पाचशे रुपयाचं बक्षीस दिलं होतं. मोहनच्या वडिलांनी सरदार पाटलांनी यशोदेच्या वडिलांना शंभर रुपये दंड केला होता.

ही रक्कम तंट्या परत मागत होता.

गजरी गयावया करू लागली. माझ्याकडं पैसे नाही म्हणाली. यशोदेला आता त्रास देणार नाही, असंही कबूल केलं.

''यशोदेचा कामून छळ लावलास?'' तंट्यानं चिडून विचारलं. तंट्याचा राग अनावर झाला. बंदुकीच्या दस्त्यानं गजरीला व तिच्या सुनेला फटके दिले. साथीदारास घरात शोध घेण्यास सांगितले. घरात फक्त चौदा रुपये मिळाले.

गजरी आणि तिच्या सुनेला घराबाहेर काढले. तिचे दोन नातू रडू लागले. गजरी गावकऱ्यांना मदतीसाठी बोलावू लागली. गावातला कोणीही मदतीसाठी पुढं आला नाही. तिच्या घराला टाळं लावलं. निघतांना घर पेटवून दिलं. गजरी, तिची सून आणि दोन नातवंडांना पुढं घातलं. गावाशेजारच्या शेताकडं चालू लागले.

गजरीच्या शेताशेजारी असगर अलीचं शेत होतं. तो शेतात होता. टिपूर चांदण्यात तो बांधावर उभा राहिला. तंट्यानं त्याला आवाज दिला. असगर अली आला. तंट्याला बघून तो घाबरला होता. पळताही येत नव्हतं.

तंट्यानं साथीदारास हुकूम केला. गजरी, तिची सून आणि नातवाच्या अंगावरचे दागिने काढून घेतले. गजरीच्या सुनेच्या पायात पैंजण होते. पैंजण निघत नव्हते. अकडा घट्ट बसलेला होता.

''पाय तोडून टाका.'' रागानं धुसफुसणारा तंट्या म्हणाला. एकजण तलवार घेऊन पुढं सरसावला. दुसऱ्या क्षणी तंट्यानं स्वतःला सावरलं. साथीदारास तसं काही करू नको, म्हणून सांगितलं.

गजरीच्या एका नातवाच्या डोक्यावर फेटा होता. तो फेटा काढून घेतला. फेट्यानं गजरीचे हात पाय बांधले. तिला झुडपाआड अडोशाला नेलं. दोघांनी तिला घट्ट दाबून धरलं.

जड अंतःकरणानं तंट्यानं तिचं नाक कापलं.

''यशोदेला तरास देल्याची ही शिक्शा हाय.'' तंट्या म्हणाला. परत साथीदाराकडं आला. बाजूला असगर अली उभे होते. त्यांना तंट्या म्हणाला.

''गजरी अन् तिच्या सुनेला शिवा पाटला समूर घिवून जावा तुमी. त्येंना म्हनाव, तट्यान शिक्शा केली हाय.''

तंट्या जंगलाकडं चालू लागला. आयुष्यात पहिल्यांदा त्यानं एका स्त्रीला त्रास दिला होता. आपलं हे चुकलं, रागाच्या भरात असं करायला नको होतं. पश्चात्तापानं तो घेरला गेला.

✪

# मेहुण्याने घात केला

खरगोन जिल्ह्यात बाणेर नावाचं गाव होतं. खरगोनच्या दक्षिणेला दहाबारा मैलावर होतं. गावाच्या दक्षिणेला उंदरी नदी वाहत होती. नदीकाठी शिंदीचं बन होतं. गावाला लागून महादेवाचं अर्धवट पडलेलं मंदिर होतं. त्याला लागून एका घरात गणपतसिंह राजपूत नावाचा इसम राहत होता. गणपतची आणि तंट्याची ओळख होती. गणपतची बायको तंट्याची मानलेली बहीण होती. या बहिणीकडे तंट्या अधून मधून येत असे.

बाणेरगाव मोठं होतं. गावात दोन-अडीचशे घरं होती. गावात वाण्याचं दुकान होतं. तंट्या आणि त्याचे साथीदार दुकानातून खाण्या-पिण्याचं सामान नेत असत.

बाणेरगावाच्या दक्षिणेला चारेक मैलावर सातपुड्याच्या रांगा होत्या. रांगातून उंदरी नदी वाहत होती. नदीच्या दोन्ही तीरांवर घनदाट जंगल होतं.

सातपुड्याच्या ह्या रांगेत सबलगडचा जुना किल्ला होता. बाणेरपासून तो अठरा-वीस मैल अंतरावर होता. सबलगडवर तंट्याचा मुक्काम होता.

एका भेटीत तंट्यानं गणपत सिंहला सांगितलं, ह्या वणवणीचा त्याला कंटाळा आला आहे. होळकर सरकारने त्याला माफ केल्यास, तो शरण जाण्यास तयार आहे.

गणपतसिंह पैशाचा लोभी होता. त्याने तंट्याचा विचार ऐकला. त्याच्या डोळ्यासमोर तंट्याला पकडण्यासाठी सरकारनं ठेवलेली मोठी रक्कम दिसू लागली.

तंट्या स्वत:च होळकर सरकारकडं शरण जाण्याची भाषा करीत होता. ह्याचा फायदा उठवण्याचा विचार गणपत करू लागला. यापूर्वीही तंट्याला कपटानं अडकावं, हा विचार त्याच्या मनात आला होता, परंतु त्याला तंट्याची भीती वाटत होती. कट फसला तर, तंट्याशी गाठ होती. या कारणानं त्यानं हिंमत केली नव्हती.

आता तंट्याच होळकरांकडं जाण्याची भाषा करू लागला होता. गणपतला याचा आनंद झाला.

''माझ्या ओळखीचे एक आहेत. त्यांच्या मार्फत होळकर सरकारकडं शब्द

टाकतो.'' गणपतनं तंट्याला आश्वासन दिलं.

आपले दाजी आपल्याला मदत करीत आहेत. असा विचार करून तंट्या सबलगड डोंगराकडं परतला.

बाणेर जवळ वार्ताला पोलीस ठाणे होते. हे गाव भिकनगाव तहसीलमध्ये येत होतं. वार्तालाला मनजित भगवंत नावाचे ठाणेदार होते. गणपतची त्यांच्याशी ओळख झाली होती. मनजित भगवंतने भिकनगाव तहसीलमधील काही भिल्लांना खाजगी गुप्तहेर म्हणून कामाला लावलं होतं. या भिल्लांनी तंट्याच्या हालचाली पोलिसांना कळवायच्या होत्या. ह्या गुप्तहेरांपैकी काहीजणांची गणपतशी ओळख झाली होती.

गणपत वार्तालाला आला. ठाणेदार मनजित भगवंतला भेटला, ''तंट्याला पकडण्यासाठी मी मदत करतो,'' गणपत म्हणाला, ''या कामापोटी मला व माझ्या सोबत्याला सरकारनं नोकरी द्यावी आणि बक्षीस द्यावं.''

गणपतने सांगितलं. तंट्या त्याच्या बायकोला बहीण मानतो. दरवर्षी तिच्याकडं राखीपौर्णिमेला राखी बांधायला येत असतो. इतर वेळीही तो बाणेरला येत असतो.

ठाणेदार मनजित भगवंतला हे ऐकून आनंद झाला. ते अशाच माणसाच्या शोधात होते. ज्या माणसाची तंट्याची ओळख आहे, तंट्याची भेट होत असते, तंट्याचा त्या माणसावर विश्वास आहे. गणपत स्वत:च्या पायानं मनजितकडं आला होता.

मनजितनं गणपतला आश्वासन दिलं. मी सरकारकडं तुला नोकरी देण्यासाठी शब्द टाकतो. तंट्याला पकडल्यास बक्षिसाची रक्कम तुलाच मिळेल. पण यात दगा फटका झाल्यास शिक्षा होईल, असंही बजावलं होतं.

गणपत बाणेरला परतला.

ठाणेदार मनजित भगवंतनी वरिष्ठांना इंदूरला पत्र पाठविलं. तंट्याला पकडण्याची संधी आहे. गणपत आणि त्याच्या साथीदारास नोकरीवर ठेवावं. असं केल्यास तो मदत करण्यास तयार आहे.

मधल्या काळात मेजर ईश्वरी प्रसादांनी तंट्या विरुद्धची मोहीम सोडून दिली होती. होळकर दरबारानं ईश्वरी प्रसादांना बोलावलं. ठाणेदार मनजित भगवंतचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवला. ईश्वरी प्रसादाची अगोदरची मोहीम फसली होती. त्यांना हा निरोप आशादायी वाटू लागला. पुन्हा मोहीम सुरू करण्यासाठी भोपाळला गव्हर्नर जनरलच्या एजंटांना पत्र लिहिले.

भुईफळचा मालगुजार गोविंद हिंमत पाटलांचा मुलगा होता. हिंमत पाटलांनी तंट्याला पकडून देण्यात पूर्वी भाग घेतला होता. पाटलाच्या मृत्यूनंतर गोविंद मालगुजारी झाला. तो खाजगी गुप्तहेरांशी संबंध ठेवीत होता.

हे सगळं तंट्याला कळत होतं. तंट्यानं गोविंदला निरोप पाठवला. इशारा देऊन पाहिला. त्याच्या वागण्यात फरक होत नव्हता. गोविंद तंट्याविरुद्ध काही मालगुजारांना एकत्र करू पाहत होता.

तंट्यानं पोखरला गजरीचं नाक कापलं. ही घटना घडल्यापासून तंट्या मनानं खचला होता. पश्चात्तापाच्या भावनेनं त्याला घेरलं होतं. अशात गोविंदच्या हालचाली कानावर आल्या होत्या. पोखरची घटना घडून एक महिना झाला नव्हता. महिना पूर्ण होण्यास दोन दिवस बाकी होते.

तंट्याच्या माणसानं गोविंद मालगुजाराबद्दल पुन्हा माहिती आणली. शेवटी तंट्याला राहवलं नाही. गोविंदला धडा शिकविण्यासाठी तो निघाला. बरोबर नऊ साथीदार घेतले.

पंचवीस नोव्हेंबर १८८७ चा दिवस होता. अंधार पडताच तंट्या भुईफळ वेशीपाशी आला. इथच त्याचा बहादूर साथीदार-बिजनियाला फाशी दिली होती. ह्या दुःखद आठवणीनं तंट्या गलबलला. बिजनिया जणू वाघ होता. सरकारला त्याची धडकी भरली होती. बिजनियाला धोक्यानं पकडलं. फाशीची शिक्षा सुनावली. शेवटी भुईफळ गावात या वेशीसमोर उघड्यावर फाशी दिली. ह्या सगळ्या आठवणींनी तंट्या व्याकूळ झाला.

तंट्याच्या आयुष्याची सगळी फरफट झाली होती. या मागं भुईफळच्या हिंमत पाटीलच कारणीभूत होते आणि आता त्यांचा मुलगा गोविंद तेच काम करू लागला होता.

रात्रीचा आठचा सुमार होता. हिवाळ्याचे दिवस होते. घरासमोर शेकोटी पेटलेली होती. शेकोटीभोवती काहीजण शेकत बसले होते. ह्यात गोविंद पाटीलही होते.

तीन माणसं शेकोटीजवळ आले. गोविंद पाटलाचं घर विचारलं. गोविंद पाटील म्हणाले, ''मीच आहे गोविंद'' तिघांपैकी एकानं अंधारात उभ्या असलेल्या साथीदारास आवाज दिला.

तंट्याच्या एका साथीदारानं गोविंदला पकडलं. ते गोविंदला मारू लागले. तंट्यानं आपल्या साथीदारास थांबविलं. तंट्या गोविंदजवळ आला. त्याला म्हणाला,

''गोविंद, बिजन्याला पकडल्याचं बक्षीस सरकारनं देलं. फुकट जेमीन देली.

त्ये बक्षिसाचं पैसं आनं जेमीनीचा पैका वापस दे. नाय तर तुजी धडगत नाय.''

''माझ्याजवळ एवढा रोकड पैसा नाही.'' गोविंद घाबरून म्हणाला. तंट्याबरोबरच्या साथीदारानं गोविंदला निर्दयीपणे मारायला सुरुवात केली. काहीजण गोविंदच्या घरात घुसले. त्याची आई, पत्नी, मुलं आणि त्याच्या पुतण्याला बाहेर खेचलं. त्यांच्या अंगावरचे दागिने काढावयास सांगितले. पेटीत जमिनीचे बाँडपेपर्स होते. गोविंद सावकारी करीत होता. गरिबांच्या जमिनी बाँडपेपर्सवर लिहून घेत होता. पेटीतले ते कागद बाहेर आणले. उघड्यावर त्याची होळी केली.

तंट्यानं काहीजणांना गोविंदच्या भावाकडं पाठविलं. त्याचं नाव लुंगी व रकरू होतं. ते बाजूलाच राहत होते. तंट्याच्या साथीदारांनी लुंगी आणि रकरूला झोडपलं. त्यांच्या घरातले बाँडपेपर्स बाहेर काढले. उघड्यावर पेटवून दिले.

गोविंदकडून ३११ रुपये आणि लुंगीकडून १३२ रुपयांचा दंड वसूल केला.

गोविंद मालगुजारास दम देऊन तंट्या बाहेर पडला.

भुईफळहून छेगाँव पोलिस स्टेशन तीन मैलांवर होतं. तंट्या निघून गेल्यानंतर कोतवालानं पोलिसांना खबर दिली. पोलीस आले. अंधारात मागं काढणं शक्य नव्हतं.

सकाळी काही मागं काढणारे बोलावले. तंट्या आणि त्याचे साथीदार पश्चिमेकडील टेकडीकडं गेल्याचं वाटाड्यांनी सांगितलं. पुढचा भाग डोंगराळ होता. पावलांचे ठसे व इतर काही माग सापडला नाही.

कर्नल हॅमंड खांडव्याचे पोलीस अधीक्षक होते. तंट्यानं भुईफळवर हमला केला, त्या दिवशी ते जिल्ह्यात दूरच्या टोकाला दौऱ्यावर होते. खांडवा मुख्यालयाचे इन्स्पेक्टर पसले त्याच दिवशी पहाटे ४ वा. १५ मिनिटांनी भुईफळला पोहोचले होते. उजेडण्यापर्यंत ते काही करू शकले नाहीत. तो पर्यंत तंट्या आणि त्याचे साथीदार होळकर मुलखात निघून गेले होते.

## तंट्याची अटक

गणपतसिंह राजपूतला सरकारनं नोकरी दिली. त्याच्या काही साथीदारांनाही गुप्तहेर नेमलं. तंट्याची हालचाल कळवायचं काम त्यांच्यावर सोपविण्यात आलं.

गणपतसिंह मनजित भगवंत यांना भेटला. त्याचे साथीदार कामाला लागले. तंट्याचा मुक्काम यावेळी सबलगडवर होता. तो गणपतच्या निरोपाची वाट पाहत होता.

''मी साहेबांशी बोललो. ते इंदूरला सरकारकडं बोलणार आहेत. सरकार तुझं काम करतील.'' गणपतसिंहनं तंट्याला सांगितलं. हे ऐकून त्याला बरं वाटलं. आपला दाजी आपल्याला मदत करीत आहे. सरकार आपली कैफियत मान्य करतील, अशी आशा वाटू लागली.

मेजर ईश्वरी प्रसाद ज्या गोष्टीची वाट पाहत होते, ती संधी चालून आली होती. गणपतसिंह राजपूतसारखा मासा गळाला लागला होता. तरीही ते साशंक होते. तंट्या कावेबाज होता. शरण येतो असा निरोप पाठविण्याची त्याची खेळी असू शकते. आतापर्यंत अनेकदा त्यानं पोलिसांना हुलकावण्या दिल्या होत्या. गणपतसिंहचा निरोप हा तंट्याची बदमाशी असू शकते.

खात्री करण्यासाठी ईश्वरी प्रसाद खरगोनला आले. गणपतसिंहला खरगोनला बोलावून घेतलं. गणपतसिंह पोलिसांना मदत करू इच्छितो, याची खात्री करून घेतली.

तंट्या अधून मधून बाणेरला येत असतो. तंट्या येण्यापूर्वी कधी कधी निरोप पाठवायचा. कधी अचानक यायचा. तंट्या आला की गणपतसिंहची माणसं पोलिसांना खबर देतील. अशी योजना ठरली.

मेजर ईश्वरी प्रसादांनी पुन्हा निवडक फौजेची जमवाजमव केली. १५ मे १९८९ ला ते खरगोनला आले. खरगोनच्या छावणीत गणपतसिंह खबर देणार होता.

वीस-बावीस दिवस गणपतसिंहकडून काहीच खबर आली नाही. ईश्वरी प्रसाद अस्वस्थ झाले. त्यांनी गणपतसिंहला ९ जूनला खरगोनला बोलावून घेतलं.

तंट्याची भेट झाली. गणपतसिंहने माहिती दिली. तंट्याचा मुक्काम जवळच्या सातपुडा डोंगरात आहे. तो सरकारच्या निरोपाची वाट पाहत आहे.

ईश्वरी प्रसादांनी गणपतला बजावलं. गद्दारी केली तर जबर शिक्षा केली जाईल, असाही इशारा केला.

गणपतसिंह परत बाणेरला आला. तंट्या येण्याची वाट पाहू लागला. गणपतचे साथीदार तंट्याच्या मागावर होते. खबऱ्यानं माहिती दिली. तंट्या सबलगडवर परत आला होता.

गणपतसिंहाने २९ जूनला ईश्वरी प्रसादची भेट घेतली. गणपतच्या गुप्तहेरांनी माहिती आणली होती. तंट्याच्या मुक्कामाचं ठिकाण त्यांना कळलं होतं.

बाणेरहून वीसेक मैलावर आग्नेय दिशेला सबलगड होता. सातपुड्यातला एका रांगेतला एक भाग होता. तंट्या तिथं थांबला होता.

मेजर ईश्वरी प्रसादांच्या आशा पल्लवित झाल्या. त्यांनी फौज बरोबर घेतली. सबलगडजवळ कट्टीबोरी गाव होतं. ईश्वरी प्रसाद या गावात थांबले. बाकी फौज सबलगडच्या पायथ्याशी आली.

३० जूनची सकाळ होती. आठ वाजले होते. सबलगडच्या पायथ्याशी नदी होती. पलीकडं ईश्वरी प्रसादाची फौज थांबली होती. समोर सबलगडच्या माथ्यावर तंट्या उभा होता.

पायथ्याशी भगवंतसिंग आणि त्याची फौज होती.

तंट्यानं ओरडून फौजेला सांगितलं.

''ईश्वरी प्रसादला सांगा मी त्येले भेटन.. एक-दोन दिसात. नायतर दोन मईन्यांनी.''

भगवंतसिंग सोबत भोपाल बटालियनचे बक्षीसिंग व बजरंग सिंग होते. तंट्या समोर दिसत होता. बंदुकीची गोळी त्याच्यापर्यंत पोहोचू शकणार नव्हती. शिकार टप्प्यात होती पण हाती येत नव्हती.

बक्षीसिंग आणि बजरंगसिंग फौजेसह सबलगडावर चढले. गडावर एक झोपडी होती. झोपडीच्या दाराशी ताजी फुलं ठेवलेली होती. तंट्या मात्र निसटला होता.

दहा वर्षात पहिल्यांदा तंट्या दूरवरून दिसला होता. परंतु हातची संधी निघून गेली होती. फौज हात चोळीत खरगोनला परतली. मेजर ईश्वरी प्रसाद चरफडत पुन्हा वाट पाहू लागले.

ईश्वरी प्रसादला गणपतसिंगचा संशय येत होता. गणपत पोलिसांना माहिती देत होता. तसेच तो तंट्यालाही पोलिसाच्या हालचाली कळवीत असावा.

ईश्वरी प्रसादानं गणपतला निर्वाणीचा इशारा दिला. गणपतने कबूल केलं. त्यानं तंट्याला पोलिसांबद्दल सांगितलं होतं. असं सांगितल्यामुळं तंट्याला गणपतबद्दल संशय येणार नव्हता. यापुढं सरकारला मदत करण्याचं त्यानं आश्वासन दिलं.

पुन्हा पाऊस सुरू झाला. नदीनाले भरून वाहू लागले. गणपतला निरोप आला होता. राखी पौर्णिमेला तंट्या बाणेरला गणपतच्या घरी येत आहे. गणपतच्या बायकोकडून तंट्या राखी बांधून घेत असे.

सात ऑगस्टला गणपतसिंगने ईश्वरी प्रसादला ही माहिती दिली. दहा ऑगस्टला राखी पौर्णिमा आहे. या दिवशी तंट्या येणार आहे.

मेजर ईश्वरी प्रसाद तयारीला लागले. नऊ ऑगस्टला भोपाळ बटालियनचे दहा शिपाई, मध्य भारत घोडदळाचे पाच तगड्या जवानांची निवड केली. ह्यात दफादार बक्षीसिंग, नायक बजरंगसिंग आणि लढवय्या नबीबक्स होते.

खरगोनच्या दक्षिणेला जामली नावाचं गाव आहे. नऊ ऑगस्टला रात्री तुकडी

जामलीला थांबली. दहा ऑगस्टला पहाटे लपत छपत बाणेरला पोहोचली.

गणपतच्या घराशेजारी एक झोपडी होती. झोपडीत फौजेला लपण्याची व्यवस्था केली.

गेले काही दिवस पाऊस कोसळत होता. मुसळधार पावसानं सगळे हैराण झाले होते. गावाशेजारी उंद्री नदी दुथडी भरून वाहत होती. नदी पलीकडं दूरवर सबलगड होता.

राखी पौर्णिमेचा दिवस असाच गेला. तंट्या त्या दिवशी आलाच नाही. फौजेतले अधिकारी आणि शिपाई २४ तास अन्न-पाण्याशिवाय एका जागी बसून होते. वाट पाहून पाहून त्यांची अधिरता वाढली होती. तंट्यानं नेहमीसारखा आजही गुंगारा दिला आहे. फौजेतल्या अधिकाऱ्यांना असं वाटू लागलं.

दुसरा दिवस उजेडला. गणपतही मनातून घाबरला होता. तंट्या आला नाही तर ईश्वरी प्रसाद त्याला शिक्षा केल्याशिवाय राहणार नाहीत.

अकरा ऑगस्टचा दिवस मावळला. पाऊस कमी होत नव्हता. रात्रीचे दहा वाजले होते. दुथडी नदी पोहून तंट्या आला. त्याच्याबरोबर हत्यारबंद सात साथीदारही होते.

गणपतच्या दारी तंट्या उभा होता. क्षणभर गणपतचा त्याच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. त्याला वाटू लागलं होतं, तंट्या आता येणार नाही. अशा वेळी तंट्या आला होता.

''गणपतदाजी, माज्या कामाचं काय झालं?'' तंट्यानं गणपतला विचारलं.

''तुझं काम झालं आहे. होळकर महाराज माफी द्यायला तयार आहेत. परंतु ती कागदपत्रं अजून ईश्वरी प्रसादाकडून आली नाहीत.'' गणपतने सारवासारव केली.

''म्या येतु म्हून तुमाले शबूद देला. ताईकडून राकी बांदायची व्हती. आन् सरकारचं कामाचं बगायचं व्हतं. बरं ताई कुटं हाय?''

गणपतची बायको घरात नव्हती.

ज्या कामासाठी तंट्या आला होता, ती दोन्ही कामं झाली नव्हती. तो मनाने कष्टी झाला आणि गावातल्या वाण्याकडं निघून गेला. वाण्याकडून त्याला काही सामान घ्यायचं होतं.

मधल्या वेळात गणपतनं शेजारी लपलेल्या फौजेला तंट्या आल्याची खबर दिली. फौजेपैकी नाईक बजरंगसिंग, बक्षीसिंग, पंचमपरसाद, मीरदादा खान आणि नंदसिंगला आपल्या घरात लपवलं.

तंट्या वाण्याकडून परत येण्याची गणपत वाट पाहू लागला. तंट्यानं

वाण्याकडून सामान घेतलं. सामान घेऊन पाच साथीदार परस्पर गेले. रघ्या कोरकू आणि नानकू या दोन साथीदारांसोबत तंट्या गणपतकडं परत आला.

गणपत वाट पाहत होता. गणपतच्या उंबरठ्यावर तंट्या बसला. चिलीम पेटविली.

''दाजी, बानेरचा पटवारी जवारी देनार व्हता. त्येनं आजून ते काम केलं नही.'' तंट्यानं गणपतकडं गावच्या पटवाऱ्याची तक्रार केली.

''रघू आणि नानकूला पाठवू त्याच्या घराकडं.'' गणपत चटकन म्हणाला.

रघूला पटवाऱ्याकडं पाठवलं. रघूसोबत गणपतचा इकी नावाचा माणूस दिला. पटवाऱ्यास आठवण देण्याचं काम रघू करणार होता.

तंट्या दारात बसून शांतपणे चिलीम ओढू लागला. तो राखी बांधण्यासाठी आला होता. ती बहीणही घरी नव्हती. सरकारकडचं कामंही झालं नव्हतं. हा विचार तंट्या करीत होता. बाजूला गणपत अस्वस्थपणे उभा होता.

समोरून संभ्या भिल्ल हा गणपतचा साथीदार येत होता. त्याला तंट्या बसलेला दिसला. संभ्यानं उतावीळपणे तंट्यावर झडप घातली. बाजूला तंट्याचा साथीदार नानकू उभा होता. त्यानं संभ्यावर गोळी झाडली. आवाज ऐकून गणपतच्या घरातले पाचही शिपाई बाहेर आले.

तंट्या आणि नानकूला जखडलं. बाजूच्या झोपडीतले शिपाईही बाहेर आले. त्यांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडल्या. पटवाऱ्याकडं गेलेला रघू परत येत होता. गणपतच्या घराजवळची गडबड बघून रघूनं इकीवर गोळी झाडली. परंतु वार चुकला. फौज बघून रघू पळाला. गावाबाहेर तंट्याचे साथीदार थांबले होते. त्यांनी गोळीबार केला; परंतु फौजेपुढं त्यांचा निभाव लागला नाही. रघू आणि बाकी साथीदार पळाले.

शरीरानं आणि मनानं थकलेला तंट्या गणपतकडं बघत होता.

# तंट्याला इंदूरला आणलं

तंट्याला पकडलं त्याच रात्री खरगोनला आणलं. गणपतसिंह राजपूतनं बेइमानी केली. राखी पौर्णिमेसाठी आलेल्या तंट्याला धोक्यानं अटक करवली होती.

तंट्या शरीरानं थकला होता. मनातली उमेद संपत आली होती. अशा वेळी होळकर सरकारनं त्याला माफ करावं, उर्वरित आयुष्य सरकारच्या पदरी चाकरी करावी, असं त्याला वाटत होतं.

गणपतसिंह ईश्वरी प्रसाद मार्फत सरकारकडं प्रयत्न करीत आहे, असं तंट्याला सांगितलं होतं. अशा द्विधा अवस्थेत गणपतने धोका दिला होता.

पकडला गेला हा तंट्याच आहे, याबद्दल ईश्वरी प्रसादांना खात्री नव्हती. कारण यापूर्वी दोनदा पोलिसांनी एकाला पकडलं होतं. ज्याला पकडलं तो मी तंट्या आहे, असं सांगत होता. नंतर कळलं की तो तंट्या नव्हता. एक त्याचा साथीदार दौल्या होता. दुसऱ्या वेळी दुसराच तंट्याचं नाव घेत होता.

यावेळी पकडला तो तंट्याच आहे, याची खात्री होईपर्यंत ईश्वरी प्रसादांनी गुप्तता पाळली. तंट्या शिवना गावी अनेक वर्षं राहिला होता. शिवबाचे रहिवासी त्याला ओळखू शकतात.

ईश्वरी प्रसादांनी पोलिसांना शिवनास पाठविले. गावचे पटवारी आणि तंट्याच्या साडूला खरगोनला घेऊन आले.

१६ ऑगस्टला न्यायाधीशासमोर तंट्याला उभे केले. त्याच्या नातेवाईकांना कोर्टात आणलं. शिवनाचे पटवारी आले. तंट्याची ओळख परेड झाली. सर्वांनी सांगितलं, हा तंट्याच आहे.

ईश्वरी प्रसादांची खात्री पटली. अटक केलेला तंट्याच होता. तंट्याच्या अटकेची बातमी इंदोर आणि खांडव्याला पोहोचली. तंट्याला कुठं न्यायचं हा ईश्वरी प्रसादासमोर प्रश्न असावा. ते वरिष्ठांच्या आदेशाची वाट पाहू लागले.

१९ ऑगस्टला तंट्याला घेऊन फौज निघाली. सनावद मार्गे इंदूरला घेऊन आले. इंदूरच्या दरबार जेलमध्ये तंट्याला ठेवले. दुसऱ्या सकाळी महाराज शिवाजीराव होळकरांसमोर त्याला उभे करण्यात आले.

महाराज शिवाजीराव आणि तंट्याची भेट झाली. महाराजांनी तंट्याला काही प्रश्न विचारले. तंट्या महाराजांना काय म्हणाला, ह्याचा पुरावा (रेकॉर्ड) उपलब्ध नाही. तंट्याला महाराजांबद्दल आदर होता. महाराज आपला राजा आहे. ब्रिटिश परके आहेत, हा फरक तंट्याला जाणवत होता. त्यामुळे तंट्यानं अकरा वर्ष ब्रिटिशांच्या मुलखात हल्ले केले. मालगुजार सावकारांना लुटलं. पोलिसांना शिक्षा केली.

होळकर इलाख्यात त्यानं त्रास दिला नाही. लूटमार केली नाही. त्याला वाटायचं, होळकर सरकारची त्याला सहानुभूती असावी. या कारणानं होळकर पोलीस त्याला अडवीत नव्हते.

कदाचित तंट्या महाराज शिवाजीरावांना म्हणाला असेल, मी तुम्हाला शरण येतो. मला माफ करावं. आपल्या चरणी सेवा करण्याची संधी द्यावी.

यावर महाराज काय म्हणाले असतील? त्यांना तंट्याबद्दल सहानुभूती वाटत असेलही; परंतु ब्रिटिश सरकारचा तंट्यावर राग होता. तंट्यानं गेली अकरा वर्षं ब्रिटिशांची अब्रू धुळीस मिळवली होती. अशा गुन्हेगारास ते कसे सोडतील?

महाराजा होळकरांसमोरही मोठा प्रश्न निर्माण झाला होता.

गव्हर्नर जनरलांचे फर्स्ट असिस्टंट ए. टक्कर जातीनं इंदूरला हजर झाले होते. मेजर ईश्वरी प्रसादानं गव्हर्नर जनरलांच्या आदेशाप्रमाणं तंट्या विरुद्धची मोहीम हाती घेतली होती आणि त्यांना या कामात विश्वासघाताने का होईना यश आलं होतं.

एक दिवसं तंट्या दरबार जेलमध्ये होता. ब्रिटिश न्यायाधीशासमोर त्याची ओळख परेड आणि जबाब नोंदवायचा होता. २० ऑगस्टला तंट्याला फर्स्ट मॅजिस्ट्रेट समोर आणलं गेलं. पंचासमोर आरोपींची तपासणी सुरू झाली.

आरोपी खांडवा जेलमधून पळाला होता. ऑगस्ट १८८३ ला सेंट्रल प्रॉव्हिन्सच्या प्रशासनानं त्याचं वर्णन प्रकाशित केलं होतं. त्या आधारे आरोपीची काटेकोर तपासणी केली.

मॅजिस्ट्रेटनी आरोपीचं वर्णन पुढील प्रकारे केलं.

आरोपी आणि त्याच्या संबंधीचं शारीरिक वर्णन जुळणारं आहे. एक-दोन बाबीत मात्र बरोबर नाहीत. त्यात थोडा फरक आहे.

आरोपीचा रंग, आकार, चेहऱ्यावरील खुणा जुळतात. उंची मात्र बरोबर नाही. आरोपीची उंची पाच फूट साडेपाच इंच आहे. पूर्वीच्या वर्णनात पाच फूट साडेतीन इंच आहे. गाल आणि हनुवटीच्या वर्णनातही फरक आहे. मिशा तपकिरी नसून कुरळ्या आहेत. बुबुळ निळे नसून तपकिरी रंगाचे आहेत. भुवया, डोळ्यांच्या पापण्या, तोंड ओठ, दात, कान, मान जुळणारे आहेत. छाती ३२ इंची बरोबर

आहे. पाठ, पोटाचं वर्णनही जुळतं. छाती, उजवा पाय आणि गुडघ्यावरची खूण बरोबर आहे. छातीवर मध्यभागी ठळक दिसणारा तीळ आहे. मूळ वर्णनात याची नोंद नाही. चालताना आरोपीच्या पायांचा आवाज ऐकू येत नाही.

जेलमध्ये नोंद केलेल्या वर्णनाप्रमाणे हे आहे. उंची आणि डोळ्यांचा रंग ह्या दोन बाबीत फरक जाणवतो.

आरोपीचा जबाब, इतर साक्षीदारांचे जबाब बघता माझी खात्री झाली आहे. हा आरोपी म्हणजे कुविख्यात तंट्याच आहे. आजच्या जबाबात आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली आहे. तंट्या हा ब्रिटिशांचा रयत (प्रजाजन) आहे. तो ब्रिटिश मुलखात जन्मला. वयाची ३०-३५ वर्षे तेथेच राहिला. तो ब्रिटिश जेलमधूनच पळाला. त्याचे सगळे गुन्हे ब्रिटिश हद्दीतच घडलेले आहेत. त्यामुळेच ब्रिटिश कोर्टासमोर त्याचा खटला चालविला जावा. सेंट्रल प्रॉव्हिन्सच्या प्रशासनाकडून तशी मागणी आली आहे.

फर्स्ट मॅजिस्ट्रेट एजंट टू दि गव्हर्नर जनरल यांनी तंट्याची ओळख परेड पूर्ण केली. होळकर दरबारचे श्री. कृष्णराव मुळे, खांडव्याचे पोलीस अधीक्षक मि. स्किप्टन आणि मेजर ईश्वरी प्रसाद हे याप्रसंगी हजर होते.

आरोपी तंट्याचा न्यायाधीशासमोर जबाब नोंदविला गेला. या जबाबात त्यानं आपलं पूर्वायुष्य कथन केलं. ते पोलिसांनी जमविलेल्या त्याच्या माहितीशी जुळणारं होतं. महाराजा होळकरांना शरण जावं, असं त्याला वाटत होतं, हे त्यानं कबूल केलं.

मी सावकारांना लुटलं. मालगुजारी शिक्षा केली. लक्ष्मणचं नाक कापलं. तो मला पकडण्याचा प्रयत्न करीत होता.

राजाराम नावाचे न्यायाधीश होते. तंट्यानं त्यांना पैसे दिले होते. राजारामनं तंट्या आणि त्याच्या साथीदारास मदत केली होती, असा पोलिसांचा आरोप होता. ब्रिटिशांनी न्यायाधीश राजारामला पाच हजार रुपयाचा दंड आणि सात वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली होती.

या राजारामबद्दल तंट्याला प्रश्न विचारला गेला. तंट्यानं जबाब दिला. तो राजारामला ओळखत नव्हता. इथं तंट्याला हे कबूल करायचं नसावं.

यानंतर इतरांच्या जबाब नोंदविल्या गेल्या. गणपतसिंहची जबाब झाला. मेजर ईश्वरी प्रसादांची साक्ष नोंदविली गेली.

२० ऑगस्टचा तपास संपला. तंट्याला गव्हर्नर जनरलच्या एजंटाच्या ताब्यात देण्यात आले. रेसिडेन्सी जेलमध्ये त्याला डांबण्यात आले. जेलभोवती फौजेचा जादा पहारा बसविला गेला.

## यशोदेची साक्ष

बावीस ऑगस्टला तंट्याला पुन्हा कोर्टात हजर केलं.

पोखरहून यशोदेला पोलीस घेऊन आले होते. तंट्याच्या खटल्यात यशोदेचा जबाब पोलिसांना महत्त्वाचा वाटत होता. यशोदा-तंट्या संबंधाची पोलिसांना अगोदर माहिती होतीच.

यशोदेचा जबाब घेतला जाऊ लागला.

मी आरोपीला ओळखते. तो तंट्याच आहे. मी त्याला बारा वर्षात पाहिलं नाही. भेटले नाही. त्यापूर्वी तो माझ्या गावात आठ वर्षं राहात होता. माझं घर आणि त्याचं घर एकाच गावात होतं. माझ्या गावच्या भिकीशी त्याचं लग्न झालं होतं. माझी भिकीशी ओळख आहे. आम्हा दोघींचा जन्म पोखरचा आहे. तिचा बाप पोखरलाच राहात होता, तो तडवी होता. मी त्याच्या घरी जात असे. ते आमच्या घरी येत होते.

त्या काळात तो जवान (तरुण) होता. चांगला होता. (लाराआच्छा). माझी खात्री आहे. हा तंट्याच आहे.

मध्येच न्यायाधीशांनी तंट्याला विचारलं, 'तिनं जबाब दिला. यावर तुझं काय म्हणणं आहे.'

तंट्या म्हणाला, 'तिचा जबाब बरुबर हाय, माजं पोखरच्या भिकीशी लगीन झालं हाय. ती सांगत्ये तसं, माजं त्येंच्या घरी येनं जानं व्हतं.'

यशोदेनं पुढं सांगितलं,

खांडव्याहून पोखर पाच कोसावर आहे. माझी तंट्याशी विशेष मैत्री (No special friendship with accussed) नव्हती.

न्यायाधीशांनी जबाबाच्या शेवटी शेरा मारला.

ती तंट्याची घरधनीन (Mistress) म्हणून सर्वांना माहीत आहे.

यशोदेचा जबाब संपला. जबाबाच्या सुरुवातीस तिचं वय चाळीस असल्याची नोंद आहे. तंट्याला पकडलं हे तिला कळलं, त्यावेळी तिची मानसिक अवस्था कशी झाली असेल? यशोदेला तंट्याबद्दल सहानुभूती होती. हे तिच्या जबाबावरून स्पष्ट दिसतं. तो जेव्हा तरुण होता, तेव्हा कोणीही प्रेम करावं असा आच्छा लारा होता, असं तिनं कबूल केलं होतं. यावेळी अधिकाऱ्यांनी त्यांच्या संबंधाबद्दल तिला छेडलं होतं. यावर तिनं स्पष्ट सांगितलं, आमचे तसे संबंध नव्हते. तंट्या बारा वर्षात भेटला नाही, असं तिनं जबाबात खोटं सांगितलं. तंट्या यशोदा भेटत होते. तंट्या यशोदेला मदत करत होता, हे जगजाहीर होतं. पोलिसांनी हे नोंदवून ठेवलेलं होतं.

यशोदेला माहीत होतं. तंट्याला आता पोलीस सोडत नाहीत. अशाप्रसंगी त्यांच्या संबंधाची कबुली ती कशी देणार? या जबाबात तिनं तंट्याबद्दल कुठेही अपशब्द वापरला नाही. आमची ओळख नाही, अशीही पळवाट शोधली नाही. धीटपणे आणि धीरानं तिने जबाब दिला.

पोखरच्या गजरीचं तंट्यानं नाक कापलं होतं. ती यशोदेला छळते, म्हणून तिलाही शिक्षा केली होती.

पोलीस गजरीला इंदूरला घेऊन आले. गजरीचा जबाब नोंदविला.

साठ वर्षांच्या ह्या स्त्रीने सांगितलं.

मी आरोपीला ओळखते. तो तंट्या भिल्ल आहे. तो पोखरला राहात होता. बारा वर्षापूर्वी त्यानं पोखर सोडलं. तो पोखरमध्ये सुमारे २० वर्षं राहिला. भिकीशी त्याचं लग्न झालं. त्यांना दोन-तीन मुलं झालीत. मी त्यांच्या लग्नाला हजर नव्हते. पोखर सोडल्यानंतर तो अधूनमधून पोखरला येत होता.

सुमारे दोन वर्षांपूर्वी सायंकाळी तो माझ्या घरी आला. घरातलं सामान लुटलं. मला दूर जंगलात घेऊन गेला. त्यानं मला मारहाण केली. सर्व प्रकारचा छळ केला. दोन-चार माणसांनी मला पकडलं होतं, आणि त्यानंतर माझं नाक कापलं. तंट्याजवळ चाकू होता. प्रत्यक्ष माझं नाक कोणी कापलं हे सांगता येत नाही. माझ्या सोबत माझ्या मुलीलाही पकडून आणलं होतं.

आरोपीला गजरीच्या साक्षीबद्दल विचारलं. तो म्हणाला, ती सांगते ते बरोबर आहे. तिचं नाक कापलं होतं.

गजरीचा जबाब संपला होता.

तंट्याला अकरा ऑगस्टला अटक झाली होती. सोळा ऑगस्टपर्यंत खरगोनमध्ये तो कस्टडीत होता. खरगोन हा होळकर इलाख्याचा भाग होता. त्याचा खटला खरगोनला चालवावा की खांडवा येथे चालवावा, ह्याबद्दल हा सरकारचा निर्णय होत नव्हता.

शेवटी त्याला एकोणीस तारखेला इंदूरला आणलं. तंट्याच्या अटकेची खबर चीफ कमिशनरांना कळविली गेली होती. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस खांडव्याला आले.

तंट्याला खांडव्याला आणावे. तिथल्या कोर्टात गुन्हा दाखल करावा, असा

पोलिसांचा विचार होता. चीफ कमिशनरांच्या सेक्रेटरींनी २६ तारखेला एक टिपणी तयार केली.

तंट्याची कायदेशीर अटक, त्याला गुन्हेगारीची कोणती कलमे लावायची, याची चर्चा टिप्पणीत होती. चीफ कमिशनरांचे सेक्रेटरी एल. के. लॉरी होते. त्यांनी मत मांडलं. आरोपीला जबलपूरच्या न्यायाधीशांसमोर उभे करावे. क्रिमिनल प्रोसिजर कोड-सेक्शन ३४४ खाली त्याची पोलीस कोठडी घ्यावी आणि जबलपूर जेलमध्ये आरोपीला ठेवावं.

सेक्रेटरीच्या टिपणीवर चीफ कमिशनरांनी आदेश लिहिला.

सरकारी फौजेनं तंट्याला पकडलं आहे आणि सरकारच्या ताब्यात दिले. तपास आणि कोर्टापुढील कामकाजाच्या काळात आरोपीला सुरक्षित कैदेत ठेवावे. आरोपीवर निमाडमधये खटला चालविल्यास, तो न्याय्य रीतीने होईल, असं मला वाटत नाही. म्हणून आरोपीला जबलपूरला अटक झाली असं दाखवून तिथंच खटला चालवावा. निमाडच्या पोलीस अधीक्षकांनी आरोपी विरुद्धचे पुरावे आणि साक्षीदार कोर्टासमोर आणण्यास मदत करावी. आरोपीला जबलपूरच्या जेलमध्ये ठेवावे. तेथून तो सुटून जाण्याची संधी मिळणार नाही.

इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस कर्नल हॅमंड खांडव्याला थांबले होते. चीफ कमिशनरांच्या पुढील आदेशाची ते वाटच पाहात होते. चीफ कमिशनरांच्या सेक्रेटरीनं २६ ऑगस्टला खांडव्याला तार केली. तारेत तंट्याबद्दल स्पष्ट आदेश देण्यात आले होते.

चीफ कमिशनरांचा आदेश असा आहे, सेक्शन ५४१ कलमाप्रमाणे तंट्याला सुरक्षिततेसाठी जबलपूर जेलमध्ये ठेवावे. त्यानंतर चोवीस तासाच्या आत दंडाधिकाऱ्यांसमोर उभे करावे. कलम ३४४ खाली अधिक चौकशीसाठी कोठडीत ठेवण्याचा आदेश घ्यावा. तंट्याची अटक जबलपूरलाच दाखवावी. सविस्तर पत्र पाठवीत आहोत. इंदूरला आरोपी तुमच्या ताब्यात मिळताच तार करावी.

कर्नल हॅमंडला वरील आदेशाची तार मिळाली.

२७ ऑगस्टला दुपारनंतर त्यांनी खांडवा सोडले. बरोबर पोलिसांचा ताफा घेतला. इंदूरला दाखल झाले. २८ ऑगस्टला सकाळी तंट्याला ताब्यात घेतलं. खांडवा मार्गे रेल्वेनं जबलपूरला निघाले.

तंट्याला अटक झाली. ही बातमी सर्वत्र पसरली होती. बातमीनं सरकार दरबारी आनंदाचं वातावरण निर्माण झालं होतं. आम जनतेला मात्र तंट्या पकडला जायला नको होता, असं वाटत होतं.

प्रत्येक रेल्वे स्टेशनवर जनसमुदाय थांबलेला होता. ह्यात आदिवासी होते, शेतकरी होते, तरुण मुलं होती. गाडी प्रत्येक रेल्वे स्टेशनवर थांबत होती. निमाडच्या वीराला बघण्यासाठी प्रचंड गर्दी होत होती. या बहादुराला पाहण्यासाठी सगळे धडपडत होते. त्याच्या नावानं ओरडत होते.

गाडी जबलपूर रेल्वे स्टेशनात आली. रेल्वे स्टेशन भोवती, प्लॅटफॉर्मवर जनसागर लोटला होता. आरोपीला डब्यातून बाहेर काढणं अवघड झालं. पोलीस आणि फौजेला लोकांना कसं आवरावं, हा प्रश्न निर्माण झाला. पोलीस बळाचाही वापर करू शकत नव्हते. असं काही केलं असतं तर परिस्थिती हाताबाहेर गेली असती.

आपल्या नायकाला बघण्यासाठी गर्दीतला प्रत्येकजण धडपडत होता. ह्यात भिल्ल होते, कोरकू होते, शेतकरी होते. या आदिवासींकडं धनुष्य-बाणासारखी त्यांची शस्त्र होती.

त्यांच्या स्वप्नातल्या बहादुराचं दर्शन घेण्यासाठी ते आतूर झाले होते.

# जबलपूर जेलमध्ये तंट्या

इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस कर्नल हॅमंड तंट्याला जबलपूरला घेऊन आले. तो २८ ऑगस्ट १८८९ चा दिवस होता. जबलपूरच्या सेंट्रल जेलमध्ये आरोपीला डांबलं. दुसऱ्या दिवशी दंडाधिकाऱ्यांसमोर उभं केलं. पंधरा दिवसांची कस्टडी मिळाली.

कॅप्टन हॅमिल्टन यावेळी जबलपूरचे पोलीस अधीक्षक होते. तंट्या विरुद्धच्या खटल्याचं काम त्यांच्यावर सोपविण्यात आलं. सरकारतर्फे प्रासिक्यूटर म्हणून ते काम पाहणार होते.

कॅप्टन हॅमिल्टन काही वर्षांपूर्वी नर्मदा विभागात तंट्याविरुद्धच्या कारवाईचे प्रमुख होते. तंट्याच्या गुन्ह्याबद्दल त्यांना माहिती होती.

तंट्याला जबलपूरला अटक केली, असं समजून जबलपूरलाच खटला चालवावा, असे चीफ कमिशनरांचे आदेश आले होते.

स्किप्टन खांडव्याला पोलीस अधीक्षक होते. तंट्याचे महत्त्वाचे गुन्हे खांडवा जिल्ह्यात घडलेले होते. ती माहिती सादर करण्याचे काम स्किप्टनवर सोपविलं गेलं. तसेच आरोपी विरुद्धचे साक्षीदार कोर्टात वेळीच उभे करणे, हे कामंही त्यांच्याकडं दिलं.

सरकारने हा खटला चालविण्यासाठी निष्णात वकील बॅरिस्टर एच. जे. स्टेऑनची निवड केली. ते एक नामांकित विधिज्ञ होते.

तंट्याला जबलपूरला डांबलं आणि नंतर कर्नल हॅमंडला सुटल्यासारखं वाटू लागलं. इंदूर ते जबलपूरच्या प्रवासात कडेकोट बंदोबस्तात तंट्याला घेऊन ते आले होते.

प्रवासात त्यांची तंट्याशी बातचीत झाली होती. यात तंट्यानं आपल्या पूर्वायुष्यातल्या काही घटना सांगितल्या. त्या पोलीस रिपोर्टशी जुळणाऱ्या होत्या.

जबलपूर-खांडव्याच्या पोलीस अधीक्षकांना कामाला लावून कर्नल हॅमंड नागपूरला परतले. २६ ऑगस्ट ते नागपूरला परतेपर्यंतच्या घटनांचे सविस्तर पत्र चीफ

कमिशनरांच्या सेक्रेटरींसाठी तयार केलं. ४ सप्टेंबरला हे पत्र सेक्रेटरींना सादर केलं.

तंट्या खटल्याचे पोलीस प्रॉसिक्यूटर हॅमिल्टन कामाला लागले. त्यांनी बॅरिस्टर स्टेऑनला पत्र लिहिलं. तंट्या विरुद्ध जबलपूर कोर्टात गुन्हा दाखल करण्यासाठी कायदेशीर सल्ला विचारला.

बॅरिस्टर एच. जे. स्टेऑन यांनी १४ सप्टेंबरला हॅमिल्टन यांना सविस्तर पत्र लिहिलं. पत्रात तंट्याची अटक, त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करणे या मुद्यांवर त्यांचं कायदेशीर मत कळविलं.

त्यांच्या पत्रातील काही महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे होते.

जबलपूरच्या दंडाधिकाऱ्यांसमोर तंट्याचा खटला चालवावा, याबद्दल त्यांना कायदेशीर अडचण वाटत होती.

तंट्याला होळकर मुलखात अटक झाली होती. होळकर सरकारनं त्याला पकडलं आणि नंतर सेंट्रल प्राव्हिन्सच्या हवाली केलं. कर्नल हॅमंडनं महूला त्याचा ताबा घेतला. खांडवा मार्गे जबलपूरला आणलं होतं.

सरकारनं जबलपूरच्या दंडाधिकाऱ्यांना तंट्याचा खटला चालविण्याची सूचना केली.

क्रिमिनल प्रोसिजर कोडप्रमाणे, गुन्हेगारानं ज्या ठिकाणी गुन्हा केला, त्या ठिकाणी त्यावर खटला चालवावा, असे कायद्यात आहे. तंट्यानं खांडव्याला गुन्हे केलेत. तेव्हा खांडवा येथेच खटला चालवावा.

सरकार ज्या कलमाच्या आधारे जबलपूरचा खटला चालवू इच्छिते, ते बरोबर नाही. सरकारच्या हद्दीत कुठंही गुन्हा घडल्यास, कुठंही खटला चालवता येतो असं म्हटल्यास, आरोपी विरुद्ध लाहोर-बंगलोर येथेही खटला चालवता येईल का?

डाका घालणे आणि खून करणे हे आरोपीविरुद्ध आरोप आहेत. १८७२ च्या पोलीस कायद्याप्रमाणे कलम ६८ प्रमाणे गुन्हा घडला त्या ठिकाणी खटला चालवावा, असे आहे. अशा वेळी जबलपूरचे दंडाधिकारी मि. इस्मे यांच्या अधिकारात तंट्याचा खटला चालवता येईल का? ही कायदेशीर अडचण आपण चीफ कमिशनरांच्या निदर्शनास आणून द्यावी. मि. गुर्थवेटसारख्या सक्षम विधिज्ञांचा या संदर्भात पुन्हा कायदेशीर सल्ला घ्यावा.

माझ्या मते कायद्याच्या चौकटीत पुढील पर्याय योग्य वाटतो. खांडवा दंडाधिकाऱ्यासमोर तंट्याचा खटला नोंदवावा. त्यानंतर ज्युडिशियल कमिशनरांच्या

परवानगीनं तो खटला जबलपूरला ट्रान्सफर करून घ्यावा. कारण मि. इस्मेनी आरोपीला पंधरा दिवसाची कस्टडी दिलीच आहे.

दुसरा पर्याय असा आहे. खांडवा दंडाधिकाऱ्यानं खटल्याचा तपास करावा. परंतु मला पहिला पर्याय सयुक्तिक वाटतो. असे केल्यास आरोपीला खांडवा येथे नेण्याची गरज नाही.

मला असं कळलं की तुम्ही आरोपीच्या कस्टडीची मुदत वाढविण्यासाठी पुन्हा अर्ज करता आहात. दंडाधिकारी मुदत वाढवून देण्यास नकार देणार नाहीत. परंतु तुम्हाला आरोपीच्या गंभीर गुन्ह्याचे काही पुरावे दाखल करावे लागतील.

बॅरिस्टर स्टेऑन यांनी कायदेशीर बाजू पोलीस प्रॉसिक्यूटरना कळविली. ते जन्मानं ब्रिटिश होते. तरीही त्यांनी कायदेशीर अडचणी सरकारपुढं मांडल्या होत्या.

यातून दोन गोष्टी सरकार करू पाहात होतं. सरकारला खांडवा येथे तंट्याविरुद्ध खटला चालवायचा नव्हता. खुद्द चीफ कमिशनरांनी म्हटलं होतं. खांडवा येथे खटला चालवल्यास, सरकारला योग्य न्याय मिळणार नाही, अशी त्यांना शंका होती.

तंट्याला जबलपूरला डांबून कडक शिक्षा देण्याचा सरकारचा हेतू स्पष्ट दिसत होता. कायदे सरकारनेच केले होते आणि कायद्याची आपल्या सोईनं अंमलबजावणी तेच करत होते.

बॅरिस्टर स्टेऑन यांचं दीर्घ पत्र हॅमिल्टनं यांनी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस नागपूर यांचेकडं पाठवून दिलं.

खटला जबलपूरलाच चालवायचा असं सरकारचं अगोदरचं ठरत होतं. त्यामुळं बॅरिस्टर स्टेऑनच्या सल्ल्याकडं सरकारनं लक्ष दिलं नाही.

२६ सप्टेंबर १८८९ला डेप्युटी कमिशनर मि. इस्मे यांच्या समोर खटला सुरू झाला. अकरा वर्षं बलाढ्य ब्रिटिश सत्तेला या माणसानं जेरीस आणलं होतं. देशभर सरकारची नाचक्की झाली होती. सर्व उपाय करूनही पोलिसांना सतत अपयश आलं होतं आणि या जननायकाबद्दलची सहानुभूती वाढत होती. या परिस्थितीची सरकारला कल्पना होती.

असा हा वीर कपटानं पकडला गेला होता, त्याला कडक शिक्षा म्हणजे काय असू शकते? याची सगळ्यांना कल्पना आली होती. त्यामुळे खटल्याच्या दिवशी कोर्टाच्या आवारात प्रचंड गर्दी उसळली.

सरकारच्या दृष्टीनं तंट्या दरोडेखोरांचा नेता होता. परंतु जनतेच्या दृष्टीनं तो एक झुंजार लढवय्या होता. या वीराला पाहण्यासाठी कोर्टात गर्दी वाढू लागली.

डेप्युटी कमिशनरांच्या कोर्टाची जागा लहान होती. ऐनवेळेस ही जागा बदलून

सेशन्स कोर्टाच्या हॉलमध्ये खटला सुरू झाला. हॉल माणसांनी खच्चून भरला होता. बाहेर आवारातही प्रचंड गर्दी होती. तंट्याला वकील देण्यास सांगण्यात आलं. वकील देण्यास त्यानं नकार दिला.

२९ सप्टेंबरला एका मागून एक सर्व साक्षीदार तपासले गेले. सरकारच्या बाजूने हॅमिल्टन यांनी पुरावे सादर केले.

तंट्याच्या बाजूनं बोलण्यास कोणी नव्हतं. कोर्टानं तंट्याला त्याच्यावर असलेल्या आरोपाबद्दल विचारलं.

गजरीचं नाक कापल्याचं त्यानं कबूल केलं. तिचं घर लुटल्याचं मान्य केलं.

पोखर गावावर दरोडा घालणे आणि गजरीचे नाक कापणे, हे दोन आरोप तंट्यावर ठेवण्यात आले होते. इंडियन पिनल कोड ३९५ व ३९७ अन्वये हे आरोप ठेवण्यात आहे. मि. इस्मे यांनी आरोपीला दोषी ठरविले. त्याच दिवशी खटला सेशन कोर्टाकडं वर्ग करण्यात आला.

५ ऑक्टोबरला सुनावणी ठरली होती. हा दिवस दुर्गापूजेचा होता. न्यायाधीशानं सुनावणी पुढं ढकलली. ९ तारखेला कोर्ट सुरू झाले. दरोडा घालणे, नाक कापणे ह्या आरोपासाठी त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

तंट्याला फाशी व्हावी अशी सरकारची इच्छा होती. न्यायाधीशांनी फक्त जन्मठेपेची शिक्षा दिली होती. असं काही होईल असं पोलिसांना वाटलं नव्हतं.

ताबडतोब पुन्हा चक्र फिरली. त्याच दिवशी तंट्याविरुद्ध दुसरा दावा दाखल करण्यात आला. भुईफळच्या हिंमत पाटलांचे घर लुटणे आणि त्यांचा खून करण्याचा आरोप नव्यानं ठेवण्यात आले.

## तंट्याची जन्मठेप : ब्रिटिश असमाधानी

पहिल्या खटल्यात तंट्याला जन्मठेप झाली होती. या निकालानं सरकारला समाधान झालं नव्हतं. यापेक्षा कडक शिक्षा त्यांना अपेक्षित होती. परंतु तसं झालं नव्हतं.

पोलिसांनी आणखी एक खटला दाखल करण्याची तत्परता दाखवली. १८७९ साली तंट्यानं भुईफळवर हल्ला केला होता. यावेळी बिजनियाकडून हिंमत पाटलांना गोळी लागली होती. आणि त्यातच ते मरण पावले. पुढं बिजनियाला अटक झाली. त्याच्यावर खटला चालवला गेला. या गुन्ह्याबद्दल त्याला १८८१ ला फाशीची शिक्षा झाली होती.

हाच आरोप तंट्याविरुद्ध पुन्हा ठेवण्यात आला होता. कोर्ट सुरू झालं. प्रचंड गर्दी झाली होती. सगळे डोळ्यात प्राण आणून प्रतीक्षा करत होते.

पोलीस तंट्याला घेऊन आले. तंट्या थकलेला होता. पोलिसांचा हेतू त्यानं पुरता ओळखला होता. पोलीस आता आपल्याला सोडत नाहीत, हे अनुभवी तंट्यानं पक्क ओळखलं होतं.

कोर्टाभोवती गर्दी वाढत होती. ह्यात दूरदूरवरून आलेले भिल्ल होते, कोरकू होते, गरीब शेतकरी होते, शेतमजूर होते, इंग्रज सत्तेविरुद्ध चीड असणारे इतरही माणसे होती.

सगळेजण निमाडच्या वीराला पाहण्यासाठी धडधडत होते. पोलीस बंदोबस्त वाढला होता. कोर्टात भीतीदायक वातावरण निर्माण झालं होतं.

कोर्टानं हिंमत पाटलांचा मुलगा गोविंद, भाऊ लुंगी हे साक्षीदार तपासले. डेप्युटी कमिशनर मि. इस्मे यांनी हिम्मत पाटलांचा खून केल्याचा आरोप तंट्यावर कायम केला आणि खटला सेशनकडं पाठविला. तो दिवस होता ९ ऑक्टोबर १८८९.

तंट्यानं निकाल ऐकला. मि. इस्मेनं ठरल्याप्रमाणं चोख काम केलं होतं. सेशन्स जज लिंडसे निल यांच्या समोर ११ ऑक्टोबरला दाखल केला.

मि. लिंडसे निल यांनी सेशन क्रं. ३२/१८८९ प्रमाणे तंट्याला जन्मठेप यापूर्वी सुनावली होती. त्यांच्याच समोर त्याच दिवशी सेशन क्र. ३३/१८८९ हा नवा खटला सुरू झाला.

तंट्याला भुईफळच्या डाक्याबद्दल विचारलं गेलं.

भुईफळच्या दरोड्यात मी नव्हतो, असं तंट्यानं सांगितलं. सरकार आपल्याला या केसमध्ये गुंतवत आहेत हे त्यानं पक्क ओळखलं होतं. त्यामुळं तो खोटं बोलला होता.

सरकारच्या वतीनं पुरावे दिले गेले.

सेशन्स जज लिंडसे निलचा न्यायाचा निर्णय अगोदरच झाला होता. आरोपींना त्यांनी दोन दिवसापूर्वी जन्मठेप दिली होती. त्याच आरोपीवर खुनाचा आरोप आता सरकारनं ठेवला होता.

## तंट्याची फाशी : पुन्हा शिक्षा

लिंडसे निल तंट्याचं जजमेंट सांगू लागले. कोर्टाचा लेखनिक लिहू लागला.

आरोपीनं भुईफळचे आरोप नाकारले आहेत. हिंमत पाटलांचा खून बिजनियानं केला होता. याबद्दल त्याला फाशीही झाली होती. हे आरोपीचं म्हणणं सयुक्तिक आहे. समोर जो पुरावा आहे, त्यावरून बिजनियाने गोळी झाडली असा निष्कर्ष काढता येत नाही. कदाचित तसं घडलं असेलही.

समोर आलेला पुरावा याप्रमाणे आहे. टोळीबरोबर एकच बंदूक होती आणि ती बिजनिया जवळ होती. इंडियन पिनल कोडच्या सेक्शन ३९१ प्रमाणे - दरोड्याच्या गुन्ह्यात एखाद्या गुन्हेगाराकडून खून घडला. त्या खुनाबद्दल टोळीतील प्रत्येकास जबाबदार धरलं जातं.

तंट्याचा पूर्वेतिहास या खटल्याच्या संदर्भात याप्रमाणे आहे. १८७१ साली तंट्याला अटक झाली होती. असिस्टंट कमिशनर निमाड यांनी इंडियन पीनल कोड ४११ उचलेगिरीबद्दल शिक्षा केली. दोन वर्ष तो तुरुंगात होता. या घटनेत साक्षीदार आणि तक्रार करणाऱ्यात हिंमत पाटील होते. परंतु या केसमध्ये तंट्या अपीलवर सुटला होता. १८७३ साली बदमाशीच्या कारणाखाली एक वर्षाची शिक्षा झाली. इथंही हिंमत पाटलाचीच प्रमुख भूमिका होती. १८७८ला तंट्याला पोखरला अटक झाली. त्यावेळी हिंमत पाटील तिथंच होता. त्यानं अटक करवणाऱ्या मोहनचं अभिनंदन केलं होतं. तंट्याला खांडवा जेलमध्ये ठेवलं. तेथून डिसेंबर १८७८ ला तो पळाला. बरोबर बिजनिया व दौल्या होते. सरकारी गॅझेटियरमध्ये १ फेब्रुवारी १८७९ ह्याबद्दल प्रगटन प्रकाशित झालं.

२६ एप्रिल १८७९ ला भुईफळचा दरोडा पडला, जो या केसचा मुख्य विषय आहे. त्यात हिंमत पाटलाला गोळी लागली. दुसऱ्या दिवशी त्यांना मृत्यू आला. पुढं दौल्या व बिजनियाला अटक झाली. केस क्र. ४६२/१८७९ खाली आरोप ठेवण्यात आले. नर्मदा विभागाच्या सेशन्सनी ट्रायल क्र. ४/१८८० ने बाराजणांना शिक्षा ठोठावल्या. दौल्याला जन्मठेपेची शिक्षा झाली. बिजनियाला फाशी झाली.

अनेक वर्षांच्या अंतरानं आता तंट्या पकडला गेला आहे. हा खटला काल सुरू झाला आणि आज पूर्ण होतोय. १८ साक्षीदारांचा तपास केला आहे. सरकारनं कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. हॅमिल्टन वगळता १७ साक्षीदार इतर आहोत. त्यांची वर्गवारी तीन प्रकारे आहे.

१) आरोपीनं हिंमत पाटलांवर हल्ला केला. त्यांचं घर जाळलं. ह्यातच हिंमत पाटलांचा मृत्यू झाला, असं सांगणारे साक्षीदार-

यात हिंमत पाटलांचा मुलगा गोविंद, भुईफळचा कोतवाल नारायण, हिंमतचा भाऊ लुंगी व रुकरी आणि पुतण्या गोपाल हे आहेत.

२) तंट्याच्या अशा वागण्याला एक कारण होतं. त्याचा बदला म्हणून तो असा वागला. असे सांगणाऱ्यात-

भिका, सरदार, यशोदा, गजरी आणि सिकदरचा समावेश आहे.

३) भुईफळ दरोड्यात ज्यांनी भाग घेतला होता. आणि ज्यांना शिक्षाही झाली होती. असे साक्षीदार-

माईकूम, मदन, पोसिका आहेत.

वरील साक्षीदारांचा विचार करता, मला असे वाटते. दुसऱ्या वर्गातला साक्षीदार म्हणतात तसा पुरावा समोर आहेच. हिंमत पाटलांनी तंट्याला अटक करवण्यात सक्रिय भाग घेतला होता. पहिल्या वर्गातल्या साक्षीदाराबद्दल अधिक चिकित्सेची आणि पुराव्याची गरज भासत नाही.

मला वाटतं, या खटल्याच्या मुख्य बाबी अशा आहेत.

१. दरोडेखोरांनी हिंमतला घरातून ओढून बाहेर आणलं.

२. ते बाहेर येताच हल्ला केला आणि गोळी झाडली.

३. पाटील आणि त्यांच्या भावाचंच घर लुटलं. आग लावली. गावातल्या कोणालाही त्रास दिला नाही. ह्यावरून पाटला विरुद्ध बदला घेण्याची भावना दिसते.

सर्व साक्षीदारांच्या आणि उपलब्ध पुराव्यावरुन मी अशा निष्कर्षापर्यंत आलो आहे.

अ) हिंमत पाटलांचा बदला घेण्याचा तंट्याचा हेतू होता.

ब) २६ एप्रिल १८७९ ला भुईफळवर दरोडा पडला. दरोडेखोरांनी त्यांच्या कृतीतून दाखवून दिलं. फक्त लूटमार करणे हा उद्देश नव्हता, तर हिंमत पाटलांचा बदला घेणे हाच मुख्य हेतू होता.

क) या दरोड्यात तंट्याच नायक (Leader) होता.

ह्या निकालाच्या सुरुवातीच्या भागात मी म्हटलेलं आहे. एखाद्या दरोड्यात खून झाला तर त्याची जबाबदारी तो दरोडा घालणाऱ्या नायकावर आहे. आणि त्याला शिक्षा मृत्यूदंडच आहे. इथं आरोपी हा दरोड्याचा प्रमुख होता. हिंमत पाटलांना जबर जखमी करावं अथवा त्यांचा खून करावा, असा त्यांचा स्पष्ट हेतू होता. डाकू सोबत भरलेली बंदूक आणि तलवारी होत्या, यावरून हे स्पष्ट होतं.

वरील बाबी बघता आरोपी तंट्याने

१. दरोडा घालण्याचा गुन्हा केला आहे.

२. दरोड्याच्या वेळी त्यानं हिंमत पाटलाच्या खूनाचा गुन्हा केला आहे. ज्युडिशियल कमिशनराच्या मान्यतेच्या अधीन राहून मी तंट्या भिल्लास दुसऱ्या

गुन्ह्यासाठी मरेपर्यंत फाशीची शिक्षा करत आहे.

तंट्याला माहिती द्यावी, जर त्याला वरच्या कोर्टात अपील करावयाचे झाल्यास, सात दिवसाची मुदत आहे.

सेशन्स जज लिंडसे निल यांनी निकालपत्र संपवलं. सही केली. १९-१०-१८८९ तारीख लिहिली.

तंट्याला फाशीची शिक्षा झाली. हे ऐकताच आदिवासी-शेतकरी आकांत करू लागले. तंट्याला फाशी होऊ नये, असे वाटणारा वर्ग मोठा होता. तंट्याची शिक्षा ऐकून त्यांना वाईट वाटू लागलं.

इंग्रजांच्या दृष्टीनं तो दरोडेखोर होता. जनतेसाठी तो कैवारी होता. अशा नायकाला फाशी जाहीर करतांना न्यायाधीशानं सरकारला मदत केली होती. ब्रिटिश अधिकाऱ्यांना आनंद झाला होता. अकरा वर्ष त्यांची इभ्रत धुळीस मिळवलेल्या गुन्हेगारासाठी फाशी हीच एकमेव शिक्षा, त्यांना वाटत होती.

# तंट्यावर अन्याय, वकिलांचा सरकारकडे अर्ज

तंट्या सत्तेचाळीस वर्षांचा झाला होता. तो मनानं आणि शरीरानं गेले काही दिवस खचला होता. इतक्या कमी वयात म्हातारपण आल्यासारखी अवस्था झाली होती. शरीर थकलं होतं. मन दुर्बल झालं होतं. जगण्याची उमेद संपली होती. नेमक्या अशा मन:स्थितीत गणपतसिंहानं त्याला धोका दिला होता.

सरकार आपल्याला आता सोडत नाहीत, हे तंट्यानं पक्क ओळखलं होतं. सेशन्स जज्ज लिंडसे निल यांनी पोखरच्या डाक्याबद्दल आरोप कायम केले. गजरीचे नाक कापण्याचा मुख्य आरोप सिद्ध झाला होता. न्यायाधीशांनी जन्मठेपेची शिक्षा जाहीर केली. शिक्षा ऐकून तंट्याला क्षणभर विश्वासच बसला नाही.

हे सरकार त्याला कडक शिक्षा करणार असंच सगळे समजत होते. कडक शिक्षा म्हणजे फक्त मृत्युदंड लिंडसे निल यांनी शिक्षा जाहीर केली. सुटलो आपण ही भावना क्षणभरच टिकली. कारण सरकार त्याला कधी सोडील अशी आशा करणं वेडेपणा होता.

तंट्याचा खटला सुरू झाल्यापासून सगळ्या वर्तमानपत्रांत तंट्याबद्दल छापून येऊ लागलं. तंट्याला फाशीची शिक्षा जाहीर झाली. ही बातमी निमाडभर पसरली.

तंट्याला इतकी कडक शिक्षा व्हायला नको होती. असं आम जनतेला वाटत होतं. जनतेची भावना सरकारपर्यंत कशी पोहोचणार? अनेक वर्ष तंट्याला मदत करणारे आदिवासी, शेतकरी त्याचे साथीदार ह्या निकालानं गोंधळून गेले होते.

जबलपूर शहरात काही देशप्रेमी लोक होते. वकील होते. त्यांना हा निकाल म्हणजे तंट्यावर अन्याय वाटत होता. त्यांनी तंट्यातर्फे चीफ कमिशनरांच्या नावे अर्ज लिहिला. जबलपूरच्या सेंट्रल जेलमध्ये जाऊन अर्जावर तंट्याची सही घेतली.

अर्जात स्पष्ट लिहिलं होतं.

हिंमत पाटलांचा मृत्यू बिजनियाच्या हातून गोळी लागून झाला, हे कोर्टानं मान्य केलं आहे. बिजनियाला अटक झाली, त्याला फाशी दिली आहे. ज्या आरोपीने जो

गुन्हा केला होता, त्याला शिक्षाही झाली आहे. आता त्याच गुन्ह्यासाठी मला का फाशी देता? एका खुनासाठी दुसऱ्यास जबाबदार धरता? मेहेरबान सरकारनं मला जी फाशी दिली, ती माफ करावी. ती बदलावी. अर्जदार तंट्या भिल्ल. जबलपूर जेल, फाशीची शिक्षा. दि. १९-११-१८८९.

उपअधीक्षक सेंट्रल जेल जे. प्राक्टर यांच्या समोर तंट्यानं अर्जावर सही केली. प्राक्टर यांनी अर्जावर लिहिलं, तंट्यानं माझ्या समक्ष सही केली. हा अर्ज ज्युडिशियल कमिशनरांकडं आला. ज्युडिशियल कमिशनर नेमके या काळात त्यांच्या कार्यालयात कार्यरत नव्हते. त्यांचा कार्यभाग सेशन्सं जज्ज लिंडसे निल यांच्याकडे होता.

प्रभारी ज्युडिशियल कमिशनर लिंडसे निल यांच्या समोर तंट्याचं अपील आलं. इथंही त्याचं दुर्दैव आड आलं. ज्या न्यायाधीशांनी त्याला खुनाच्या आरोपाखाली दोषी ठरवलं होतं, त्यांच्याच समोर अपील आलं होतं.

प्रभारी ज्युडिशियल कमिशनरांनी तंट्याचं अपील फेटाळलं. अपील फेटाळताना त्यांनी, सेशन्स जज्जांनी दिलेली शिक्षा कायद्याप्रमाणं योग्य आहे, असा निर्णय दिला.

ज्युडिशियल कमिशनरांनी आपला अहवाल चीफ कमिशनरांना पाठवला.

सरकार तंट्यावर अन्याय करीत आहे ही भावना सामान्य जनतेत होती असंच मान्यवर वकिलांना वाटत होतं. नागपूर हायकोर्टात वकिलांच्या बार कौन्सिलमधे तंट्याबद्दल विचार सुरू झाला.

बॅरिस्टर टी. डब्ल्यू. धिल्लन हे नागपूर बारचे सभासद होते त्यांनी गोपाल राव, बळवंत राव या नामवंत वकिलांच्या मदतीने एक अपील तयार केले.

चीफ कमिशनरांचे सेक्रेटरी एल. के. लॉरी होते. त्यांच्याकडे चीफ कमिशनरासाठी दीर्घ अर्ज दाखल केला.

अर्जात त्यांनी म्हटलं होतं.

आम्ही खाली सह्या करणारे नागपूर बारचे सभासद, आदरपूर्वक चीफ कमिशनरांना महाराणी विरुद्ध तंट्या या केसबद्दल विनंती करत आहोत.

या केसमध्ये सेशन्स जज्ज यांनी आरोपीला इंडियन पीनल कोड ३९६ खाली मृत्युदंडाची शिक्षा दिली आहे. आरोपीनं ज्युडीशियल कमिनरांकडं या शिक्षेविरुद्ध अपील केलं. ते फेटाळण्यात आलं.

आपल्याबद्दल पूर्ण आदर बाळगून आम्ही विनंतीपूर्वक निवेदन करीत आहोत.

आरोपीची या कलमाखालील शिक्षा कायदाच्या दृष्टीनं अन्याय करणारी आहे. तसेच नैसर्गिक न्यायाचा इथं विचार झाला नाही.

मेहरबान चीफ कमिशनरांना आमची विनंती आहे की, त्यांनी या खटल्यातली कागदपत्रं तपासली तर आम्ही करत असलेली विनंती योग्य आहे, अशी त्यांची खात्री पटेल.

बॅरिस्टर धिल्लन यांनी भुईफळ हल्ल्यातील घटनांचा तपशील अर्जात दिला.

आरोपीचा उद्देश हिंमत पाटलांचा खून करणे नव्हता. नाही तर त्याने अथवा त्याच्या साथीदारांनी हिंमत पाटलांना गोळी घातली असती. आरोपीचे साथीदार हिम्मत पाटलांना मारझोड करू लागले. त्यावेळी त्यानं असं करू नका, असं साथीदारांना बजावलं. हे हिंमतच्या मुलानं आणि भावानं कोर्टासमोर साक्षीत सांगितलं आहे. याचा अर्थ आरोपीचा उद्देश हिंमत पाटलांना फक्त धडा शिकवावा - एवढाच दिसतो.

हिंमत पाटील घरातून बाहेर आले. त्यावेळी त्यांच्या सोबत एक साथीदार होता. साथीदारांच्या हातात काठी होती. तंट्याच्या एका माणसानं ती काठी हिसकावून घेतली. या गोष्टीला हिंमत पाटलानं विरोध करताच, आरोपीच्या माणसांनी त्यांना मारहाण सुरू केली. बचावासाठी हिंमत पाटील पळण्याचा प्रयत्न करू लागले. डोळ्या समोरून शिकार निसटून जात आहे. या भावनेतून बिजनियानं गोळी झाडली असावी.

हिंमत पाटलांचा मृत्यू ही दुर्दैवी घटना होती. साथीदारांचे जबाब या निवाड्याचा आधार आहेत. साक्षीदारांनी जे सांगितलं, त्यातून हिंमत पाटलांचा खून करणे ही हल्ल्याची योजना नव्हती.

तंट्याजवळ तलवार होती. त्याने कुणाविरुद्ध तिचा वापर केला नाही. तिचा वापर करावा म्हणून कुणाला सांगितलं नाही. हिंमत पाटील पळू लागले. त्यावेळी त्यांच्यावर गोळी झाडावी असा तंट्यानं हुकूम केला नाही. टोळीतल्या कोणालाही सांगितलं नव्हतं. तंट्याचा असा हेतू असता तर हिंमत पाटलांना पकडताच, गोळी घातली असती.

ही घटना घडली त्यावेळी काळोख होता. हिंमत पाटील आणि मुलगा अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न करीत होते. अशावेळी बेसावधपणे बिजनियानं गोळी झाडली. पाटील जखमी झाले असावेत, असे आरोपीला वाटले. त्यांनी हिंमत आणि त्याच्या मुलाचा पाठलागही केला नाही.

हिंमत पाटलांचे भाऊ लुंगीची साक्ष असाच पुरावा आहे.

तंट्याचे साथीदार लुंगीला मारू लागले. तंट्यानं साथीदारास स्पष्ट बजावले.

फक्त लूट करा, कुणालाही मारहाण करू नका. ही घटना बोलकी आहे. आरोपीचा एकूण हेतू फक्त डाका घालणे हाच उद्देश होता. कोणत्याही प्रकारची हिंसा करावी असा हेतू दिसत नाही.

आपला अर्ज फेटाळल्याचं तंट्याला कळलं. सरकार आता आपल्याला सोडत नाही, त्याची खात्री झाली होती.

कमिशनर कोर्टानं ४ डिसेंबर १८८९ तंट्याच्या फाशीचा दिवस नक्की केला. जबलपूर सेंट्रल जेलच्या अधीक्षकांना हे पत्र मिळाले. तो दिवस २१ नोव्हेंबर १८८९ चा होता.

कर्नल ए.एच.एच. हॅलेट जेलचे अधीक्षक होते. दुसऱ्या दिवशी त्यांनी चीफ कमिशनरांच्या सेक्रेटरींना पत्र लिहिले.

खास दूतास पत्र घेऊन नागपुरास पाठविले.

२४ नोव्हेंबर. सेंट्रल जेलच्या भक्कम कोठडीत तंट्या बसला होता. आपला शेवट आता जवळ आला आहे. त्याला हे कळून चुकलं होतं. गेल्या अकरा वर्षांच्या घटना त्याच्या डोळ्यांसमोरून सरकू लागल्या.

एका घटनेतून दुसरी घटना घडत गेली होती आणि एका चक्रव्यूहात तो अडकत गेला होता. मागं वळून पाहायला उसंत मिळालीच नाही. स्वत:चा विचार करायलाही फुरसत मिळाली नाही. ऊन, पाऊस, कडाक्याची थंडी, उपासमार कशाची फिकीर केली नाही.

डोळ्यासमोर होते फक्त गरिबांना लुबाडणारे सावकार मालगुजार आणि त्यांना साथ देणारं सरकार. या काळात स्वत:च्या बायका-मुलांची कधी काळजी घेतली नाही. तब्येतीकडं लक्ष दिलं नाही. फक्त अन्यायाच्या विरुद्ध झगडत राहिला.

बायको भिकी आणि पोरगा किसनची तंट्याला तीव्रतेनं आठवण झाली. आयुष्यभर मुकेपणानं भिकी त्याच्या मागंमागं खंबीरपणानं उभी होती. तिनं कधी तक्रार केली नव्हती. अपेक्षा ठेवल्या नव्हत्या की यशोदेच्या नावानं संशयानं बोटं मोडली नव्हती.

बायको-पोराला भेटावं. तंट्याला आज वाटू लागलं. शेवटी भिकी आणि किसन्याला डोळे भरून पाहावं या विचारानं त्याचं मन सैरावैरा झालं.

जेलचे अधीक्षक कर्नल हॅलेट यांनी तंट्याला कार्यालयात बोलावलं.

''४ डिसेंबरला फाशीचा दिवस ठरला आहे. तुझी शेवटची इच्छा काय आहे?'' कर्नल हॅलेट यांनी त्याला विचारले.

''कोनत्याच विच्छा राह्यल्या नाय सरकार ह्या तंट्याच्या. पर रात पसून, बायडी आन् पोराची सय यायलीय. त्येंची गाठ पडली तर...'' तंट्या कर्नल हॅलेट कडं पाहात अर्धवट बोलला.

तो २४ नोव्हेंबरचा दिवस होता. आठ दिवसात त्याची बायको-पोरं कशी आणायची? ती कुठं असतील? कर्नल हॅलेटना प्रश्न पडला.

''बघतो मी.'' ते म्हणाले.

कर्नल हॅलेटनी चीफ कमिशनरांना ताबडतोब पत्र लिहिलं.

तंट्या बायको-मुलांना भेटू इच्छितो. ४ डिसेंबर पूर्वी ते जबलपूरला पोहोचणं अशक्य आहे. माननीय चीफ कमिशनरांना विनंती आहे. तंट्याची बायको आणि मुलं येईपर्यंत त्याची फाशी पुढं ढकलण्याची परवानगी देता येईल काय? सेशन्स जज्जकडून मला सांगण्यात आलं आहे. त्यांनी एकदा नक्की केलेली फाशीची तारीख बदलण्याचे त्यांना अधिकार नाहीत. कृपया या संदर्भात तारेद्वारे आदेश मिळावेत.

जबलपूर सेंट्रल जेलचा खास दूत पत्र घेऊन नागपूरला आला. चीफ कमिशनरांना पत्र सादर केले.

३ डिसेंबर १८८९ चा दिवस उजाडला. चीफ कमिशनरांच्या कार्यालयात सकाळपासून धावपळ सुरू होती. चीफ कमिशनरांचे सेक्रेटरी एल. के. लॉरी लवकरच दप्तरात आले होते.

चीफ कमिशनरांसमोर नागपूर बारच्या वकिलांचे अपील होते. तसेच आरोपी तंट्याचा दयेचा अर्जही होता. त्याच्यावतीने त्याच्यावर प्रेम करणाऱ्या वकिलांनी तो दाखल केला होता.

तंट्याच्या फाशीचा दिवस एक दिवसावर येऊन ठेपला होता. तंट्यानं फाशीपूर्वी बायको-मुलांना भेटायची शेवटची इच्छा व्यक्त केली होती. या संदर्भात सेंट्रल जेलच्या अधीक्षकांचे पत्रही चीफ कमिशनरांच्या आदेशाची वाट पाहात होते.

बलाढ्य ब्रिटिश सत्तेशी अकरा वर्षं तंट्या झुंजला होता. ब्रिटिश पोलिस आणि फौजेची नामुष्की झाली होती. निमाडमध्ये तंट्यामुळं आदिवासी-शेतकऱ्यात असंतोष वाढू लागला होता.

अशा आरोपीचा दयेचा अर्ज चीफ कमिशनरांपुढं होता. तंट्यावर चुकीचा

आरोप ठेवून फाशीची शिक्षा दिली, हा अन्याय आहे. न्यायाला धरून हे निकालपत्र नाही, असं नामांकित वकिलांनी अर्जात विनंती केली होती.

चीफ कमिशनरांनी नागपूर बार कौंसिलच्या सभासदांचे अपील फेटाळले. सेशन्स जज्जांनी दिलेली शिक्षा कायद्याप्रमाणे बरोबर आहे, असा निर्णय दिला.

जबलपूर सेंट्रल जेलच्या अधीक्षकांना तारेनं कळविलं गेलं.

तंट्याला सरकार सोडत नाही, हे सगळ्यांना कळून चुकलं होतं. त्याच्या फाशीचा दिवस सर्वांना माहीत होता.

फाशीच्या आदल्या रात्री जबलपूर शहरात दूरदूरची माणसं येऊ लागली होती. यात आदिवासी होते. शेतकरी होते. गरीब मजूर होते. तंट्याबद्दल अपार सहानुभूती असलेली दूरदूरची माणसं होती.

जबलपूर रेल्वे स्टेशनवर रात्रभर माणसांचा जनसागर लोटला होता. ह्यात उघडे-बोडके, हातात तिरकमटा घेतलेले, तंट्यावर प्रेम करणारे भिल्लही होते.

अनेक वर्षांच्या मध्य भारताच्या इतिहासात इतकी लोकप्रियता तंट्या सारख्या सामान्य वीरानं मिळवली होती.

तंट्या होता एक साधा-सरळ भिल्ल. जुलमी सत्ता आणि सरंजामशाहीचा तो बळी बनला होता. स्वत:च्या आणि आदिवासी बांधवांच्या अन्यायाविरुद्ध त्यानं प्रखर लढा दिला होता.

तंट्या डाकू नव्हताच मुळी. गरिबांना लुटणाऱ्या सावकार, मालगुजार आणि जुलमी पोलिसांचा तो कर्दनकाळ होता. त्यामुळं तो सगळ्यांना जणू रक्षणकर्ताच वाटत होता.

तंट्यात नेतृत्वाचे सर्व गुण होते. तो नि:स्वार्थी असा नायक होता. त्यानं स्वत:साठी काही कमाई साठवली नाही. कुटुंबाचा विचार केला नव्हता. सावकार-बनियांची लुटलेली रक्कम तो सहकाऱ्यांना तेथेच वाटून देत असे. काही हिस्सा गरजू-गोरगरिबांसाठी बाजूला ठेवीत असे.

न्याय आणि दया हे गुण तर त्याच्या जगण्यात पदोपदी दिसत होते. इतकेच काय, सत्य, धैर्य, सहनशीलता, मैत्रीभाव आणि आदरभाव हे सर्व गुण त्याच्यात एकवटलेले होते.

तंट्या प्रचंड बलाढ्य ब्रिटिश सत्तेविरुद्ध झगडत होता.

अकरा वर्षांचा कालखंड थोडा नाही. तंट्याच्या ह्या लढ्यात त्याच्याजवळ काय होतं? दुर्दम्य इच्छाशक्ती, प्रचंड साहस आणि जनसमूहाचं पाठबळ. त्याचे

दोन मजबूत पाय हेच मुख्य वाहतुकीचं साधन होतं चालण्यासाठी. त्याच्यासाठी जिवावर उदार झालेले निष्ठावान सवंगडी हे त्याचं सैन्य होतं. सातपुडा जंगलातल्या दऱ्या-खोऱ्यातल्या गुहा त्याचा निवारा होता.

अशा परिस्थितीत त्यानं अकरा वर्षं ब्रिटिश सत्तेच्या नाकात दम आणला होता. देशभर त्यांची नामुष्की झाली होती.

तंट्या मुळात गुन्हेगारी स्वभावाचा नव्हता. जुलमी सरंजामशाहीनं त्याला भूमिहीन केलं. तो भिल्ल या गुन्हेगार-रानटी जमातीत जन्मला हाच त्याचा गुन्हा होता. पाटलाच्या मुलीला त्याच्या बद्दल सहानुभूती वाटत होती. हा सर्वांच्या नजरेत मोठा गुन्हा वाटत होता. लोखंडी जातीसंस्था हे कसं सहन करणार?

शून्यातून हा भिल्ल क्रांतिकारक उभा राहिला होता. त्याच्या जीवनातल्या अद्‌भुत घटना जिवंतपणी दंतकथाच बनल्या होत्या. त्याच्या गुणांच्या लोककथा आणि लोकगीतं गावोगाव पसरले होते. त्यात तंट्याची अचाट बुद्धिमत्ता, चपळाई, प्रसंगावधान, उदार दृष्टिकोन आणि सभ्यपणा आढळून येत होता.

तंट्याची प्रतिमा बनली ती जननायक म्हणूनच. तो सगळ्यांना मित्र वाटत होता. स्त्रिया-मुलांना रक्षणकर्ता वाटायचा, तर आदिवासी-किसान त्याला जंगलचा राजाच समजत होते. तो कोणत्याही गावात आला की, एखाद्या राजासारखं त्याचं स्वागत होत असे. त्याला आदर मिळत होता. तंट्या निमाडमध्ये जणू सार्वभौम होता.

तंट्या साधा भोळा होता. तो सुरुवातीस कुणावरही चटकन विश्वास ठेवीत असे. पुढं अनुभवानं तो हुशार बनला. अडचणीवर मात करण्यासाठी तो हरहुन्नरी वाटायचा. तो उत्तम नकलाकार होता. विविध प्रकारची सोंगं काढणं त्याला आवडायचं.

एक दशकापेक्षा जास्त काळ हा निमाडचा सिंह तापी-नर्मदा खोऱ्यात गर्जत होता. मध्य भारत आणि सेंट्रल प्रॉव्हिन्सच्या अधिकाऱ्याची त्यानं झोप उडविली होती.

तंट्या ब्रिटिश पोलिसांना सरळ सापडू शकत नाही, हे चीफ कमिशनरांना कळून चुकलं होतं. त्यामुळं त्यांनी तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांना कळविलं होतं. तंट्याच्या जवळच्या माणसाला पैशाच्या मोहात अडकवा. त्याच्या नातेवाईकाला जाळ्यात पकडा. त्यांच्यातर्फे तंट्याला फसवूनच अटक करता येईल.

विश्वासघात आणि भेदनीती ही ब्रिटिशांची जालीम अस्त्रं होती. भारतीय भूखंडावर राज्य करतांना त्यांनी याच रणनीतीचा सर्रास अवलंब केला होता.

तंट्याच्या बाबतीत ब्रिटिशांना शेवटी यश आलं होतं. मानलेल्या बहिणीचा

नवरा ब्रिटिशांच्या गळाला लागला होता. मनानं खचलेला तंट्या स्वतःच्या पायानं गणपतसिंहाच्या घरी चालत गेला. मेजर ईश्वरी प्रसादानं थकलेल्या तंट्याला अटक केली होती.

## हुतात्मा तंट्याचा निरोप

३ डिसेंबर १८८९ ची रात्र. जबलपूर शहरात माणसांना पाय ठेवायला जागा उरली नव्हती. चारही दिशांनी माणसं येत होती. ह्यात उघडेबोडके आदिवासी होते. त्यांच्या जवळ त्यांचा तिरकमटा आणि बाण होते. कोरकू होते. गोंड होते. शेतकरी होते. सर्व थरातल्या तरुण-म्हाताऱ्या माणसांचा जनसागर लोटला होता.

सेंट्रल जेलभोवती राखीव सैन्य आणि शस्त्रधारी पोलिसांचा कडा पहारा होता. जबलपूर शहराला छावणीचं स्वरूप आलं होतं.

सगळी परिस्थिती स्फोटक बनली होती. कडक बंदोबस्त असूनही आदिवासी-किसान आपल्या लाडक्या वीरांच्या शेवटच्या निरोपासाठी दुरून दुरून आले होते.

४ डिसेंबरच्या पहाटे पूर्वेकडं लाली पसरू लागली.

तसतसा जमाव सेंट्रल जेलकडं चालू लागला. तंट्या मामाच्या नावाचा घोष अधून मधून सुरू होता. गर्दीनं सेंट्रल जेलला पुरतं वेढलं. त्यांच्या समोर फौजेतल्या शस्त्रधारी शिपायांची भित होती. त्यापलीकडं जबलपूर सेंट्रल जेलची अभेद्य तटबंदी होती.

सगळ्यांचे डोळे चार भिंती पलीकडील तंट्यावीराकडं लागले होते. गेली अकरा वर्षे तंट्यानं नर्मदा-तापीत राज्य केलं होतं. अनभिज्ञ सम्राटच होता तो निमाडचा. बलाढ्य सत्तेनं जंग जंग पछाडलं होतं. नाना तऱ्हेचे उपाय करून पाहिले. प्रचंड बक्षिसांचं गाजर टांगतं ठेवलं. मोठी तंट्या फौज स्थापन केली होती. तरीही त्यांच्या पदरी नामुष्कीच येत होती.

एक साधा माणूस त्यांच्यासाठी आव्हान ठरला होता. तो होता सामान्याच्या गळ्यातला ताईत. तरुणांचा प्रेरणास्थान आणि सर्वांचा जणू पालनहारा.

अशा वीराला मानाचा मुजरा करण्यासाठी दूरदूरची माणसं जबलपूरपर्यंत चालत आली होती.

सेंट्रल जेलभोवती परिस्थिती स्फोटक बनली होती. हजारो आदिवासी - किसानांचा जनसागर तंट्या मामाच्या नावानं घोषणा देऊ लागले. सगळ्यांचे डोळे

तंट्या वीराकडं लागले होते.

आपला लाडका तंट्या मामा चालला आहे. त्याला शेवटची सलामी देण्यासाठी सगळे आले होते. अधूनमधून तंट्या मामाच्या नावाचा गजर होत होता.

पूर्वेकडं आकाशात ढग दाटून आले. सूर्योदय झाला तरी सूर्यबिंब ढगाआड लपलं गेलं. सगळं वातावरण गूढ-उदास भासत होतं आणि सगळा जमाव बंद भिंतीकडं डोळे लावून बसला होता. किती वेळ जमाव बसून होता.

तंट्याला आता फाशी दिली. फौजेतल्या शिपायांनी ओरडून सांगायला सुरुवात केली.

तंट्या मामा गेला. निमाडचा सिंह लोकांसाठी लढता छढता कामी आला. गरिबांचा वाली, जनांचा नायक क्रांतिवीर तंट्या बलिवेदीवर चढला, हुतात्मा झाला.

तंट्या मामाची आठवण घेऊन एक एक जण जड पावलानं परतू लागला. प्रत्येकाच्या हृदयात एका ठिणगीनं पुन्हा जन्म घेतला होता. ती तेवत ठेवण्याचं काम तंट्यानं केलं होतं.

ब्रिटिशांनी एक तंट्या संपविला होता. त्यांचा हा असुरी आनंद फार काळ टिकला नाही.

देशभर तंट्याच्या फाशीची खबर खळबळ उठवून गेली. तंट्यानं एका ठिणगीचं काम केलं होतं. अनेक ठिणग्यांनी वणवा भडकत राहिला. आज आपण स्वातंत्र्याची फळं चाखत आहोत. यात तंट्या आणि त्याच्या साथीदारांचा खारीचा वाटा आहे.

✪

# जननायक तंट्या भिल्ल संदर्भ साहित्य

1. District Gazetteer; East Nimar, Govt. of Madhya Pradesh, Ibrahimpura, Bhopal, First Edition : 1975, Page - 325.
2. तांतिया भील; कीर्ती भानू राय, मालगुजार, हिरापूर, निमाड-निशाकर, १९२५.
3. तंट्या भिल्ल; विश्वनाथ सखाराम खोडे, बाणी खरगोन पत्रिका, निमाड अंक, खंड २, १९३०.
4. चाँद के फाँसी, प्रकाशन वर्ष १९८८.
5. तंट्या भिल्ल; रामचंद्र विनायक टिकेकर ऊर्फ धनुर्धारी, आर्यभूषण प्रेस, मुंबई प.आ. १८९१, दुसरी आवृत्ती १९३०, यावेळीचे शीर्षक : दरोडेखोर तंट्या.
6. तंट्या भिल्ल; नाथ माधव, ग. म. वीरकर, मुंबई-१९, प. आ. १९२८.
7. तंट्या भिल्ल; (नाटक) शांताराम गोपाळ गुप्ते, माझे प्रकाशन पुणे, प. आ. १७३७, किमत बारा आणे, दुसरी आवृत्ती १९५३, बलवंत पुस्तक भांडार, मुंबई. किमत १ रुपया.
8. तात्या ऊर्फ तंट्या भिल्ल यांचे चरित्र (हिंदी अनुवाद) पं. मदन मोहन जोशी, भावे आणि मंडळी, वाई १९०५. मूळ हिंदी पुस्तक लक्ष्मी बुक डेपो मुरादाबाद यांनी प्रकाशित केले.
9. तंट्या भिल्लाचा पोवाडा, बाल मोहन पाठक, मुंबई, १९०५, किमत १ आणा. पोवाडा रचनाऱ्याचे नाव छापलेले नाही.
10. तांतिया मामा; राम कुमार.

## Documents from State Archives Bhopal

1. Narrative of the Career of Tantya Bhil, Complied from the records in the Nimar Police Office. Published on 9th February 1886, by H.P.K. Skipton, Assistant District Superintendent of Police, Khandwa.
2. Holkar Sirkar Gazettee, Indore Durbar, Indore, 26th November, 1888. Vol : XVI No. 25.
3. Hammond, H. A., Inspector General of Police's letter to the Chief Commissioner, C. P. Nagpur date 4th December, 1889.
4. Proclamation approved by the Chief Commissioner, C. P. on 23.11.1885 and Published in Holkar Sirka Gazettee, Indore in Vol : XV No. 41 dated 12th March, 1888.

5. The Police report submitted to the Chief Commissioner by A.C. Duff up to 1886.
6. A Note on Tantya's dacoity Continued - submitted by H.P.K. Skipton up to 1887.
7. A Letter of the Chief Commissioner on Colonel Ward's special note regarding. Tantya, date 4.8.1886.
8. Narrative of Tantya's capture, report of Vinayak Kirtane, the Prime Minister, Holkar Durbar, Indore, Submitted to the Chief Commissioner, dated 20.9.1889.
9. The Chief Commissioner's letter Mr. Mackenzir dated 6th June, 1887.
10. Mr. Hammond, H.A., Inspector General of Police's letter to the Chief Commissioner, dated 4.9.1889.
11. Mr. Tucker, Ist Agent to the Governor General for Central India's letter to the Secretary to the C.C. 4.9.1889.
12. Identification Proceedings of Tantya Bhil, in the court of the Agent to the Governor General for Central India, dated 20.8.1889.
13. Mr. L. K. Laurie, the Secretary to the Chief Commissioner's note regarding remand of Tantya and the Chief Commissioner's order of 26.8.1889.
14. The telegraphic order of the Chief Commissioner for Inspector General of Police to bring Tantya to Jabalpur, dated 26.8.1889.
15. An appeal by the members of Nagpur Bar Council to the Chief Commissioner regarding Tantya's pardone.
16. A letter of Superintendent, Central Jail, Jabalpur to the Chief Commissioner dated 24.11.1889.
17. The Chief Commissioner's order on the appeal 3-12-1889.
18. Jusoda's witness of evidenve before 1st Agent, Governor General for Central India on 22.8.1889.
19. A special report of Heinous crime by Tantya in Nimar District, Number XV A. dated 29th November 1887.

## CORRESPONDENCE

1. Lt. Col. J. A, Scott, Dy. Commissioner, Nerbudda Division's letter 21.6.1884.
2. Lt. Col. M. M. Bowie, Inspector General of Police and Prision, C. P.'s letter dated 3.7.1884.

3. F. C. Anderson, the secretary to the Chief Commissioner's letter dated 23.6.1887.
4. A.H.L. Faraser, Offg. Secretary, Central Province's letter dated 26.11.1887.
5. F. L. Petre, Ist Assistant Agent to the Governor General, Central India's letter dated 21.12.1887.
6. Col. A.H.H. Hallet, Superintendent of Central Jail Jabalpur's letter dated 22.11.1889.

## JUDICAL RECORDS

1. Examination of accused, Tantya before Magistrate date - 20th August 1889.
2. Evidence of witness : 1: Ganpar Singh before Magistrate.
3. Evidence of witness : 6: Ishvari Prasad.
4. Evidence of witness : 9: Yashoda
5. Evidence of witness : 10: Gajari
6. Barristor A. J. Stanyon's advice letter regarding Tantya's Trial dated 13.9.1889.
7. Copy of Judgement - regarding Tantya's trial - passed by the court of session, Jabalpur Division, Session Trial No. 33 of 1889 dated 18.10.1889.

---

## *तंट्या भिल्लासंबंधी बाबा भांड यांची इतर प्रकाशने*

- **तंट्या कादंबरी २०००**
- **Jananayak Tantya Bhil, And The Reasant And Tribal Movement : Source Material,** 2001
- **एका जननायकाच्या शोधाची कहाणी,** २००२
- **आदिवासी क्रांतिवीर तंट्या भिल्लाची गोष्ट,** २००२

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## मंडळाची नवीन प्रकाशने

१) **महाराष्ट्राचा इतिहास**
(प्रागैतिहासिक महाराष्ट्र खंड पहिला भाग १)
लेखक - शां. भा. देव
*पाषाणयुगापासून ते लोहयुगापर्यन्तचा महाराष्ट्राचा इतिहास शब्दबद्ध करणारा ग्रंथ*
पृष्ठसंख्या : १८५ किमत रु.१२७/-

२) **महाराष्ट्राचा इतिहास**
(मध्ययुगीन कालखंड भाग-१)
संपादक - गो. त्र्यं. कुलकर्णी
*इ.स. १२९६ ते १६३६ पर्यन्तचा महाराष्ट्राचा इतिहास शब्दबद्ध करणारा ग्रंथ*
पृष्ठसंख्या : १८८ किंमत रु. १४५/-

३) **एक होता गंधर्व**
लेखक - डॉ. राम म्हैसाळकर
*बालगंधर्वांच्या आयुष्यातील चढउतार शब्दबद्ध करणारी ललितरम्य जीवनकथा*
पृष्ठसंख्या : ११२ किमत रु. ९३/-

४) **प्रासादमंडन**
लेखक - डॉ. र. पु. कुलकर्णी
*प्रासादाच्या (प्राचीन मंदिराच्या) वास्तुसंबंधी माहिती देणारा अनुवादित ग्रंथ*
पृष्ठसंख्या : १५४ किमत रु. ११४/-


५) **समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह - भाग पहिला**
अनुवादक - हेमकांत बळकुंदी
*मूळ फ्रेंच लेखक - रेमंड आरॉ*
*इंग्रजी भाषांतर - रीचर्ड हॉवर्ड आणि हेलन रीव्हर*
पृष्ठसंख्या : २४४ किमत रु. २९५/-

६) **गजाआडच्या कविता**
संपादक - श्री. उत्तम कांबळे
*महाराष्ट्रातील वेगवेगळ्या तुरुंगात सध्या शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांनी लिहिलेल्या कवितांचा संग्रह*
पृष्ठसंख्या : ४७ किमत रु. ३०/-

७) **महाराष्ट्राचे शिल्पकार** या चरित्रमाले अंतर्गत प्रसिद्ध चरित्रग्रंथ
१) **साने गुरुजी** - श्री. राजा मंगळवेढेकर - पृष्ठसंख्या १०२ किंमत रु. ४०/-
२) **दादा धर्माधिकारी** - श्रीमती तारा धर्माधिकारी - पृष्ठसंख्या १०० किमंत रु. ४०/-
३) **डॉ. विठ्ठलराव विखेपाटील** - श्री. शिवाजी सावंत - पृष्ठसंख्या ७८ किमत रु. ३५/-
४) **क्रांतिसिंह नाना पाटील** - श्री. भारत पाटणकर - पृष्ठसंख्या ९४ किमत रु. ३५/-
५) **एस. एम. जोशी** - श्री. ग. प्र. प्रधान - पृष्ठसंख्या ११० किमत रु. ४०/-
६) **शंकरराव किर्लोस्कर** - श्रीमती शांता किर्लोस्कर - पृष्ठसंख्या १०४ किमत रु. ४०/-

**मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे**
सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

**अधिक माहिती/चौकशीसाठी**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व), मुंबई-१४.
दूरध्वनी: ४१४४०२१, ४१४६००५



**बाबा भांड**

**जन्म** - २८-७-१९४९ ला एका सुदूर खेड्यात.

**शिक्षण** - एम. ए. (इंग्रजी), आठवीत असताना बालवीर चळवळीत राष्ट्रपती पदकाने सन्मानित; प्रारंभीच्या महाविद्यालयीन जीवनात बालवीराच्या जागतिक मेळाव्यात सहभाग व दहा देशांचा प्रवास. तेव्हापासून सर्जनशील लेखनास सुरुवात; १९७५ मध्ये पत्नी सौ. आशासोबत 'धारा' व नंतर 'साकेत प्रकाशन'ची सुरुवात; या संस्थेकडून आतापर्यंत सुमारे ८०० हून अधिक पुस्तकांचे प्रकाशन; राष्ट्रीय प्रौढशिक्षणाच्या क्षेत्रात विशेष सहभाग; नवसाक्षरांसाठी 'शब्दसंगत' आणि लहान मुलांसाठी 'साकेत सवंगडी' या नियतकालिकांचे दीर्घकाळ संपादन, प्रकाशन.

बाबा भांड यांच्या पाच कादंबऱ्या, एक कथासंग्रह, चार प्रवासवर्णने, तीन संपादित पुस्तके, बारा किशोर कादंबऱ्या, नऊ बालकथासंग्रह, दोन एकांकिका, सत्तावीस नवसाक्षरांसाठी पुस्तके प्रकाशित. त्यांना महाराष्ट्र राज्य शासनाने सात, बालसाहित्याचा राष्ट्रीय स्तरावरील एक, महाराष्ट्र फाऊंडेशनचा एक आणि इतर बारा असे एकूण एकवीस पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांनी बालकुमार आणि युवक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषविलेले आहे.

४